**निसर्ग हॉलिडेज्, अलिबाग**

| थायलँड पटाया | दिल्ली, आग्रा, अमृतसर, वैष्णोदेवी | केरळ, कोचीन, मुन्नार, टेकडी, वडकला, देवेंद्र, कन्याकुमारी | बेंगलोर, म्हैसूर, उटी, कुन्नूर |
|---|---|---|---|
| १६/११/२५, २६/११/२५, ३०/११/२५ ४ स्टार हॉटेल ४ रात्र/पाच दिवस विजा फ्री | १८/१२/२५, २३/१/२०२६ वन साईट ट्रेन/ वन साईट प्लेन थ्री स्टार हॉटेल, ८ रात्र/९ दिवस | २२/१/२६ दोन्ही साईट थ्री टाकर ट्रेन एसी/थ्री स्टार हॉटेल ८ रात्र/९ दिवस | १/१२/२०२५ दोन्ही साईट थ्री टायर ट्रेन थ्री स्टार हॉटेल ६ रात्र/ ७ दिवस |
| ₹45000/- | ₹19999/- | ₹17999/- | ₹13500/- |

प्रभाकर पटेल : ९८८०२४१६६९
चंद्रकांत म्हात्रे : ९२६०७४५३२६/ अभिनव ठोंबर : ७७२१९२७४०४

# कृषीवल

रायगड, रविवार, दि. ९ नोव्हेंबर २०२५

किंमत ४ ₹




## छोटमला तळोजात पाठवा

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

शिवसेना शिंदे गटातील नवे नेते दिलीप भोईर यांना अलिबाग तालुक्यातील चोंढी येथील हल्लाप्रकरणी शिक्षा सुनावण्यात आली असून, त्यांची तळोजा कारागृहात रवानगी करण्यात आली आहे. शिक्षा जाहीर झाल्यापासून भोईर अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात उपचार घेत होते. मात्र, आ. दळवी यांनी जिल्हा शल्यचिकित्सकांना फोन करुन त्यांना तळोजा कारागृहात पाठविण्याचा सल्ला दिल्याचा व्हिडिओ सध्या चांगलाच व्हायरल होत आहे. त्यामुळे दळवी यांनीच भोईरांचा गेम केला का? असा प्रश्न नागरिकांनी उपस्थित केला आहे. सविस्तर वृत पान ३ वर

वेधक

## भरदिवसा म्हात्रे ज्वेलर्सला गंडा

### २७ लाख ७३ हजारांची फसवणूक

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

ओळखीचा फायदा घेत अलिबागमधील म्हात्रे ज्वेलर्सला २७ लाख रुपयांचा गंडा घातल्याचा प्रकार भरदिवसा घडला. फसवणूक केल्याप्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, यामध्ये दोन महिलांचा समावेश आहे. लग्नासाठी दागिने खरेदीचा बहाणा करीत ही लूट केल्याची माहिती पोलिसांनी दिली. ही घटना मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात ते नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात घडली. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, ऋषिकेश सूर्यगंध, सायली भोईर आणि प्रतिभा सूर्यगंध अशी या आरोपींची नावे आहेत. यातील एक आरोपी सांगली येथील असून, दुसरा आरोपी उरणमधील आहे. आरोपी ऋषीकेश, त्याची आई आणि होणारी पत्नी सायली असे तिघेजण अलिबागमधील म्हात्रे ज्वेलर्सच्या दुकानात दागिने खरेदीच्या बहाण्याने गेले होते. जुन्या ओळखीचा फायदा घेत विवाहासाठी दागिने खरेदी करायचे असल्याचे सांगून पसंतीसाठी काही दागिने घरी घेऊन जायचे ऋषिकेशने सांगितले. पान २ वर

# अलिबाग स्थानकात स्लॅब कोसळला

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

अलिबाग एसटी बस स्थानकातील कॅन्टीनजवळील स्लॅब शुक्रवारी (दि.८) रात्री कोसळला. यामध्ये सुदैवाने जीवितहानी टळली. या घटनेने स्थानकातील इमारतीच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.



अलिबाग बसस्थानक एक एप्रिल १९६१ मध्ये बांधण्यात आले. ६४ वर्षे जुन्या असलेल्या स्थानकाच्या जागी नवीन इमारत बांधण्याची हालचाल सहा वर्षांपूर्वी झाली होती. दि. २८ ऑगस्ट २०१९ मध्ये कामाचे भूमीपूजन मोठ्या थाटामाटात करण्यात आले. सात हजार ६३० चौ. फूट इतक्या क्षेत्रात बसस्थानक बांधले जाणार होते. तळमजला, पहिला मजला अशा पद्धतीने स्थानकात इमारत निर्माण होणार होती. एक लाख प्रवासी ये-जा करतील इतक्या क्षमतेचे स्थानक होणार होते. त्यामध्ये चालक, वाहकांसाठी विश्रांती कक्ष, आरक्षण कक्ष, हिरकणी कक्ष, १४ फलाट आणि प्रतीक्षालय बांधले जाणार होते. मात्र, भूमीपूजन होऊन सहा वर्षे होत आली तरी साधी एक वीटदेखील उभारण्यात आली नसल्याचे दिसून आले. त्यामुळे अलिबाग स्थानकाचा कारभार जुन्याच इमारतीमधून सुरू आहे. जुनी इमारत जीर्णावस्थेत आहे. स्लॅब कोसळण्याचे संकट पान २ वर

> **अलिबाग बसस्थानकातील कॅन्टीनच्या बाहेरील स्लॅब रात्री कोसळला. या घटनेची माहिती मिळाल्यावर जागेवर जाऊन पाहणी केली. त्याचा आढावा घेत याची माहिती वरिष्ठ कार्यालयाला पाठविण्यात आली आहे.**
>
> – **राकेश देवरे,** आगार व्यवस्थापक, अलिबाग

## उरणमध्ये मास्तराने केला मेहुण्याच्या पत्नीचा विनयभंग

### न्हावा शेवा पोलिसात पाच जणांवर गुन्हा दाखल

। उरण । प्रतिनिधी ।

शिक्षक ही समाजातील सर्वाधिक सन्माननीय भूमिका; पण उरण तालुक्यातील एका शिक्षकानेच या पदाचं पावित्र्य चिरडून टाकलं आहे. जासई येथील एका हायस्कूलमधील शिक्षक सुहास शिंदे या नराधमावर स्वतःच्या मेहुण्याच्या पत्नीचा विनयभंग, शिवीगाळ, मारहाण आणि अनोळखी व्यक्तींमार्फत बळजबरीने अत्याचार करवून घेतल्याचा धक्कादायक गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर शिक्षक, त्याची पत्नी आणि मेहुणा यांच्यासह एकूण पाच जणांवर न्हावा शेवा पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे. प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक मोनाली चौधरी करीत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी शिक्षक सुहास शिंदे याने आपल्या मेहुण्याच्या पत्नीला व नातेवाईकांना 'मुंबई फिरायला' म्हणून बोलावले. पान २ वर

## महाविकास आघाडीतूनच निवडणूक लढणार

### उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून भूमिका स्पष्ट

। अलिबाग । प्रतिनिधी ।

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महाविकास आघाडीच्या माध्यमातून लढविण्याचे आदेश पक्षश्रेष्ठींकडून आले आहेत. त्यानुसार महाविकास आघाडीतून निवडणूक लढविली जाणार आहे. अलिबाग नगरपरिषदेच्या उमेदवारांबाबत शेकापच्या नेतेमंडळींसोबत चर्चा झाली आहे. वाटाघाटी चालू असल्याचे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातील संपर्क प्रमुख प्रसाद भोईर यांनी सांगितले. याबाबत नुकतीच त्यांनी पत्रकार परिषद घेऊन पक्षाची भूमिका स्पष्ट केली.

यावेळी शिवसेना (उबाठा) पक्षाचे जिल्हा प्रमुख सुरेंद्र म्हात्रे, संपर्क प्रमुख प्रसाद भोईर, सतीश पाटील, संदीप पालकर, तनुजा पेरेकर आदी पदाधिकारी उपस्थित होते. भोईर यांनी सांगितले की, नगरपरिषदांच्या निवडणुका जाहीर झाल्या आहेत. महाविकास आघाडीतून लढण्याचा निर्णय घेतला आहे. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांचे बिगुल वाजले आहे. पान २ वर

**वरिष्ठांसोबत चर्चा**

महाविकास आघाडीच्या माध्यमातून निवडणूक लढविली जाणार आहे. मतदारांची मानसिकता व कामे यांचा विचार करून उमेदवार निवडून आणून सत्ता स्थापन करता येईल, याचा विचार बैठकांमध्ये करण्यात आला आहे. शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील यांच्यासह अलिबाग नगरपरिषदेतील शेकापच्या नेते मंडळींसोबत चर्चा झाली आहे. चर्चेच्या वाटाघाटी चालू आहेत.






# नेरळ रेल्वे स्थानकाचे रूप पालटणार

## सरकत्या जिन्याचा शुभारंभ, लिफ्टचीही सुविधा



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान या लोकप्रिय पर्यटनस्थळाकडे जाणाऱ्या प्रवाशांसाठी मुख्य प्रवेशद्वार असलेल्या नेरळ रेल्वे स्थानकाचे रूप आता अधिकच आधुनिक होत आहे. नेरळ फलाट क्रमांक एकवर प्रवाशांच्या सोयीसाठी बसवण्यात आलेला स्वयंचलित सरकता पायरी मार्ग (एक्सलेटर) शुक्रवारी सायंकाळी प्रवाशांच्या सेवेत खुला करण्यात आला. सरकता जिना सुरु झाल्याने ज्येष्ठ नागरिक, अपंग आणि गरोदर महिलांना याचा अधिक फायदा होणार आहे.

नेरळ रेल्वे स्थानकात या सरकत्या जिन्याचा शुभारंभ मध्य रेल्वेचे जनरल मॅनेजर यांच्या हस्ते होणार होता. मात्र, त्यांचा नेरळ दौरा पुढे ढकलल्याने अखेर रेल्वे प्रशासनाने स्वतःच हा मार्ग प्रवाशांसाठी सुरू करण्याचा निर्णय घेतला. नेरळ रेल्वे स्टेशन रेल्वे प्रबंधक गुरुनाथ पाटील यांनी यासंदर्भात माहिती दिली.

या स्वयंचलित शिडीमार्गामुळे आता प्रवाशांना, अंध अपंग नागरिकांना फलाटांदरम्यान सहज आणि सुरक्षितपणे ये-जा करणे अधिक सोपे झाले आहे. विशेष म्हणजे, पहिल्या डब्याजवळ आणखी एक सरकता पायरी मार्ग बसवण्याचे कामदेखील रेल्वेकडून लवकरच पूर्ण केले जाणार असल्याचे समजते. याच भागात प्रवाशांसाठी बसवण्यात आलेली स्वयंचलित लिफ्टदेखील आकर्षणाचे केंद्र ठरली आहे. लिफ्टच्या बाह्य भागावर दिलेल्या गुलाबी रंगाच्या शेडमुळे ती महिलांच्या विशेष पसंतीस उतरली आहे. वयोवृद्ध, अपंग आणि महिला प्रवाशांसाठी ही सुविधा अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

सायंकाळी सरकत्या पायऱ्या सुरू होताच प्रवाशांनी उत्साहाने त्यांचा लाभ घेण्यास सुरुवात केली आहे. गुलाबी रंगाच्या झळाळीने सजलेले लिफ्ट क्षेत्र आणि आधुनिक शिडी मार्गामुळे नेरळ स्थानक परिसरातील नवे आकर्षण केंद्र ठरत आहे.

# महागणपतीच्या दर्शनासाठी भाविकांची अलोट गर्दी

**। उरण । प्रतिनिधी ।**

इच्छापूर्ती करणारा चिरनेरचा महागणपती म्हणून श्रींची कीर्ती दूरवर पसरल्याने दीपावलीच्या महत्त्वाच्या सणानंतर शनिवारी (दि. ८) आलेल्या संकष्टी चतुर्थी निमित्ताने अनेक भाविकांनी आपापल्या कुटुंबासह श्रींच्या दर्शनासाठी सकाळपासून मंदिरात गर्दी केल्याचे चित्र पाहायला मिळत होते. यावेळी भाविक श्रींच्या दर्शनासाठी तल्लीन होऊन मंदिर परिसरात ये-जा करताना दिसत होते. तसेच नवीन खरेदी करण्यात आलेल्या वाहनांची पूजाअर्चा करताना वाहन मालक कुटुंबासह मित्रपरिवाराच्या उपस्थित दिसत होते.



नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात संकष्ट चतुर्थी आल्याने सकाळपासून भाविकांनी आपल्या कुटुंबासह श्रींच्या दर्शनासाठी मंदिर परिसरात गर्दी केल्याचे चित्र पाहायला मिळत होते. यावेळी मंदिरात आरती, भजन या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. येणाऱ्या भाविकांना श्रींचे दर्शन सुलभ घेता यावे यासाठी महागणपती मंदिर ट्रस्ट कमिटीचे पदाधिकारी व ग्रामस्थ विशेष सहकार्य करत होते.

यावेळी मंदिर परिसरात फुले हार यांची दुकाने सजली होती. तर खाद्य पदार्थ, खेळण्याची दुकाने थाटली होती. तसेच चिरनेर गावचे खास आकर्षण असलेल्या मातीच्या भांड्याची व गावठी भाजीपाल्याची खरेदी करताना भाविक विशेष करून महिला दिसत होत्या. यावेळी मंदिर परिसराला जत्रेचे स्वरूप प्राप्त झाल्याचे चित्र दिसत होते.

# पनवेल महानगरपालिका माझी वसुंधरा अभियान

## पर्यावरणदूतांची निवड करण्यासाठी विशेष जनजागृती उपक्रम

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल महानगरपालिकेच्या वतीने 'माझी वसुंधरा अभियान ६.०' अंतर्गत आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबद्दल जागरूकता निर्माण करणे आणि शाश्वत विकासासाठी विद्यार्थ्यांना व युवकांना प्रेरित करण्याच्या उद्देशाने पर्यावरणदूतांची निवड करण्यासाठी महापालिकेच्या विविध शाळांमध्ये



नुकताच विशेष जनजागृती उपक्रम राबविण्यात आला.

या अभियानांतर्गत ६ नोव्हेंबर रोजी पनवेल महानगरपालिका शाळा क्रमांक ११ व २ मध्ये, तसेच ७ नोव्हेंबर रोजी शाळा क्रमांक ७ व ४ मध्ये परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. या सत्रांमध्ये पर्यावरण संवर्धन, हवामान बदल साक्षरता आणि स्वच्छतेचे महत्त्व याबद्दल विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. या उपक्रमाद्वारे प्रत्येक शाळेतून उत्साही व जबाबदार विद्यार्थ्यांची 'पर्यावरण दूत' म्हणून निवड करण्यात आली. हे पर्यावरणदूत पनवेल महानगरपालिकेसोबत विविध पर्यावरणीय उपक्रम, स्वच्छता मोहिमा आणि जनजागृती कार्यक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेणार आहेत. पर्यावरण विभागाच्यावतीने उपायुक्त स्वरूप खारगे यांनी महापालिका क्षेत्रातील सर्व शाळा आणि महाविद्यालयांना या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# अपघातात जखमी दुचाकीस्वार एमजीएममध्ये मृत

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

गुरूवारी रात्रपाळी करून शुक्रवारी सकाळी मोटारसायकलवरून घराकडे परतणाऱ्या तरूण कामगाराचा पार्ले स्मशानभूमीजवळ अपघात होऊन त्याला गंभीर अवस्थेत पुढील उपचारासाठी पनवेल येथील एमजीएम रूग्णालयामध्ये दाखल करण्यात आले. शुक्रवारी रात्री त्याचा उपचारादरम्यान दुर्दैवी मृत्यू झाल्याच्या बातमीने पोलादपूर तालुक्यात हळहळ व्यक्त होऊ लागली आहे. शनिवारी सायंकाळी त्याच्या पार्थिवावर पोलादपूर स्मशानभूमीमध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी अत्यल्प मोबदल्यामध्ये बेरोजगारीचे जगणे टाळणाऱ्या तरूणांना पोलादपूर ते महाड एमआयडीसीपर्यंत बससुविधा नसल्यानेच हकनाक जिवानिशी जावे लागत असल्याचा संताप व्यक्त होत आहे.



आठ महिन्यांपूर्वी रात्रपाळी संपवून पोलादपूरकडे निघालेल्या कामगाराचा मृत्यू आणि अपघात करणारे वाहन पसार झाल्याच्या घटनेनंतर पोलादपूर पोलिसांनी भरत गोगावले यांच्या आदेशानंतर खेड येथून वाहन व चालक ताब्यात घेतल्याची घटना विस्मरणात जाण्यापूर्वीच तुषार अशोक पवार या महाड एमआयडीसीतील कामगाराचा रात्रपाळी संपवून पोलादपूरकडे परत येताना पार्ले गावाच्या हद्दीतील श्रीदेव ढाबा परिसरात वाहनांच्या दुतर्फा रांगा असल्यामुळे मोटारसायकलस्वारांना वाहन चालविताना कसरत करावी लागते आणि याचदरम्यान गेल्या अनेक वर्षांपासून मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील अपघाताचे जीवघेणे ठिकाण म्हणून सर्वपरिचित असलेल्या दिविल बंधाऱ्यासमोरील तुर्भे स्मशानशेडजवळ तुषार अशोक पवार (एमएच०६ बीवाय ०६२९) ही मोटारसायकल घेऊन आले असता रस्त्यावर मोटारसायकलवरील ताबा जाऊन अपघात झाला.

तुषार पवार यांना प्रथम माणगाव येथील उपजिल्हा रूग्णालयामध्ये पाठविण्यात आले आणि तेथून परिस्थिती गंभीर असल्याने पुढे पनवेल कामोठे येथील एमजीएम रूग्णालयामध्ये उपचारासाठी पाठविण्यात आले. मात्र, तेथे त्यांचे शनिवारी पहाटेच्या सुमारास निधन झाल्याची माहिती सर्वत्र शोककळा पसरली.

# चरई खुर्द ग्रामपंचायत कार्यालय आदिती तटकरेंमुळेच



**। तळा । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील चरई खुर्द ग्रामपंचायतीला या मतदारसंघाच्या आमदार व मंत्री आदिती तटकरे यांच्यामुळेच मंजुरी मिळाली असल्याचे सांगत सरपंच प्रवीण अंबार्ले यांनी या कामासाठी लागलेल्या कागदपत्रांची कशा प्रकारे पूर्तता केली, त्याचे पुरावेच पत्रकार परिषदेत सादर केले.

चरई खुर्द ग्रामपंचायत कार्यालय बांधण्यासाठी भरत गोगावले यांनी पत्रव्यवहार केला असून, या कार्यालयाला मंजुरी शिवसेनेच्या माध्यमातून मिळाली असल्याचे शिवसेना तालुका प्रमुख प्रदूम ठसाळ यांनी पत्रकार परिषद घेऊन सांगितले

### ■ सरपंच प्रवीण अंबार्लेकडून पुरावे सादर

असता, त्यावर प्रवीण अंबार्ले यांनी पत्रकार परिषद घेऊन हे काम मंत्री आदिती तटकरे यांच्यामुळेच मंजूर झाले असून, या कामासाठी पंचायत समिती तळा, रायगड जिल्हा परिषद, ग्रामविकास मंत्रालय यांच्याकडे केलेला पाठपुरावा तसेच ग्रामपंचायतीमार्फत केलेले ठराव, मागणी पत्र याबाबतचे सर्व पुरावे पत्रकारांसमोर सादर केले. याप्रसंगी तालुका अध्यक्ष नाना भौड, ॲड. उत्तम जाधव, उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे आदी उपस्थित होते.

# पाच हजार महिलांना देवदर्शन घडविणार

## शिरगाव सरपंच सोमनाथ ओझर्डे यांचा संकल्प

**। महाड । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील शिरगाव गावचे सरपंच व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे महाड विधानसभा उपजिल्हा समन्वयक सोमनाथ ओझर्डे यांनी करंजाडी जिल्हा परिषद गटातील पाच हजार महिलांना देवदर्शन घडवण्याचा संकल्प केला असून, त्याची सुरुवात शनिवार, दि. ८ नोव्हेंबर रोजी विन्हेरे गावातून चतुर्थीच्या दिवशी गणपतीपुळे येथे देवदर्शनाच्या यात्रेने केली.



सोमनाथ ओझर्डे यांनी करंजाडी जिल्हा परिषद गटातील पाच हजार महिलांना देवदर्शन घडविण्याचा संकल्प सोडला असून, त्याची सुरुवात विन्हेरे गावातील १३० महिलांना राज्य परिवहन महामंडळाच्या तीन बसमधून सकाळी नऊच्या सुमारास गणपतीपुळे येथील गणपतीच्या देवदर्शनासाठी रवाना झाल्या. यावेळी सोमनाथ ओझर्डे यांच्या पत्नी प्राजक्ता ओझर्डे, शिरगाव उपसरपंच सौ. सागवेकर, प्रिया नष्टे, नितेश जंगम, नरेश जाधव, अक्षय भोसले, प्रतीक जगताप, माऊली खेडेकर उपस्थित होत्या.

# विषारी नागाला सर्पमित्राकडून जीवदान

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

चिरनेर येथील पत्रकार दत्तात्रेय म्हात्रे यांच्या शेतशिवारातील बांधावर असलेल्या जाळ्यात भक्ष्याच्या शोधात आलेला साधारणतः पाच-सहा फूट लांबीचा विषारी नाग जाळ्यात अडकून पडला होता. स्थानिक सर्पमित्र जयवंत ठाकूर यांना शेतावर विषारी नाग असल्याची माहिती शेतकरी



कृष्णा म्हात्रे यांच्याकडून मिळताच, त्यांनी घटनास्थळ गाठले. त्यानंतर जयवंत ठाकूर यांनी या विषारी नागाची जाळ्यातून सोडवणूक करून जीवदान दिले. हा विषारी नाग रात्रीच्या वेळी भक्ष्याच्या शोधात आला असावा. मात्र, शिकार करण्याआधीच तो जेरबंद झाल्याने जाळ्यात निपचित पडला होता. मात्र, सर्पमित्र जयवंत ठाकूर यांनी या त्याची सुटका करून जीवदान दिले.

# दीपक तेंडुलकर यांचा राजीनामा

**रोहा:** रोहा अष्टमी नगरपालिका निवडणुकीच्या तोंडावर रोहा शिवसेना (उबाठा) शहरप्रमुख दीपक तेंडुलकर यांनी आपल्या शहर प्रमुखपदासहित शिवसेना सदस्यत्वपदाचा जिल्हा प्रमुख सुरेंद्र म्हात्रे यांच्याकडे राजीनामा दिला आहे. या घटनेमुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. आपल्या राजीनामा पत्रात शहर प्रमुख दीपक तेंडुलकर यांनी कोणत्याही नेत्यांवर आरोप न करता सदर राजीनामा स्वखुशीने देत असल्याचे नमूद केले आहे. कित्येक वर्ष शहर प्रमुख पदावर काम करण्याची संधी दिल्याबद्दल त्यांनी पक्षनेतृत्वाचे आभारदेखील मानले आहेत. पक्ष संघटना बळकट करणेकामी वेळ देता येत नसल्याचे त्यांनी म्हटले आहे.

# मनोज विष्णू घरत यांची निवड

**। उरण । प्रतिनिधी ।**

उलवे नोड येथील शिवसेना शिंदे गटाचे मनोज विष्णु घरत यांनी केलेल्या पक्ष संघटनेसाठी केलेले योगदान लक्षात घेता त्यांच्या कार्याची वरिष्ठांनी दखल घेत त्यांच्यावर युवासेना मावळ लोकसभाप्रमुख पदाची जबाबदारी देण्यात आली.

नुकताच युवासेना कार्याध्यक्ष पूर्वेश भाई सरनाईक व युवासेना मुख्य सचिव राहुल लोंढे व किरण साळी (युवासेना सचिव) यांच्या उपस्थितीत मनोज घरत यांची युवासेना मावळ लोकसभा प्रमुखपदी नियुक्ती पत्र देण्यात आले. मनोज घरत यांच्या या निवडीबद्दल त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

**जाहीर नोटीस**

सर्वांना या नोटीसने असे कळविणेत येते की, जिल्हा रायगड, तालुका अलिबाग पैकी मौजे पेझारी येथील, खालील वर्णनाची मिळकत शोभा दशरथ टेमकर, प्रफुल्ल कृष्णा पाटील, महेश कृष्णा पाटील, पल्लवी नारायण गायकर, विशाखा विश्वास केतकर, आरती विश्वनाथ रोटकर आणि वंदना वामन सावंत यांचे खुद्द मालकीची आहे.

| गट/सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर. पॉ.) | आकार (रू.-पै.) |
|---|---|---|---|
| ५८ | १ अ | ०-३९-८ | ५-६९ |

आमचे अशिलांनी सदर जमिन मिळकत खरेदी करण्याबाबत सदर सहमालकांबरोबर साठेकरार केला असून, सदर खरेदी व्यवहार पूर्ण करण्यापूर्वी वर नमूद गट/सर्व्हे नंबर ५८/१अ या मिळकतीमध्ये त्रयस्थ व्यक्तीची/बँकेची/पतसंस्थेची काही जडजोखीम असल्यास अगर कोणताही वाद असल्यास त्याची माहिती मिळविण्याकरिता ही जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

तरी, मौजे पेझारी येथील गट/सर्व्हे नंबर ५८/१ अ या मिळकतीमध्ये वर नमूद मालकांव्यतिरिक्त इतर कोणाचाही दान, गहाण साठेकरार, वहिवाट, अग्रहक्क, रक्कमेचा बोजा, पोटगी अथवा अन्य कोणत्याही प्रकारे हक्कसंबंध असल्यास व आमचे अशीलांनी ठरविलेल्या व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास, सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील आणि त्यानंतर येणारी कोणतीही आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

तारीख : ०८/११/२०२५ सही/-

**ॲड. राजेंद्र मधुसूदन कुंटे**
शांतादुर्गा कोऑप. हौसिंग सोसायटी,
मारुती नाका, अलिबाग रायगड.
मोबाईल: ९२७०१६२९२९

## पान १ वरून

### भरदिवसा म्हात्रे ज्वेलर्सला गंडा

ज्वेलर्सने विश्वास ठेवून दागिने दिले. मात्र, अनेक दिवस उलटूनही दागिने परत घेऊन आला नाही. त्यामुळे फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर अलिबाग पोलीस बुधवारी (दि.५) सायंकाळी गुन्हा दाखल करण्यात आला. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी या गुन्ह्यातील आरोपी ऋषीकेशला अटक केली. त्याला न्यायालयात हजार करण्यात आले असता, पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. त्याची कसून चौकशी केली असता, अन्य आरोपींनी रसिका नामक एका महिलेला दागिने दिल्याची माहिती समोर आली आहे. अन्य आरोपींचा शोध पोलीस घेत असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

### अलिबाग स्थानकात स्लॅब कोसळला

कायमच आहे. पावसाळ्यात गळती लागण्याचे प्रकार घडत असतात. जुन्या इमारतीमध्ये आरक्षण कक्ष, पार्सल कक्ष, विद्यार्थी पास कक्ष, प्रवासी प्रतिक्षालय, अलिबाग-पनवेल विनाथांबा नियंत्रण कक्ष आणि उपाहारगृह आहे. या इमारतीला तडे पडले आहे. पावसाचे पाणी या इमारतीमध्ये येत असल्याने अनेकवेळा प्लास्टिक बादलीचा आधार घेण्याची वेळ कर्मचाऱ्यांवर येते. जीर्ण इमारतीमधील उपाहारगृहाच्या बाहेरच्या भागातील स्लॅब शुक्रवारी रात्री अचानक कोसळला. काही तरी कोसळल्याचा आवाज आल्यावर अनेकांची धावाधाव सुरु झाली. त्याठिकाणी कोणी नसल्याने सुदैवाने जीवितहानी टळली. अलिबाग एसटी बस स्थानकाचा कारभार जुन्याच इमारतीमध्ये चालत असल्याने प्रवाशांसह कर्मचाऱ्यांची सुरक्षा वाऱ्यावर असल्याचे चित्र शुक्रवारी घडलेल्या घटनेमुळे प्रकर्षाने समोर आले आहे. अलिबाग एसटी बसस्थानकात असलेले खड्डे, अस्वच्छता, अनियमित एसटी बसेस, अपुऱ्या बसेस अशा अनेक समस्या असून, स्लॅब कोसळणे ही एक समस्या अधिक वाढली असल्याचे दिसून आले आहे.

### उरणमध्ये मास्तराने केला मेहुण्याच्या पत्नीचा विनयभंग

मात्र, फिरायला नेण्याऐवजी त्याने त्यांना उरण येथील जेएनपीए कामगार वसाहतीतील भाड्याच्या घरात आणले. तिथे या मास्तरने स्वतःच्या मेहुण्याच्या पत्नीचा विनयभंग करून शिवीगाळ व मारहाण केली. एवढ्यावर न थांबता, रात्री दहा ते अकरा वाजताच्या सुमारास दोन अनोळखी व्यक्तींना घरात बोलावून त्यांच्याकडून पैसे घेतले आणि त्या महिलेला त्यांच्या तावडीत सोपवले, असा भयंकर आरोप संबंधित महिलेनं केला आहे.

या प्रकरणाची साक्ष महिलेची नणंद असल्याचं सांगण्यात आलं आहे. आरोपी सुहास शिंदे, प्रवीण राजाराम गजांकूश आणि दोन अनोळखी व्यक्ती अशा पाच जणांवर गुन्हा दाखल झाला असून, न्हावा शेवा पोलीस ठाण्यात त्यांची चौकशी सुरू आहे. तथापि, अद्याप कुठल्याही आरोपीला अटक झालेली नाही, अशी माहिती तपास अधिकारी चौधरी यांनी दिली आहे.

दरम्यान, आरोपींकडून फिर्यादी महिलेविरुद्ध सातारा जिल्ह्यातील शाहू पोलीस ठाण्यात चोरी आणि फसवणुकीचा गुन्हा दाखल असल्याचं समोर आलं आहे. मात्र, या आरोपांचा आधार घेऊन महिला तक्रारीचं गांभीर्य कमी करता येणार नाही, असा जनमतात सूर आहे.

या प्रकरणानंतर उरणच्या शैक्षणिक क्षेत्रात खळबळ उडाली असून, समाजमन संतप्त झालं आहे. शिक्षकासारख्या जबाबदार पदावर असलेल्या व्यक्तीकडून असं कृत्य झाल्याने पालक आणि नागरिकांमध्ये संताप उसळला आहे. विद्यार्थ्यांना संस्कार देणारा शिक्षकच राक्षसी कृत्य करतो, तर समाजाचं भविष्य कोण घडवणार? असा जळजळीत सवाल उपस्थित होत आहे.

### महाविकास आघाडीतूनच निवडणूक लढणार

पक्षप्रमुखांच्या मार्गदर्शनाखाली पक्षाच्यावतीने नगरपरिषदांच्या निवडणुकांसाठी तयारी झाली आहे. उमेदवारांची पडताळणीसाठी आढावा बैठक घेण्यात आली. अलिबाग नगरपरिषदेचा विचार करता, नऊ ते दहा इच्छुक उमेदवारांची नावे देण्यात आली आहे. ज्या उमेदवारांनी कामे केली आहेत, सेवा केली आहे, त्या तीन ते चार सक्षम उमेदवारांचा विचार करून हक्काचे प्रतिनिधीत्व देण्यात यावे, अशी आमची भूमिका आहे.

महाविकास आघाडीच्या माध्यमातून निवडणूक लढविली जाणार आहे. मतदारांची मानसिकता व कामे यांचा विचार करून उमेदवार निवडून आणून सत्ता स्थापन करता येईल, याचा विचार बैठकांमध्ये करण्यात आला आहे. शेकापचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील तसेच अलिबाग नगरपरिषदेतील शेकापचे नेते मंडळीसोबत चर्चा झाली आहे. चर्चेच्या वाटाघाटी चालू आहेत. सकारात्मक चर्चा झाली आहे. त्यावर लवकरच भूमिका स्पष्ट होणार असल्याचे संपर्क प्रमुख प्रसाद भोईर यांनी सांगितले.

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस कळविण्यात येते की, मौजे भोईघर, ता. मुरूड जि.रायगड येथील खालील नमुद असलेली जमिन मिळकत. सदर मिळकतीचे विद्यमान मालक प्रफुल्ल गजानन रोहेकर यांनी विक्री व्यवहारास काढलेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजाविरहित असल्याचा भरोसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीशी विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटिस प्रसिद्ध करण्याचे काम आमच्याकडे दिलेले आहे. त्या संबंधीत मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे,

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे आर | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| भोईघर ता. मुरूड | १९ | ०-१२-६०<br>पो.ख. ०-००-४०<br>एकुण ०-१३-०० | १.५८ |

वर वर्णन केलेली मिळकत या जाहिर नोटिसचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीच्या संदर्भात इतर कोणाचीही गहाण, दान, बक्षिस, लीज, फरोक्त, पोटगी, साठेकरार वहिवाटीचे येणेजाणेचे मार्ग, वारसहक्क आदी कोणत्याही प्रकारचे हक्क व हितसंबंध असल्यास वा त्यांचे वरील मिळकतीच्या सदर विक्री व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणारे यांच्याकडे कळवावी. येणेप्रमाणे सदर विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा व्यवहार पुर्ण करतील. व त्यानंतर मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधन कारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

दि. ०८/११/२०२५

**ॲड. मोहनिश मनोहर ठाकुर**
रा. चिंचघर, पो. बोर्ली, ता. मुरूड, जि. रायगड
मो.नं. ८०८००१९११५

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस कळविण्यात येते की, मौजे भोईघर, ता. मुरूड जि.रायगड येथील खालील नमुद असलेली जमिन मिळकत. सदर मिळकतीचे विद्यमान मालक प्रमिला प्रभाकर महाडीक यांनी विक्री व्यवहारास काढलेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजाविरहित असल्याचा भरोसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीशी विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटिस प्रसिद्ध करण्याचे काम आमच्याकडे दिलेले आहे. त्या संबंधीत मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे,

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे आर | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| भोईघर ता. मुरूड | १८ | ०-१९-५०<br>पो.ख. ०-००-५०<br>एकुण ०-२०-०० | ३.५१ |

वर वर्णन केलेली मिळकत या जाहिर नोटिसचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीच्या संदर्भात इतर कोणाचीही गहाण, दान, बक्षिस, लीज, फरोक्त, पोटगी, साठेकरार वहिवाटीचे येणेजाणेचे मार्ग, वारसहक्क आदी कोणत्याही प्रकारचे हक्क व हितसंबंध असल्यास वा त्यांचे वरील मिळकतीच्या सदर विक्री व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणारे यांच्याकडे कळवावी. येणेप्रमाणे सदर विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा व्यवहार पुर्ण करतील. व त्यानंतर मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधन कारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

दि. ०८/११/२०२५

**ॲड. मोहनिश मनोहर ठाकुर**
रा. चिंचघर, पो. बोर्ली, ता. मुरूड, जि. रायगड
मो.नं. ८०८००१९११५

# भोईरांना तळोजात पाठवा

## शल्यचिकित्सकांना आमदारांचा कॉल?

**पान १ वरुन :** २०१२ मध्ये दिलीप भोईर व त्यांच्या साथीदारांनी चोंढी येथील व्हि टेक कॉम्प्युटर सेंटरवर हल्ला करून काही जणांना मारहाण करत जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. याप्रकरणी दिलीप भोईर यांच्यासह २१ आरोपींना अलिबाग न्यायालयाने ३० ऑक्टोबररोजी ७ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली. शिक्षा सुनावल्यापासून दिलीप भोईर यांच्यासह चार आरोपी प्रकृती अस्वास्थ्यामुळे अलिबाग जिल्हा रुग्णालयात उपचार घेत होते. मात्र, गुरुवारी रात्री अचानक या सर्वांना तळोजा कारागृहात हलवण्यात आले. भूमीपूजनाच्या कार्यक्रमात आमदारांनी शल्यचिकित्सकांना फोन करुन भोईरांना तळोजात पाठविण्याचे आदेश दिला असल्याचा व्हिडिओ व्हायरल होत आहे. याबाबत सत्यता पडताळण्यासाठी शल्यचिकित्सकांसोबत संपर्क करण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांनी फोन उचलला नाही. त्यामुळे डॉ. निशिकांत पाटील यांच्या कामकाजावर संशय निर्माण झाला असल्याची चर्चाही जोर धरीत आहे.



दरम्यान, न्यायालयाच्या निकालाविरोधात उच्च न्यायालयात दाद मागण्याची तयारी सुरू आहे. आगामी जिल्हा परिषद निवडणुकीसाठी दिलीप भोईर आवास जिल्हा परिषद मतदारसंघातून शिंदे गटाचे संभाव्य उमेदवार होते. मात्र, न्यायालयाच्या निर्णयामुळे त्यांच्या उमेदवारीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. अलीकडेच दिलीप भोईर यांनी भाजपने हकालपट्टी केल्यामुळे शिंदे गटात प्रवेश केला. अलिबाग विधानसभा मतदारसंघातील जिल्हा परिषदेच्या निवडणुकीच्या नियोजनाची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली होती. त्यामुळे शिंदे गटातील जुन्या कार्यकर्त्यांमध्ये नाराजी होती. मात्र, भोईर यांना शिक्षा झाल्यामुळे त्यांचा मार्ग मोकळा झाला असल्याने जुन्या कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण असल्याचीही चर्चा होती. आता हे प्रकरण नेमकं काय वळण घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे. आमदार दळवी यांच्या या प्रकारामुळे भोईर यांच्या समर्थकांमध्ये दळवी यांच्याविरोधात तीव्र नाराजी निर्माण झाली असल्याची चर्चा सुरु आहे. दळवींनीच भोईर यांना अडकविण्याचा प्रयत्न केला की काय, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. आगामी जिल्हा परिषद निवडणुकीत आवास मतदारसंघासाठी दिलीप भोईर इच्छुक उमेदवार होते. शिंदे गटातून ते उभे राहणार होते. मात्र, आता दळवी यांच्या या व्हिडीओमुळे दळवींबाबत वेगवेगळ्या प्रकारच्या चर्चेला ऊत आला आहे. दिलीप भोईर हे गेल्या अनेक महिन्यांपासून शिंदे गटात कार्यरत आहेत. भोईर यांच्या आगमनाने शिंदे गटातील जुन्या कार्यकर्त्यांमध्ये दळवींबाबत धुसफूस सुरू होती. मात्र, ते उघड बोलत नव्हते. भोईर यांना शिक्षा झाल्याने शिंदे गटातील काही जुन्या कार्यकर्त्यांचा मार्ग मोकळा झाला असल्याची चर्चा आहे. त्यामुळे दिलीप भोईर आगामी काळात काय भूमिका घेणार याकडे आता लक्ष लागून राहिले आहे.

दिलीप भोईर यांच्यावर रक्तदाबासह इतर आजारांबाबत जिल्हा सामान्य रुग्णालयात गेल्या पाच दिवसांपासून सुरु होते. मात्र, 'त्यांना डिस्चार्ज देऊन तळोजाला पाठवा', आमदारांच्या या सोशल मीडियावरील व्हायरल व्हिडीओमुळे जिल्हा शल्यचिकित्सक मोठ्या अडचणीत सापडण्याची शक्यता आहे. तो संपर्क साधण्यामागील नक्की उद्देश काय, असा सवाल जनतेमधून उपस्थित केला जात आहे.

### ...म्हणून भोईरांवर सुरु होते उपचार

दिलीप भोईर यांना रक्तदाबाचा त्रास असल्यामुळे त्यांना जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यांच्यावर गेल्या चार ते पाच दिवसांपासून उपचार सुरु होते. त्यांची प्रकृती स्थिर असल्यामुळे त्यांना गुरुवारी रात्री तळोजा कारागृहात पाठविण्यात आले. मात्र, अचानक रात्री त्यांना का सोडण्यात आले, आमदारांनी शल्यचिकित्सकांवर दबाब का आणला? नेमका प्रकार काय, याबाबत सध्या संपूर्ण तालुक्यात चर्चा सुरु आहे.

### शल्यचिकित्सकांवर कारवाईची मागणी

शल्यचिकित्सक डॉ. निशिकांत पाटील यांनी आमदारांसोबत संबंध जोपासण्यासाठी भोईरांच्या आरोग्याशी खेळ केला का? आमदारांच्या आदेशावर रुग्णाला डिस्चार्ज देता येतो का? रुग्णाचे आरोग्यदेखील आता आमदारांच्या हातात आहे का? असे एक ना अनेक प्रश्न नागरिकांनी उपस्थित केले असून, आरोग्यासोबत खेळ करणाऱ्या डॉ. निशिकांत पाटील यांच्यावर तात्काळ कारवाई करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

## निवडक

### जिल्हा रुग्णालयातील धोबी घाटात साप

**रायगड :** अलिबागमधील जिल्हा रुग्णालयातील धोबी घाट रुममध्ये सापाचा वावर असल्याचे समोर आले आहे. शनिवारी सकाळी या रुमध्ये साप आढळून आल्यामुळे सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयातील चादर, बेडसीट व उशी कव्हर, रुग्णांचे गणवेश इत्यादी कपडे रुग्णांना वापरण्यासाठी दिले जातात. हे कपडे स्वच्छ ठेवण्यासाठी रुग्णालयाच्या आवारात स्वतंत्र धोबी घाट रुम आहे. या रुममध्ये कपडे धुतल्यानंतर ते सुकवून घडी घालून पुन्हा रुग्णांना वापरण्यासाठी दिले जातात. मात्र, याच धोबी घाटमधील रुमध्ये सापाचा वावर असल्याची भीती निर्माण झाली आहे. या रुममध्ये कपडे अस्ताव्यस्त टाकलेले असतात. हा परिसर स्वच्छ ठेवला जात नसल्याने साप व इतर दंश करणारे प्राणी या रुममध्ये घुसत आहेत. त्यामुळे त्यांचा वावर वाढण्याची शक्यता वर्तविली जात आहे. दरम्यान, शनिवारी (दि.८) सकाळी या रुमध्ये एक भला मोठा साप आढळून आला. सर्पमित्राच्या मदतीने त्या सापाला काढण्यात यश आले.





### वारळकरांच्या घशाला कोरड

**म्हसळा :** तालुक्यात आतापर्यंत महसुली नोंदीनुसार तब्बल ५९५३ मिमी पाऊस पडला आहे. मेंदडी धरण ओव्हरफ्लो होत असतानादेखील वारळ गावातील ग्रामस्थांना गेल्या सहा दिवसांपासून पिण्याचे पाणी मिळालेले नाही, अशी तक्रार ग्राम स्थांनी ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, तहसीलदार आणि गटविकास अधिकारी यांच्याकडे केली आहे. प्रशासन यंत्रणेच्या दुर्लक्षामुळेच गावात पाणीपुरवठा ठप्प झाल्याची ग्रामस्थांची तक्रार आहे. ग्रामस्थ पुनित राम सावंत आणि चंद्रकांत हरिभाऊ पाटील यांनी दिलेल्या लेखी तक्रारीत नमूद केले आहे की, उपसरपंच हे मुंबईत राहतात, त्यामुळे स्थानिक प्रश्नांकडे योग्य लक्ष दिले जात नाही. ग्रामीण पाणीपुरवठा विभागातील अभियंता यांनी सांगितले की, धरणातून पुरवठ्याची देखभाल आणि दुरुस्तीची जबाबदारी स्वतंत्र एजन्सीकडे आहे. मात्र, त्यासाठी ग्रामपंचायतीचा समन्वय आवश्यक आहे. येत्या काही दिवसांत पाणीपुरवठा पूर्ववत करण्यात येईल. तसेच, योजना हस्तांतरण केली असल्याचे सांगत ग्रामपंचायतीने लक्ष घालणे आवश्यक असल्याचेदेखील त्यांनी सांगितले.

### भिवपुरी स्थानकातील लिफ्ट बंद



**नेरळ :** मध्य रेल्वेवरील भिवपुरी रेल्वे स्थानकातील लिफ्ट काही दिवसांपासून बंद आहे. त्यामुळे प्रवाशांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे. दरम्यान, बंद पडलेली लिफ्ट त्वरित सुरू करा, अशी मागणी कर्जत येथील सामाजिक कार्यकर्ते पंकज मांगीलाल ओसवाल यांनी रेल्वे प्रशासनाकडे केली आहे.

मागील काही दिवसांपासून भिवपुरी रेल्वे स्थानकात नवीन लिफ्ट बसण्यात आली आहे. त्यामुळे प्रवाशांना याचा खूप फायदा होत आहे. खास करून ज्येष्ठ नागरिकांना व महिलांना याचा खूप फायदा होत आहे. परंतु, गेल्या काही दिवसांपासून भिवपुरी रेल्वे स्थानकातील ही लिफ्ट बंद असल्यामुळे याचा त्रास प्रवाशांना करावा लागत आहे. त्यामुळे ही बंद पडलेली लिफ्ट त्वरित सुरू करावी, अशी मागणी कर्जत येथील पंकज मांगीलाल ओसवाल यांनी रेल्वे प्रशासनाकडे केली आहे.

### नागरिक त्रस्त

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

अलिबाग-वडखळ या २३ किलोमीटर लांबच्या मार्गाची परिस्थिती प्रवाशांसाठी चिंतेची बाब बनली आहे. पावसाळ्यात या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्यामुळे वाहतूक अत्यंत हळूहळू आणि कठीण होत आहे. वाहनचालक आणि पर्यटक हे दोघेही या मार्गावरून जाताना सतत त्रास सहन करतात. अनेक प्रवाशांनी या रस्त्याची स्थिती अक्षरशः चाळण झाल्यासारखी असल्याचे म्हटले आहे. या मार्गाचा मुख्य उद्देश जिल्ह्यातील पर्यटनाला चालना देणे आहे. रायगडमध्ये प्रत्येक हंगामात पर्यटकांची संख्या वाढत असते. परंतु, खराब रस्त्यांमुळे प्रवाशांकडून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.





● कोकण मराठी साहित्य परिशद, महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक मंडळ आणि कलारंग संस्थेच्यावतीने जिल्हा साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले असून या निमित्त अलिबागमध्ये ग्रंथ दिंडी काढण्यात आली होती. यावेळी ज्येश्ठ कवी अरुण म्हात्रे, जिल्हा सरकारी वकील प्रसाद पाटील व साहित्य रसिक सहभागी झाले होते. (छायाचित्र : समीर मालोदे)

### किनारे बहरले

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

रायगड जिल्ह्यात पर्यटकांचे आगमन होण्यास सुरवात झाली आहे. रायगड जिल्ह्यात बारमाही पर्यटन सुरु असते. नुकताच पावसाळा संपला असून, हिवाळी पर्यटनाला सुरुवात आला आहे. पर्यटन दृष्टीने हा जिल्हा विकसित होत आहे. गेल्या काही वर्षात पर्यटकांमध्ये वाढ झाली आहे. अलिबाग, मुरुड, श्रीवर्धन समुद्र किनारी असलेलं स्वच्छ पाणी, मोकळे आणि स्वच्छ बीच, मुंबईसह राज्यभरातील पर्यटकांसाठी आकर्षणाचे बिंदू ठरत आहे. त्यामुळे कोकणाच्या निसर्गात पर्यटन बहरलेला पाहायला मिळत आहे. त्यामुळेच जिल्ह्यातील किनारे येथील ऐतिहासिक, धार्मिक ठिकाणे यामुळे पर्यटकांसाठी आवडीचे ठिकाण ठरत आहे.

### 'नगरपरिषदेच्या निवडणुकीत आचारसंहितेचे पालन करा'

**| मुरुड-जंजिरा | प्रतिनिधी |**

आगामी मुरुड नगरपरिषद निवडणूक भयमुक्त व पारदर्शक वातावरणात पार पडावी, कुठेही आचारसंहितेचा भंग नागरिकांकडून होऊ नये, यासाठी शनिवारी (दि.७) मुरुडचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांनी मुरुड शहर हद्दीतील प्रतिष्ठित नागरिक, शांतता कमिटी सदस्य, मोहल्ला कमिटी सदस्य, महिला दक्षता समिती सदस्य, ज्येष्ठ नागरिक तसेच सर्व पक्षांच्या पदाधिकाऱ्यांची शांतता समिती बैठकीचे येथील दर्या सारंग हॉल येथे संपन्न झाली.



ही बैठक तहसीलदार आदेश डफळ यांच्या अध्यक्षतेखाली व मुख्याधिकारी सचिन बच्छाव, अनिकेत जगदाळे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. यावेळी माजी नगरसेवक प्रमोद भायदे, संजय गुंजाळ, संदीप पाटील, स्नेहा पाटील, मंगेश दांडेकर, जनार्दन कंधारे, कुणाल सतवीडकर आदी मान्यवर उपस्थित होते.

### बालविवाहमुक्त भारतासाठी जनजागृती

- न्या. तेजस्विनी निराळेंचे मार्गदर्शन
- डीकेटी शाळेत विधी साक्षरता कार्यक्रम संपन्न

**| अलिबाग | विशेष प्रतिनिधी |**

नॅशनल एज्युकेशन डेनिमित्त जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि चिंतामणराव केळकर विद्यालय, अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने विधी साक्षरता आणि जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा उपक्रम चिंतामणराव केळकर विद्यालय, अलिबाग येथे पार पडला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन विद्यालयाच्या शिक्षिका तृप्ती बोरे यांनी केले. त्यांनी विद्यार्थ्यांना कार्यक्रमाचे उद्दिष्ट आणि विधी साक्षरतेचे महत्त्व सांगितले.

यांप्रसंगी असिस्टंट एलईडीसीएस ॲड. पियुष गडे यांनी नॅशनल एज्युकेशन डेचा संदर्भ सांगत मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या शिक्षण क्षेत्रातील कार्याची आणि योगदानाची माहिती दिली. त्यांनी विद्यार्थ्यांना 'राइट्स ऑफ चिल्ड्रन' म्हणजेच मुलांचे अधिकार, शिक्षणाचे मूल्य आणि त्याचा व्यक्तिमत्त्व विकासावर होणारा परिणाम याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. यानंतर डेप्युटी चीफ एलईडीसीएस ॲड.



मनीषा नागावकर यांनी विद्यार्थिनींना पोस्को कायदा, बालविवाह प्रतिबंध कायदा तसेच महिलांवरील अत्याचार प्रतिबंधक कायदा याविषयी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश तथा सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड तेजस्विनी निरळे होत्या. त्यांनी 'बालविवाह मुक्त भारत' या संकल्पनेवर भर देत बालविवाह प्रतिबंधक कायद्याचे महत्त्व विशद केले. बालविवाह घडवून आणणे किंवा प्रोत्साहन देणे हे गुन्हा असल्याचे सांगून त्यांनी विद्यार्थ्यांना '१०९८' या चाइल्डलाइन क्रमांकावर तक्रार नोंदविण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाला विद्यालयातील शिक्षिका तसेच विद्यार्थिनींची उपस्थिती मोठ्या संख्येने होती. या विधी साक्षरता उपक्रमातून शिक्षणाचे मूल्य, महिलांचे व मुलांचे हक्क आणि कायद्याची जनजागृती विद्यार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचली.

### एकविरा देवी पदयात्रेचा आरंभ



**| अलिबाग | प्रतिनिधी |**

श्रद्धा, भक्ती आणि सामाजिक ऐक्याचा सुंदर संगम घडवणारी कोर्लई ते एकविरा देवी पदयात्रा यंदाही मोठ्या भक्तिभावात आणि जल्लोशात पार पडली. साई सेवक एकविरा मंडळातर्फे दरवर्षीप्रमाणे या भव्य सोहळ्याचे आयोजन यंदाही करण्यात आले असून, शनिवारी (दि.८) कोर्लई येथून पालखी मिरवणुकीसह या यात्रेचा शुभारंभ झाला. भक्तिगीतांच्या गजरात, साई नामस्मरणात आणि दिंडीच्या तालात निघालेल्या या पदयात्रेत महिला मंडळी, तरुणाई आणि सर्व समाजघटकांनी मोठ्या श्रद्धेने सहभाग घेतला. दि.१२ नोव्हेंबर रोजी एकविरा देवीचे दर्शन होणार आहे.

या सोहळ्याला शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे रायगड जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे, उपजिल्हाप्रमुख प्रशांत मिसाळ, तसेच मा. जिल्हा परिषद सदस्या राजश्री मिसाळ यांच्या प्रमुख उपस्थितीने कार्यक्रमाला विशेष ऊर्जाभरित स्वरूप प्राप्त झाले.

साई सेवक एकविरा मंडळाचे संस्थापक गजानन पद्माकर पाटील, अध्यक्ष अभय जयकृष्ण पाटील, उपाध्यक्ष मारुती लक्ष्मण पाटील, खजिनदार जितेंद्र नारायण पाटील आणि सहखजिनदार राजू पुरुषोत्तम आगरावकर यांनी या भक्तिमय यात्रेचे उत्तम नियोजन केले असून, सर्व भाविकांना उत्साहाने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

ही पदयात्रा केवळ धार्मिक परंपरा नसून, श्रद्धा, समर्पण आणि सामाजिक ऐक्याचे प्रतीक ठरत आहे, अशी भावना भाविकांनी यावेळी व्यक्त केली.



# जिल्ह्यात ‘वंदे मातरम्’चा शतकोत्तर साजरा

‘वंदे मातरम्’ ही १८७० मध्ये बंकिमचंद्र चटर्जी यांनी उच्च संस्कृतमय बंगाली भाषेत लिहिलेली एक कविता आहे. त्यांनी ही कविता त्यांच्या १८८२ च्या ‘आनंदमठ’ या बंगाली कादंबरीत समाविष्ट केली होती. इंग्रजांचे कुटिल कारस्थान आणि जुलमी राजवटीमुळे भारतीयांमध्ये स्वातंत्र्याची भावना जागृत होऊ लागली. अशा या वातावरणात ‘वंदे मातरम्’ या गीताचा जन्म झाला. ७ नोव्हेंबर १८७५ या दिवशी बंकिम चंद्र चट्टोपाध्याय यांनी ‘वंदे मातरम्’ ही कविता कलकत्त्याजवळील नैहाटी कांटालपाडा या आपल्या जन्मगावी लिहिले. ही कविता सर्वप्रथम रवींद्रनाथ टागोर यांनी १८९६ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात गायली होती. ऑगस्ट १९४७ मध्ये ब्रिटिश राजवट संपण्यापूर्वी काँग्रेस कार्यकारिणीने ऑक्टोबर १९३७ मध्ये या गाण्याचे पहिले दोन श्लोक भारताचे राष्ट्रीय गीत म्हणून स्वीकारले होते. २४ जानेवारी १९५० रोजी भारतीय संविधान सभेने ‘वंदे मातरम्’हे राष्ट्रीय गीत म्हणून स्वीकारले. याप्रसंगी भारताचे पहिले राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद म्हणाले की, ‘जन गण मन’ या भारताच्या राष्ट्रगीताच्या बरोबरीने या गाण्याचा देखील सन्मान केला पाहिजे. यंदा ‘वंदे मातरम्’ या गीतास १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने जिल्ह्यातील विविध महाविद्यालयात ‘वंदे मातरम्’ समुह गीताचे आयोजन करण्यात आले होते.

## विद्यार्थ्यांनी आळवले वंदे मातरम्चे स्वर

**। मुरुड-जंजिरा । प्रतिनिधी ।**

कौषल्य रोजगार उद्योजकता आणि नाविन्यता विभाग व सांस्कृतिक कार्य विभाग महाराष्ट्र षासन यांच्या संयुक्त विद्यमाने संयोजन समिती मुरुड व षासकीय औद्योगिक प्रषिक्षण संस्था यांनी शुक्रवारी (दि.७) ‘वंदे मातरम्’वर्धापन दिनानिमित्त मुरुड येथील सर एस.ए. विद्यालयात हजारो विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात तालुक्यातील जिल्हा परिशद षाळा, नगरपरिशद षाळा, सर एस.



ए. हायस्कूल, अंजुमन इस्लाम हायस्कूल, वसंतराव नाईक महाविद्यालय, नजिकेता हायस्कूल, सुविद्या विद्यालय, ओंकार विद्या मंदीर, आय.टी.आय. विहूर आदी षाळा सहभागी झाल्या होत्या .

यावेळी तहसिलदार आदेष डफफळ, पोलीस निरीक्षक परषुराम कांबळे, सरोज राणे, भास्कर मोरे, एम .एस. जाधव, संजय ठाकूर, अंकेष पाटील, आषिल कुमार ठाकूर, दीपिका रोटकर, संदेष चोरघे, किरण देषमुख, स्वप्निल गुंजाळ व नाक्ती आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमा दरम्यान वीर कोंडाजी फर्जंद औ.प्र. संस्थेच्या विद्यार्थ्यांनी ‘वंदे मातरम्’ या राष्ट्रीय गीताच्या आधारावर क्रांतीकारकांनी दाखविलेले धैर्य आणि देषप्रेम व्यक्त करणारे बहारदार नाट्य सादर करून देषभक्ती जागवली .

तसेच, दीपाली रोटकर यांनी ‘वंदे मातरम्’ गीताची महती वर्णन करताना क्रांतीकारकांची प्रेरणादायी गाथा देषाच्या एकता आणि अखंडतेसाठी सदैव स्फूर्तिदायी ठरेल, असा विश्वास व्यक्त केला. कार्यक्रमाचा समारोप करताना तहसिलदार आदेश डफफळ म्हणाले की,‘वंदे मातरम्’ हे गीत स्वातंत्र्याचा उद्घोश तथा असंख्य वीरांच्या संघर्शाची प्रेरणा असुन त्याचे नित्य स्मरण केले पाहिजे, असे त्यांनी आवाहन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदेष चोरघे तर आभार प्रर्दषन स्वप्निल गुंजाळ यांनी केले.

## कुळकर्णी सभागृहात सामूहिक गायन



**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

शासकीय तंत्रनिकेतन व कौषल्य विकास विभागाच्यावतीने श्रीवर्धन षहरातील कुळकर्णी सभागृहात ‘वंदे मातरम्’ या गीताला १५० वर्शे पूर्ण झाल्याबद्दल वंदे मातरम्चे सामूहिक गायन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी जवळजवळ ५०० विद्यार्थ्यांनी आपली उपस्थिती दर्षविली होती. यावेळी येथील र. ना. राऊत विद्यालय, गोखले एज्युकेषन सोसायटी इंग्रजी माध्यम शाळा, तसेच तंत्रनिकेतनचे विद्यार्थी या कार्यक्रमामध्ये सहभागी झाले होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक तंत्रनिकेतनचे प्राचार्य उपासनी यांनी केले. या कार्यक्रमासाठी मनोज गोगटे, संतोश चौकर, अपर्णा बंदरकर, अनिता कांबळे, विप्राली पुसाळकर, राजे यांच्यासह प्रमुख वक्ते म्हणून ॲड. संजीव डेगवेकर उपस्थित होते.

यावेळी ॲड. डेगवेकर यांनी वंदे मातरमब या गीताबद्दल आपले मनोगत अत्यंत अभ्यासपूर्ण पद्धतीने सादर केले. तर, शासकीय तंत्रनिकेतन विद्यालयातील विद्यार्थ्यांनी निबंध व चित्रकला स्पर्धेत भाग घेतला होता. त्यामध्ये यषस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा देखील यावेळी सत्कार करण्यात आला. यावेळी तंत्रनिकेतन विद्यालयातील शिक्षिकेने भारत मातेची आरती देखील सादर केली. त्यानंतर ‘वंदे मातरम्’ या विशयावरती एक लघु नाटिका देखील सादर करण्यात आली. ही नाटिका दर्पण जाधव, सिद्धांत भगत, सिद्धांत वाणी, सार्थक करंजकर, शिवम वाणी, अथर्व भोईर, अनिरुद्ध चौले, ओम तबीब आणि स्नेहा चौकर यांनी सादर केली. तसेच, राज्यस्तरीय क्रीडापटू स्वरा गुरव हिचा देखील सत्कार करण्यात आला.



## म्हसळ्यात स्वातंत्र्य सैनिकांचा सत्कार

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

‘वंदे मातरम्’ गीतास १५० वर्ष पूर्ण झाली असुन या दिनाचे औचित्य साधून म्हसळा ठाकरे गट युवा सेनेतर्फे भारतीय सैन्य दलातील माजी सैनिक बळीराम गीते यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी म्हसळा ठाकरे गटाचे युवासेना अधिकारी कौस्तुभ करडे, शहरप्रमुख अभय कलमकर, अंकुश नटे, अल्पसंख्यांक सेलचे शौकत हजवाने, नौमान वजगरे, फहद पठाण आदी मान्यवर उपस्थित होते. महाराष्ट्रात हा दिन साजरा करण्यात येत असल्याने या दिनानिमित्त शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, न्यू इंग्लिश स्कूल आणि जुनिअर कॉलेज म्हसळा येथेही ठाकरे गटाच्यावतीने वंदे मातरमब गिताचे सामूहिक गायन करण्यात आले. यानिमित्त शाळांमध्ये विविध चित्रकला, देश भक्तिपर गित, भाषण अशा प्रकारच्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

सहभागी झालेल्या आणि उल्लेखनीय कामगिरी केलेल्या विद्यार्थ्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला.

## मोरे महाविद्यालयात पथनाट्याचे सादरीकरण

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र शासनाच्या कौषल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभाग आणि सांस्कृतिक विभाग यांनी दिलेल्या निर्देषानुसार पोलादपूर तालुक्यात ‘वंदे मातरम्’ गीताचा शुक्रवारी (दि.७) शतकोत्तर सुवर्णमहोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी षिवाई शिक्षण प्रसारक मंडळ महाड संचलित चोळई येथील सुंदरराव मोरे महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर समूह गायनासह आयटीआय पोलादपूरच्या पथनाटयाद्वारे देषभावना प्रकट करणारा ठरला.



यावेळी पोलादपूरचे तहसीलदार कपिल घोरपडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक आनंद रावडे, सुभाष साळुंखे, ॲड. संतोश काळे, सुनील बलखंडे, चारूलता बढीये तसेच ‘वंदे मातरम्’ समूह गायन संयोजन समिती सदस्य शैलेश पालकर, प्रमोद दीक्षित, शिरीश साबळे, प्रिती बुटाला, अस्मिता पवार, दिलीप साबळे, अरुणा भागवत, संजय कळंबे, गिरीधर दरेकर, सुभाष अधिकारी, स्मिता पवार, किसन सुरवसे, मुख्याध्यापक साळुंखे आदी उपस्थित होते.

‘वंदे मातरम्’ या राष्ट्रीय गीताच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी वर्च्या निमित्ताने पोलादपूर येथील नरवीर तानाजी मालुसरे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांच्या नियोजनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी पोलादपूर आयटीआयच्या विद्यार्थ्यांनी ‘वंदे मातरम्’ गीताची निर्मिती, स्वातंत्र्य लढयातील ‘वंदे मातरम्’चे महत्व आणि स्वातंत्र्योत्तर भारतात ‘वंदे मातरम्’ गीताकडून आपल्या नागरिकांना प्राप्त होणारी प्रेरणा असा आषय असणारे पथनाटय प्रभावीपणे सादर केले. याप्रसंगी पांडुरंग मोरे भारतीय स्वातंत्र्य लढयातील असंख्य क्रांतिकारकांना कशा प्रकारे प्रेरणा दिली, याची उदाहरणे दिली.



## द्रोणागिरी आयटीआयमध्ये देशभक्तीचा उत्सव

**। उरण । प्रतिनिधी ।**

द्रोणागिरी शासकीय औद्योगिक प्रषिक्षण संस्था, उरण येथे ‘वंदे मातरम्’ गीतास १५० वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने ‘सार्थ षताब्दी सोहळा’ देशभक्तीपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रायगड जिल्हा व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी आणि संस्थेचे प्राचार्य मा. वे. पिल्ले हे होते.

यावेळी प्रमुख व्याख्याते म्हणून प्रा. डॉ. पराग कारुळकर यांनी ‘वंदे मातरम्’ गीताचे ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि राष्ट्रप्रेरणादायी महत्त्व स्पष्ट केले.

स्वातंत्र्यपूर्व काळात या गीताने क्रांतिकारकांना प्रेरणा दिली असल्याचे देखील त्यांनी सांगितले. अध्यक्षीय भाशणात मा.वे. पिल्ले यांनी प्रषिक्षणार्थ्यांना षिस्त, राष्ट्रनिश्ठा आणि स्वदेशी मूल्ये अंगीकारण्याचे आवाहन केले. प्रमुख उपस्थिती म्हणून आय. एम. सी. समितीचे सदस्य भिंडे यांनी विद्यार्थ्यांना स्वदेशीचा अवलंब करून देषहितासाठी कार्य करण्याचा संदेष दिला. यावेळी सर्व प्रषिक्षक, कर्मचारी आणि प्रषिक्षणार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निदेषक ए.एस. पाटील यांनी केले. तर, आभारप्रदर्शन एन डी. देशमुख यांनी प्रशिक्षकांच्यावतीने केले.

## पिंपळोलीमधून दिंडी आळंदीकडे मार्गस्थ

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील वारकरी दिंड्यांचे आळंदीकडे प्रस्थान सुरू झाले आहे. पिंपळोळी येथून निघालेली दिंडी नेरळ येथे पोहचली असून दिंडीच्या स्वागतासाठी तळवडे येथे रुक्मिणी मातेची सुंदर रांगोळी काढून रस्ते सजवण्यात आले होते.

संत ज्ञानेश्वर महाराज संजीवनी समाधी सोहळ्यानिमित्त आळंदी येथे माऊलींच्या समाधी सोहळ्याचे दर्षन घेण्यासाठी अनेक भाविक महाराट्रातून दिंडी घेऊन जात आहेत. त्यातच कर्जत तालुक्यातील अनेक दिंड्या आळंदीकडे प्रस्थान होत आहेत. त्यात खांडस पिंपळोली,



पिंपळोली, कोल्हारे, भडवल तसेच नेरळ परिसरातील अनेक भाविक या दिंडीमध्ये सहभागी झाले असून माऊलींच्या दर्षनासाठी निघाले आहेत. नेरळ परिसरातील दिंडी पिंपळोली येथून सुरू होऊन तलवाडी मार्गे नेरळ येथून कर्जत मार्गे आळंदीकडे प्रस्थान होत असते. त्यातच तलवाडा येथील रोहिदास माळी हे दरवर्षी आपल्या गावामध्ये या दिंडीचे स्वागत करत असतात.

तळवडे येथील अर्चना रोहिदास माळी हे दाम्पत्य दरवर्षी प्रमाणे यावर्शी विठ्ठल रुक्मिणी मातेची सुबक रांगोळी काढून भाविकांचे स्वागत करण्यात आले.

तळवडे गावातून ही पालखी नेरळमध्ये पोहचली. नेरळ येथील मारुती मंदिरामध्ये अल्पहार करून दिंडी वडवली मार्गे कर्जतकडे प्रस्थान झाली. दडीचे अध्यक्ष नागो गवळी, उपाध्यक्ष रामदास साळुंखे, कार्याध्यक्ष भरत भगत, दिलीप महाराज, नरेश महाराज, दिनेष ऐनकर, लहू म्हसकर, चिंधू बाबरे, मनोहर धुळे, दीपक धुळे यांच्या सहकार्यातून निघालेला हा दिंडी सोहळा माऊलींच्या समाधीकडे प्रस्थान झाला आहे.

## पालीत पायी दिंडी सोहळयाचे आयोजन

**। पाली / वाघोषी । प्रतिनिधी ।**

महावैश्णव संत शिरोमणी श्री संत ज्ञानेश्वर महाराज समाधी संजीवनी सोहळ्यानिमित्त सुधागड तालुक्यातील हरिओम संतनाम वारकरी संप्रदाय मंडळाच्यावतीने ‘पायी दिंडी सोहळा २०२५’ चे आयोजन करण्यात आले. यावेळी श्रीक्षेत्र पाली ते देवाची आळंदी या मार्गावर पायी दिंडी सोहळा भाविक-वारकऱ्यांच्या उपस्थितीत अत्यंत उत्साहात सुरू झाला आहे. या दिंडीच्या प्रस्थानावेळी वारकऱ्यांनी भक्तिभावाने संतांची जयघोषणा केली. तसेच अभंग गायन, टाळ-चिपळ्यांच्या आवाजात वातावरण दुमदुमून गेले होते. यावेळी दिंडी मार्गावर सर्वत्र भाविकांनी स्वागताच्या तयारीसह विविध सेवा उपक्रम राबवले. त्याच पार्श्वभूमीवर भेरव येथे दीपक पवार यांच्या बंगल्यावर वारकऱ्यांसाठी अल्पोहार आणि वस्त्रदान सेवा करण्यात आली.



या उपक्रमात सर्व वारकऱ्यांना अल्पोपहारासह दिंडीतील वयोवृद्ध वारकऱ्यांसाठी विश्रांतीची सोय करण्यात आली होती. दीपक पवार यांनी मागील आठ वर्षापासून सातत्याने ही सेवा निरंतरपणे आणि निःस्वार्थ भावनेने चालू ठेवली आहे. या सेवाकार्यात दिलीप देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व भक्त आणि ग्रामस्थ एकत्र येऊन सेवा कार्यात सहभागी झाले. कार्यक्रम ादरम्यान वारकरी भगिनींनी रिंगण आखत नृत्य केले, फुगड्या घातल्या, अभंग गायले आणि ‘ज्ञानोबा माउली तुकाराम’ अशा जयघोषात परिसर भक्तिमय केला. यावेळी उत्तमराव देशमुख, शशिकांत देशमुख, हेमंत मुजुमदार, अमित गायकवाड, गणेश देषमुख, विनायक देशमुख, शशिकांत बिरवाडकर, दिलीप कोल्हटकर, संतोश देषमुख, किसान देशमुख, रवी सागळे, गणेष सागळे, कैलास सागळे, चंदु सागळे, बाळासाहेब सागळे, सुमन देशमुख आदींसह वाघोशी पंचक्रोषीतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्थानिक व्यावसायिक सुखावले | भाविकांमुळे व्यवसाय तेजीत

## बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी भाविकांची मांदियाळी

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

**संकष्टी चतुर्थीनिमित्त अश्टविनायक तीर्थक्षेत्र पालीतील श्री बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी शनिवारी (दि.८) भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. यावेळी मंदिर परिसराला यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते. संपूर्ण जिल्ह्यासह महाराष्ट्राच्या विविध भागांतून भाविक दर्शनासाठी दाखल झाले होते.**

श्री बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी शनिवारी काही भाविक पायी आले होते, तर काहींनी पायी दिंडीचे आयोजन केले होते. यादरम्यान, श्री. बल्लाळेश्वर मंदिर व गाभाऱ्यात फुलांची सजावट करण्यात आली



होती. श्री. बल्लाळेश्वरला देखील आभूषण व वस्त्र परिधान करण्यात आले होते. तसेच, मंदिराबाहेर रांगोळी देखील काढण्यात आली होती. बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी जिल्ह्यासह विविध भागातून भाविक दाखल झाले होते. त्यामुळे येथे चांगली आर्थिक उलाढाल झाली असून येथील स्थानिक व्यावसायिक सुखावले आहेत.

भाविकांमुळे येथील हॉटेल व्यावसायिक, लॉजिंग बोर्डिंग वाले, पापड, लोणचे मिरगुंड विक्रेते, पेढेवाले, छोटे मोठे दुकानदार व इतर व्यावसायिकांचा धंदा तेजीत होता. मंदिर परिसरातील दुकाने व हॉटेल ग्राहकांनी गजबजले होते. भाविकांच्या सोयीसाठी बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टच्यावतीने चोख व्यवस्था करण्यात आली होती. विविध वस्तूंनी भरलेली दुकाने व गर्दी यामुळे मंदिर परिसर गजबजलेला दिसत होता. मंदिर परिसराला यात्रेचे स्वरूप आले होते. अनेक भाविक स्वतःची वाहने घेवून आले होते. तर, काही लक्झरी किंवा खासगी बसेसने आले. यामुळे पालीतील रस्त्यावर वाहतूक कोंडी झाली होती. मात्र, नाक्यावर तैनात असलेले वाहतूक पोलीस आणि श्री बल्लाळेश्वर मंदिराच्या सुरक्षा रक्षकांनी वाहतूक सुरळीत करण्यासाठी सतत प्रयत्न केले.

> **संकष्टी चतुर्थी असल्यामुळे मोठ्या प्रमाणात भाविक दर्शनासाठी आले होते. या भाविकांनी दुकानातून चांगली खरेदी केली. त्यामुळे धंदा चांगला झाला आहे.**
> **- मनोहर मोरे, व्यावसायिक, पाली**

> **भाविकांच्या येणाऱ्या गर्दीचा अंदाज घेऊन योग्य व्यवस्थापन व नियोजन करण्यात आले होते. देवस्थान ट्रस्टच्यावतीने भाविकांच्या सोयीसाठी शुद्ध थंड पाणी व इतर व्यवस्था करण्यात आली आहे. नाममात्र दरात प्रसादालयामध्ये प्रसाद (भोजन) उपलब्ध आहे. सुरक्षारक्षक तैनात आहेत. भाविकांना राहण्यासाठी दोन सुसज्ज व सर्व सोयी-सुविधांनी युक्त आधुनिक भक्त निवास आहेत. रांगेत उभे राहण्यासाठी रेलींग व शेड उभारण्यात आली आहे. वाहने पार्क करण्यासाठी देवस्थानची दोन भव्य मोफत पार्किंग देखील आहे. तसेच, सुसज्ज स्वच्छतागृह देखिल आहेत. त्यामुळे दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची कुठल्याही प्रकारची गैरसोय होत नाही. देवस्थान ट्रस्टतर्फे सर्वतोपरी योग्य व्यवस्था करण्यात आली आहे.**
> **- जितेंद्र गद्रे, अध्यक्ष, बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्ट, पाली**



## महागणपतीच्या दर्शनासाठी पहाटेपासूनच गर्दी

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

तीर्थक्षेत्र चिरनेर नगरीत शनिवारी (दि.८) संकष्टी चतुर्थी निमित्ताने, भाविकांनी श्री महागणपतीच्या दर्शनासाठी पहाटेपासूनच रांगा लावल्या होत्या. काही भाविकांनी पायी वारी करीत मंदिर गाठून श्रींचे दर्शन घेतले. यावेळी मंदिरात भजनांचा सूर देखील ऐकायला मळिाला. रायगड, नवी मुंबईसह हजारोंच्या संख्येने भाविक दाखल झाले होते. विषेशता छोट्या-मोठ्या व्यवसायिकांचा व्यवसाय तेजीत होता. परिसरातील दुकाने ग्राहकांनी गजबजली होती. श्री महागणपती मंदिर परिसरात फळे, कंदमुळे व रानमेवा घेऊन अनेक आदिवासी व आगरी समाजाच्या महिला विक्रेत्या विक्री करताना दिसून आल्या. त्यामुळे श्री महागणपती मंदिर परिसरात मोठी वदर्ळ दिसून आली.

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**९ नोव्हेंबर**

१) श्री. नारायण गणपत पवार चेंढरे-अलिबाग, ९-११-१९३५
२) श्री. सुभाष पुरूषोत्तम क्षीरे चेंढरे-अलिबाग, ९-११-१९४०
३) श्री. अशोक वसंत म्हात्रे चेंढरे-अलिबाग, ९-११-१९४४
४) श्री. सुमंत अनंत म्हात्रे थळ-आगार, अलिबाग, ९-११-१९४२
५) श्री. लायकअल्ली अब्दुल अनवारे, अलिबाग ९-११-१९५३

## मोफत नेत्रतपासणी शिबिराचे आयोजन

**माणगाव :** शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्ट माणगाव यांच्यातर्फे मोफत नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन बुधवार, दि.१२ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ ते दुपारी २ यावेळेत जुने एसटी स्टँड माणगावजवळ वृत्तपत्र विक्रेते नितीन मेथा यांच्या बाजूला असणाऱ्या महेंद्र पितांबर मेथा यांच्या प्रशस्त जागेत हॉलमध्ये करण्यात आले आहे.

# दहा महिन्यांपासून मुहूर्ताच्या हिंदोळ्यावर

## • जेएनपीएच्या ई-स्पीडबोट सेवेच्या ट्रायलरनला सुरुवात

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

जेएनपीएची मुंबईशी जोडणारी मागील दहा महिन्यांपासून मुहूर्ताच्या हिंदोळ्यावर हेलकावे खाणारी ई-स्पीड सेवेच्या रनट्रायलला गुरुवारपासून (दि. ६) सुरूवात झाली आहे. त्यामुळे येत्या दोन-चार दिवसांत जेएनपीए-मुंबई सागरी मार्गावरील प्रवासी वाहतूक सुरू होऊन तासाचा प्रवास ३५-४० मिनिटातच होणार आहे.

उरण-नेरुळ रेल्वे मार्गावर प्रवासी वाहतुकीला सुरूवात झाल्यानंतर जेएनपीए-मुंबई सागरी मार्गावरील प्रवासी संख्या मोठ्या प्रमाणावर घसरली आहे. त्यामुळे जेएनपीएला जेएनपीए-मुंबई या सागरी प्रवासी मार्गावरील बोट सेवेचा खर्च परवडेनासा झाल्याने आणि प्रवासी वाहतूकसाठी वापरण्यात येणाऱ्या जुनाट लाकडी बोटी खार्चिक व सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातूनही उपयुक्त नसल्याने जेएनपीएने ई-स्पीड बोटीचा पर्याय निवडला आहे. प्रदूषणविरहित इलेक्ट्रॉनिक बॅटऱ्यांवर चालणाऱ्या



अत्याधुनिक तंत्रज्ञान व सोयी सुविधांनी सुसज्ज असलेल्या दोन ई-स्पीडबोटींचे कंत्राट माझगाव डॉक बिल्डर्स लिमिटेड कंपनीला बोटी पुरवठा व हाताळणीचे काम देण्यात आले आहे.

दहा वर्षे ई-स्पीडबोटींची सेवा पुरवण्यासाठी जेएनपीएने ३७ कोटी ८९ लाख ९४ हजार १९० रुपये खर्चाची तरतूदही केली आहे. उन्हाळी हंगामात २०-२५ प्रवासी व पावसाळी हंगामात १०-१२ क्षमतेच्या दोन स्पीडबोट बोटी फेब्रुवारी २०२५ पासूनच प्रवासी वाहतुकीसाठी जेएनपीटीच्या सेवेत दाखल होणार होत्या. मात्र, स्पीडबोटींचा वेग, प्रवासी वाहतुकीची क्षमता, तांत्रिक अडचणींमुळे मागील दहा महिन्यांपासून ई-स्पीडबोट सेवा सुरूच झालेली नाही. यामुळे प्रवासीवर्गातून नाराजी व्यक्त करीत टीका केली जात आहे.

दरम्यान, तांत्रिक अडचणी दूर करुन माझगाव डॉक बिल्डर्स लिमिटेड कंपनीने गुरुवारपासून (६) ई-स्पीड सेवेच्या ट्रायल रनला सुरुवात केली असल्याची माहिती माझगाव डॉक बिल्डर्स लिमिटेड कंपनीचे एचआर निरज यांनी दिली. दरम्यान, ट्रायल रनही दोन दिवस घेण्यात येणार आहे. त्यानंतरच प्रवासी वाहतुकीला सुरूवात केली जाणार असल्याचेही निरज यांनी सांगितले. तर, ई-स्पीड बोटीची ट्रायल रन आजपासून सुरू करण्यात आली असल्याच्या माहितीला जेएनपीएचे उपसरंक्षक कॅप्टन बाळासाहेब पवार यांनी दुजोरा दिला. मात्र, प्रवासी वाहतूक करण्यासाठी आवश्यक सुरक्षितता, स्पीड, बॅटरी चार्जिंग आणि ई-स्पीड बोटींच्या कामगिरीबाबत समाधान केले जात नाही, तोपर्यंत ई-स्पीडबोट प्रवासी वाहतुकीला परवानगी दिली जाणार नसल्याचेही पवार यांनी स्पष्ट केले.

**प्रवाशांचा भ्रमनिरास**

*सागरी ई- स्पीडबोट सेवा बंदरात कामकाजासाठी मुंबईतून ये-जा करणाऱ्या जेएनपीएचे कामगार, प्रकल्पग्रस्त, कस्टम, एअरफोर्स, सीआयएसएफ आणि फॅमिली मेंबर्स, पोर्ट युजर्स आदी कामगारांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. यामुळे वेळही वाचण्यास मदत होणार आहे. मात्र, फेब्रुवारीमध्ये सुरू होणारी ई-स्पीड बोटसेवा दहा महिने उलटून गेले गेल्यानंतरही अद्यापही सुरू झालेली नाही. यामुळे प्रतीक्षेत असलेल्या प्रवाशांचा भ्रमनिरास झाला आहे.*

# 'वाहतूक कोंडीमुक्त निजामपूरसाठी बायपास करा'

**| माणगाव | प्रतिनिधी |**

रायगड जिल्ह्यातील औद्योगिक व पर्यटनदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा आंतरराष्ट्रीय दिघी पोर्ट माणगाव निजामपूर मार्गे विळे-भागाड एमआयडीसी हा रस्ता सध्या अरुंद व जीर्ण अवस्थेत असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. त्यामुळे या रस्त्याचे तातडीने रुंदीकरण करून निजामपूर शहरासाठी स्वतंत्र बायपास रस्ता करण्यात यावा, अशी ठोस मागणी निजामपूर ग्रामपंचायतीचे माजी सरपंच तथा निजामपूर विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष दत्तूशेठ पवार, युवा नेते मिलिंद फोंडके, सुधीर पवार यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांचे शिष्टमंडळ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे यांना लवकरच भेटून सविस्तर चर्चा करून निवेदन देऊन लक्ष वेधणार आहेत.

या रस्त्याचा कारभार सध्या महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या (एमएसआरडीसी) अखत्यारित आहे. मात्र निधीअभावी रुंदीकरणाची कामे प्रलंबित आहेत. त्यामुळे ग्रामस्थांनी या मार्गाला केंद्र सरकारच्या खत्यारीतील येणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाकडे वर्ग करण्याची मागणी केली आहे. असे झाल्यास केंद्र सरकारकडून निधी मिळून या रस्त्याचे कायमस्वरूपी रुंदीकरण शक्य होईल, असा नागरिकांना विश्वास वाटत आहे. निजामपूर परिसरातील नागरिकांच्या म्हणण्यानुसार, हा मार्ग रुंद झाल्यास केवळ औद्योगिकच नव्हे तर पर्यटन क्षेत्रालाही नवी उभारी मिळेल. खा. सुनील तटकरे यांना भेटून निजामपुरातील रस्त्याचे रुंदीकरण आणि बायपास रस्ता या दोन मागण्यांवर तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी करणार आहेत. हा रस्ता राष्ट्रीय महामार्गाकडे वर्ग झाल्यास रायगड जिल्हा औद्योगिक, व्यापारी आणि पर्यटन क्षेत्रात एक नवा आयाम गाठेल, असे मतही पवार यांनी व्यक्त केले.

# संभे येथून आळंदीकडे पायी वारी दिंडीचे प्रस्थान

**| खांब | प्रतिनिधी |**

गेल्या २५ .वर्षांची अखंड परंपरा राखत याही वर्षी रोहा तालुक्यातील संभे येथून आळंदीकडे शुक्रवार, दि. ७ नोव्हेंबर रोजी रौप्यमहोत्सवी पायी वारी दिंडीचे प्रस्थान मोठ्या भक्तिभावाने व उत्साहात आळंदीकडे झाले आहे.

स्वा.सु.गुरूवर्य अलिबागकर बाबा यांच्या कृपाछत्राखाली व स्वा.सु.गुरूवर्य गोपाळ बाबा यांच्या आशीर्वादाने तसेच रायगड भूषण नारायण महाराज दहिंबेकर व रायगड भूषण वै. नारायण महाषळे यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या या दिंडी सोहळ्याचे उगमस्थान भैरीनाथ मंदिर येथील असून, दि.७ रोजी या दिंडीचे आळंदीकडे प्रस्थान झाले आहे.

या सोहळ्यात दैनंदिन वास्तव्याच्या ठिकाणी नित्यनेमाने काकड आरती, नामस्मरण, सायं. हरिपाठ, हरिकीर्तन, हरिजागर आदी कार्यक्रम संपन्न होणार असल्याची माहिती आयोजकांकडून देण्यात आली आहे. तर समाजातील अनेक दिग्गज मान्यवरांनी या दिंडीचे पूजन करून दर्शन घेतले. तर सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी अध्यक्ष तुकाराम बांदल, उपाध्यक्ष अनंत सानप, सेक्रेटरी पांडुरंग सानप, गणेश नलावडे, खजिनदार जितेंद्र दहिंबेकर, दत्ता तेलंगे आदी पदाधिकारी यांच्यासह दिंडीचे सर्व सदस्य तसेच ज्ञानेश्वर सत्संग वारकरी सेवा मंडळ संभे व ग्रामस्थ मंडळ, महिला मंडळ व वीर हनुमान क्रीडा मंडळ संभे अधिक मोलाचे सहकार्य करीत आहेत.



# श्रीहर्ष कांबळे प्रमुख समन्वयक

**पाली/बेणसे :** रायगड जिल्ह्यात आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) पक्षातर्फे श्रीहर्ष श्रीकांत कांबळे (जिल्हा सचिव) यांची प्रमुख समन्वयक म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. श्रीहर्ष कांबळे यांचे जिल्ह्यातील सर्व पदाधिकाऱ्यांकडून शुभेच्छा देऊन स्वागत करण्यात येत आहे.



# बिबट्याप्रकरणी शासकीय यंत्रणा अलर्ट

**| खांब | प्रतिनिधी |**

रोहा तालुक्यातील कृषीनिष्ठ बाहे गावाच्या हद्दीत बिबट्याचे झालेले दर्शन व उमटलेले पावलांचे ठसे याबाबत शासकीय यंत्रणेने गंभीर दखल घेतली असल्याचे दिसून येत आहे. बुधवर, दि.५ रोजी बाहे गावाच्या हद्दीतील शेतजमिनीच्या भागात बिबट्याच्या पावलांचे ठसे उमटले असल्याचे येथील काही नागरिकांना आढळून आले. तर काही नागरिकांना बिबट्याचे दर्शन झाले असल्याची बातमी बघता बघता परिसरासह तालुक्यात पसरल्याने सर्वत्र एकच खळबळ उडाली आहे.

सदरील बिबट्याच्या पावलांचे ठसे ही बातमी खरी आहे की निव्वळ अफवा आहे, याबाबत खातरजमा करण्यासाठी येथील जागरूक नागरिकांनी त्वरित वन विभागाशी व सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्था कोलाड यांच्याशी संपर्क साधला असता दोन्ही टीमचे पथक बाहे गावाच्या हद्दीतमध्ये बिबट्याच्या पावलांचे ठसे आढळून आले. अधिक संशोधनानुसार सदरील ठसे हे बिबट्याच्या पावलांचे असल्याचे निदर्शनास आले व या भागात बिबट्या फिरत असल्याच्या वृत्ताला दुजोरा मिळाला आहे.

बिबट्याचे झालेले दर्शन व पाऊलखुणा यामुळे सर्वत्र भीतीदायक परिस्थिती निर्माण झाली होती. परंतु, लोकांच्या मनात निर्माण झालेली भीती दूर करण्यासाठी रोहा तालुका वनविभाग व अन्य शासकीय यंत्रणा खडबडून जाग्या झाल्या असून, बिबट्याची शोधमोहीम अधिक तीव्र करण्यात आली आहे. तर रोहा वनपरीक्षेत्र अधिकारी महेंद्र दबडे, मेढा वनपाल सचिन ठाकूर, वनरक्षक शुभदा वरघडे व वनसेवक प्रकाश घडवले यांच्या नेतृत्वाखाली व स्थानिक ग्रामस्थांना सोबत घेऊन शोधमोहीम हाती घेण्यात आली आहे.



> **"लोकांच्या मनातील भीती दूर करण्यासाठी वन विभागाने अतिशय चांगली मोहीम हाती घेतली असून, विभागातील गावागावात देखील जनजागृती करण्यात येत आहे."**
> **– मनोज थिटे, पोलीस पाटील, बाहे**

# साप्ताहिक राशिभविष्य ०९ ते १५ नोव्हेंबर २०२५

**ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग**
**मोबा.९४०४७९१७९८**

## धनप्राप्तीचे योग

**मेष :** या सप्ताहात सासरच्या पक्षाकडून कुठल्याही प्रकारचे वाद वाढू देऊ नका हेच तुमच्यासाठी उत्तम असेल. तुमची मुले बरीच प्रगती करतील ज्यामुळे तुमचे मन आनंदित राहील. कौटुंबिक जीवनात ऊन सावलीची स्थिती राहील. तसेच, वडिलांच्या आरोग्यविषयक समस्या येऊ शकतात त्यांची काळजी घेणे गरजेचे आहे. तुमच्या घरामध्ये बदल होऊ शकतात आणि तुम्हाला तुमच्या जवळच्या लोकांपासून लांब जावे लागू शकते. तुमच्या कुटुंबात काही शुभ कार्य होण्याची ही शक्यता आहे. विद्यार्थ्यांना चांगल्या गुणांची प्राप्ती होईल आणि ते उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात बरेच चांगले प्रदर्शन करण्यात यशस्वी राहतील. आर्थिक रूपात प्रगती करण्याची संधी तुम्हाला मिळेल आणि परदेशातील संपर्काने तुम्हाला चांगला लाभ प्राप्त होईल. **महिलांना–** या सप्ताहात तुम्हाला अचानक धनप्राप्तीही होऊ शकते. नातेवाइकांकडून आणि सहयोगींकडून तुम्हाला सहयोग ही मिळेल. हा कालावधी करिअरला उच्चता देणारे आहे म्हणून या कालावधीचे स्वागत करा आणि प्रत्येक संधीला आत्मसात करण्याचा प्रयत्न करा. **शुभ दिनांक –** ०९,११.

## नोकरदारांना दिलासा मिळेल

**वृषभ :–** या सप्ताहातील ग्रहमान पाहता या काळात प्रत्येक बाबतीत सावधगिरीने वागल्यास अपेक्षित गोष्टी सहजपणे साध्य करता येणे शक्य होईल. नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल. मार्केटिंग व बोलण्याच्या प्रभावामुळे आपण कामकाजात पुढे जाऊ शकाल. मित्रमंडळींच्या गाठीभेटी होतील. आर्थिक बाजू सावरता येईल. स्थावरबाबतीत प्रश्नांना चालना मिळेल. क्रीडा व राजकीय क्षेत्रातील व्यक्तींना हा काळ उत्तम राहील. तांत्रिक शिक्षण क्षेत्रातील व्यक्तींना प्रगतीची संधी मिळू शकेल. प्रकृती जपा. विशेषतः दातदुखी, सांध्यातील वेदना याबाबत लक्ष द्या. जोडीदाराची साथ मिळेल. या राशीतील व्यक्तींचे स्वास्थ्य चढ उताराचे राहील. तुम्हाला काम आणि आराम यामध्ये संतुलन ठेवण्याची आवश्यकता असेल कारण, तुम्हाला शारीरिक समस्यांचा सामना करावा लागू शकतो. विशेष रूपात मांसपेशी आणि नसांच्या संबंधित समस्या येऊ शकतात. **महिलांना–** विवाहित व्यक्तींसाठी ह्या आठवड्याची सुरवात अधिक चांगली नाही ते जोडीदाराच्या क्रोधाला बळी पडण्याची शक्यता आहे. मुलांसाठी हा काळ सामान्य राहील. त्यांचे स्वास्थ्य प्रभावित राहू शकते. **शुभ दिनांक –**१२,१४.

## आरोग्याची काळजी घ्या

**मिथुन:–** या सप्ताहातील ग्रहमान पाहता आपल्या करिअरला ह्या आठवड्याचा पूर्वार्ध कौटुंबिक जीवनासाठी अनुकूल नाही आणि आई वडिलांचे आरोग्य ही प्रभावित राहील, परंतु उत्तरार्धातनंतर स्थिती बऱ्यापैकी अनुकूल होईल. विद्यार्थ्यांसाठी हा कालावधी अनुकूल असेल आणि त्यांना परदेशातील यूनिवर्सिटी मध्ये ॲडमिशन मिळू शकते. तुमची आर्थिक स्थिती काही आव्हानात्मक राहील आणि तुम्हाला बरेच सांभाळून चालावे लागेल अन्यथा वित्तीय संकटाचा सामना करावा लागू शकतो. तथापि, करिअरच्या दृष्टिकोनातून तुम्हाला पद प्राप्ती होऊ शकते. वर्षाच्या उत्तरार्धात कार्य क्षेत्राची स्थिती तुमच्या पक्षात येईल आणि तुम्ही प्रगती कराल. नोकरदारांना दिलासा मिळेल. सुरुवात आरोग्य संबंधित अनुकूल राहील. **महिलांना–** तुम्हाला वेळो वेळी डॉक्टरांच्या सल्ल्याची आवश्यकता असेल. म्हणून आरोग्याची काळजी घ्या आणि लहान-मोठ्या समस्यांकडे अजिबात दुर्लक्ष करू नका. प्रेमसंबंधासाठी हे वर्ष बरेचशे चांगले राहील आणि या काळात प्रेमजीवनात उत्तम फळांचा अनुभव घ्याल. **शुभ दिनांक –** ०९,१४.

## अध्यात्मिक गोष्टीत लक्ष द्या

**कर्क :** या सप्ताहातील ग्रहमान पाहता काही गोष्टींना घेऊन तुमच्या दोघांमध्ये वाद होऊ शकतो; परंतु, तुम्ही सांभाळून चालले तर विभिन्न आव्हाने आणि संकटे असूनही तुमचे प्रेमजीवन चांगले चालत राहील. तुमच्या प्रियकर किंवा प्रियसीला तुम्ही बरोबरीचा दर्जा दिला तर तुमच्या प्रेमजीवनात गोडवा येईल. विवाहित लोकांना आपल्या जीवनसाथीच्या आरोग्याची काळजी घ्यावी लागेल आणि सासरच्या पक्षाशी चांगले संबंध ठेवावे लागतील. तुम्ही आणि तुमच्या जीवनसाथीमध्ये प्रेमाची भावना वाढेल. मुलांसाठी हा काळ बराच अनुकूल राहील आणि ते शिक्षणात तसेच काही क्रिएटिव्ह क्षेत्रात काही आश्वासक निर्माण करतील. कौटुंबिक जीवनात नजर टाकली असता कुटुंबातील लोक अध्यात्मिक गोष्टीत अधिक लक्ष देतील. तथापि काही लोकांसोबत विरोधाभासाची स्थिती बनलेली राहील. **महिलांना–** धनसंबंधित वाद कुटुंबातील शांती भंग करू शकतो. वित्तीय निर्णय घेण्याआधी बरेच विचार करावे लागतील कारण आर्थिक दृष्टिकोनाने हे दिवस सामान्य राहील. **शुभ दिनांक –**११,१४.

## प्रवासाचे योग येतील

**सिंह :–** एकूण ग्रहमान पाहता हा आठवडा आपल्याला सुरुवातीला करिअरसाठी काहीसा आव्हानात्मक राहू शकतो, म्हणून तुम्हाला कठीण परिश्रम करावे लागेल. या कालावधीत तुम्ही नवीन व्यवसाय सुरु करण्यापासून सावध राहिले पाहिजे. विद्यार्थ्यांसाठी हा कालावधी सामान्य राहील प्रोफेशनल कोर्सची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना उत्तम यश मिळेल. तरीही एकूण ग्रहमान पाहता, आपल्या मनातील स्वप्नांना साकार होण्याच्या दृष्टीने हा आठवडा उत्तम राहील. नोकरदारांना दिलासा मिळेल. कलाक्षेत्राला उत्तम प्रतिसाद मिळेल. प्रवासाचे योग येतील. स्थावर मालमत्तेबाबतीतील प्रश्न सोडविता येतील. आर्थिक बाजू सुधारेल. कौटुंबिक वातावरण वादासारख्या गोष्टींनी बिघडणार नाही याची दक्षता घ्या. विद्यार्थीवर्गाला अध्ययनात विशेष मेहनतीची आवश्यकता राहील. सरकारी नियमांची पायमल्ली होणार नाही याची काळजी घ्या. **महिलांना–** आप्तेष्टांच्या गाठीभेटी होतील. प्रकृतीस्वास्थ्य जपा, खाण्यापिण्याची पथ्ये पाळा, मोसमी आजारांपासून सावध राहा. जोडीदाराची साथ मिळेल. प्रेम जीवनासाठी हाकालावधी अनुकूल राहील आणि तुमचे प्रेम जीवन उत्तम होईल. **शुभ दिनांक –** १०,१३.

## जोडीदाराची साथ मिळेल

**कन्या :–** या राशीतील जातकास एकूण ग्रहमान पाहता हा आठवडा आपण कामाचे सुयोग्य नियोजन केल्यास सर्व गोष्टी सुलभ होतील व समाधान मिळेल. सरकारी नियम व कायदा यांचे पालन करा. धार्मिक कार्यात सहभागी होण्याची संधी मिळेल. कामकाजात काही अडथळे येण्याची शक्यता आहे. व्यवसाय व करिअरबाबत संमिश्र फलिते मिळतील. आध्यात्मिक क्षेत्रातील व्यक्तींना हा आठवडा उत्तम राहील. आप्तेष्ट व मित्रमंडळींशी सौदार्याने वागणे हितकारक राहील. प्रकृतीबाबत जागरूक राहा, विशेषतः रक्तदाब, कंबरदुखीच्या त्रासापासून सावध राहा. जोडीदाराची साथ मिळेल. आपल्या तब्बेतीकडे विशेष लक्ष दिले पाहिजे आणि संतुलित दिनचर्येचे पालन केले पाहिजे. तुम्हाला पित्तसंबंधित शारीरिक समस्या होण्याची शक्यता आहे. **महिलांना–** दाम्पत्य जीवनात ऊन सावली चालू राहील. थोड्या आव्हानांसोबत तुमचे दांपत्य जीवन पुढे चालेल. तुम्हाला तुमच्या जीवनसाथी सोबत खांद्याला खांदा लावून पुढे चालले पाहिजे. तसेच कौटुंबिक जीवनात ही अडथळे येऊ शकतात. आईवडिलांचे स्वाथ्य प्रभावित राहू शकते. **शुभ दिनांक –** ०९,११.

## अनावश्यक खर्च टाळा

**तुळ :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात तुम्हाला तुमच्या ध्येयप्राप्त करण्यासाठी एकाग्र होऊन प्रयत्न करावे लागतील. वित्तीय गोष्टींमध्ये तुम्हाला काही संघर्ष करावे लागू शकतात आणि दुसरीकडे खर्चात वृद्धी होईल. तथापि, आपल्या बचतीवर लक्ष द्या आणि धन संबंधित गुंतवणूक विचार पूर्वक करा. आठवड्याची सुरुवात करिअरसाठी सामान्य रूपात शुभ राहील. तुम्ही कुठल्या मोठ्या व्यावसायिकासोबत राहून काम ही करू शकतात. प्रेमजीवनात काही दीर्घकालीन बदल होऊ शकतात, ज्यामुळे तुम्ही एक आदर्शवादी प्रेमीच्या रूपात आपली ओळख बनवाल. तरीही एका गोष्टीची तुम्हाला काळजी घावी लागेल की, एकापेक्षा अधिक लोकांमध्ये तुमची आवड वाढल्यास तुमच्या नात्यांवर प्रभाव पडू शकतो. आपले ग्रहमान पाहता आपल्या मनाप्रमाणे बहुतांशी कामे पार पडू लागल्याने खरे समाधान मिळेल. **महिलांना–** खर्चाचे प्रमाण वाढणार असल्याने अनावश्यक खर्च टाळा. आपल्या बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवा. दूरच्या प्रवासाचे बेत आखाल. कामाचा भार वृद्धिंगत होईल. **शुभ दिनांक –**१०,१२.

## खाण्यापिण्याची पथ्ये पाळा

**वृश्चिक :–** आपले ग्रहमान पाहता या सप्ताहात विद्यार्थ्यांनी अभ्यासाकडे अधिक लक्ष द्यावे असा आहे. हे दिवस विद्यार्थ्यांसाठी कठीण मेहनत करण्याचे संकेत देत आहेत, त्यामुळे उगाच रिस्क घेऊ नका. काही जुनी उधारी वसूल होण्याची शक्यता राहील. मौज-मस्तीत व आनंदात राहणे आपण पसंत कराल. प्रवासाचे योग येतील. दूरच्या मित्रमंडळींच्या संपर्कात राहाल. वादाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. प्रकृती जपा, खाण्यापिण्याची पथ्ये पाळा, मोसमी आजारांपासून सावध राहा. तरीही तुम्ही स्वास्थ्याच्या बाबतीत बरेच भाग्यशाली असाल आणि उत्तम स्वास्थ्याचा आनंद घेऊ शकाल. फक्त तुम्हाला तुमची दिनचर्या नियमित ठेवावी लागेल. या सप्ताहात प्रेमाबाबत तुम्ही चांगले दिवस अनुभवाल तुम्ही तुमच्या जोडीदाराच्या प्रति अधिक निष्ठावान बनाल. तुमच्या प्रेमात स्थिरता येईल आणि प्रिय व्यक्तीसोबत आनंददायी क्षणांचा आनंद घ्याल. **महिलांना–** जर तुम्ही विवाहित आहात, तर वैवाहिक लोकांसाठी हे दिवस मोठ्या संधींनी भरलेला राहू शकतो. तुमच्या जीवनसाथीला त्यांच्या कार्यक्षेत्रात एखादे मोठे यश प्राप्त होऊ शकते. **शुभ दिनांक –**११,१३.

## वाहन खरेदी करू शकाल

**धनु :–** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात तुम्हाला तुमच्या परिवाराला सामाजिक रूपात सन्मान आणि संपन्नता प्राप्त होईल. या राशीतील विद्यार्थ्यांना यावेळी काही मोठी संधी प्राप्त होऊ शकते. तुमच्यासाठी हा कालावधी बरेच उत्तम सिद्ध होईल. कारण, तुमचे अधिक प्रयत्न यश अर्जित करतील. आर्थिक दृष्टिकोनातून हा कालावधी बरेच अनुकूल आहे आणि धन आवक सातत्याने वाढत राहील, ज्यामुळे तुम्ही बरेच प्रसन्न राहाल. यावेळी तुम्ही वाहन खरेदी करू शकतात. करिअरच्या दृष्टिकोनाने हा सप्ताह प्रगतीशील सिद्ध होईल आणि तुमच्या करिअरमध्ये बदल होतील. स्थानपरिवर्तन होण्याची ही शक्यता आहे. या कालावधीत तुम्हाला आपल्या मित्रांचे सहयोग प्राप्त होईल, जे तुम्हाला पुढे जाण्यासाठी मदत करेल. **महिलांना–** काही वेळेसाठी जोडीदारांपासून दूर राहावे लागू शकते; परंतु याने तुमच्या नात्यामध्ये घनिष्टता येईल आणि संबंध मधुर होतील. नवविवाहितांना संतानसाठी वेळ बरीच चांगली राहील. कौटुंबिक जीवनासाठी हा कालावधी बरेच अनुकूल सिद्ध होईल. **शुभ दिनांक –** १२,१४.

## आरोग्याची काळजी घ्या

**मकर :–** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात तुम्हाला कुटुंबातील ताळमेळ, एकमेकांच्या मदतीने पुढे जाता येईल. या ग्रहस्थितीमुळे मल्टिनॅशनल कंपनीमध्ये काम करणाऱ्या लोकांसाठी हा योग संधींनी परिपूर्ण राहू शकते. एखादी चांगली ऑफर आपले आयुष्य बदलू शकते. मात्र, तुमचे स्वस्थ कमजोर राहण्याची शक्यता आहे. तुम्हाला अपचन, वायू रोग, डोकेदुखी, गुडघेदुखी, कांजण्या तसेच थकवा अश्या समस्या त्रास देऊ शकतात. उत्तम आरोग्य आयुष्यातील सर्वात मोठे धन आहे म्हणून आपल्या शारीरिक आणि मानसिक आरोग्याच्या प्रति कुठलाही निष्काळजीपणा करू नका. या कालावधीत आयुष्य जगण्याची कला शिकण्याची संधी मिळेल. तुमच्या प्रेमजीवनात रोमान्स आणि आकर्षणात वृद्धी होईल. **महिलांना–**जर तुम्ही विवाहित आहेत, तर दाम्पत्य जीवनासाठी सुरुवात काही नाजूक राहील आणि तुमच्या जीवनसाथीच्या स्वास्थ्यात समस्या येऊ शकतात. तथापि सप्ताहाच्या शेवटी बऱ्यापैकी स्थिती चांगली होईल आणि तुम्ही आपल्या दाम्पत्य जीवनात सुख अनुभवाल. **शुभ दिनांक –** ०९,११.

## परदेशयात्रा होण्याची शक्यता

**कुंभ :–** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात तुम्हाला, तुमच्या मुलांना आयुष्यात यश प्राप्तीसाठी अधिक परिश्रम करावे लागेल आणि तुमच्या कुटुंबियात या कालावधीत विवाह ठरू शकतो, होऊ शकते, कौटुंबिक जीवनासाठी हा कालावधी बऱ्यापैकी चांगला राहील आणि तुम्ही बराच वेळ तुमच्या कुटुंबातील लोकांसोबत घालवाल, ज्यामुळे आपले संबंध उत्तम होतील. विद्यार्थ्यांसाठी हा सप्ताह चांगला राहू शकते आणि नोकरीच्या शोधात असलेल्या लोकांना बऱ्याच मेहनतीनंतर नोकरी मिळू शकते. शिक्षणासंबंधित परदेशयात्रा होण्याची शक्यता आहे. आर्थिक बाबतीत मात्र या कालावधीत सामान्य फळे अनुभवाल. आपल्या घरात अधिक स्त्रोतांनी तुमची कमाई होईल. तथापि खर्चही वाढलेले राहतील. या कालावधीत तुम्ही कुठलाही नवीन व्यवसाय करू नका. तुम्हाला नोकरीत परिश्रम करण्याचा सल्ला दिला जातो. **महिलांना–** तुमच्या प्रेमजीवनात स्थिरता येईल आणि तुम्हाला प्रॉपर्टीच्या संबंधित बरेच चांगले लाभ मिळू शकतात आणि तुमचे कौटुंबिक जीवन ही बऱ्यापैकी आरामात पूर्ण होईल. घरात नवीन सदस्याचे आगमन होऊ शकते. **शुभदिनांक –** १०,११.

## आप्तेष्टांच्या गाठीभेटी होतील

**मीन :–** एकूण ग्रहमान पाहता या आठवड्याचा उत्तम कालावधी आपणास लाभल्याने, सर्व बाबतीत लाभ घेण्याची संधी दवडू नका. स्थावरबाबतच्या प्रश्नांना चालना मिळेल. आपण काळ, काम, वेळ यांचे योग्य नियोजन केल्यास भावी काळासाठी उत्तम उपयोग होईल. मुलांच्या प्रश्नांना प्राधान्य द्या. वाहनांच्या वेगावर योग्य नियंत्रण ठेवा. प्रवासाचे योग येतील. मित्रमंडळी, आप्तेष्टांच्या गाठीभेटी होतील. कलागुणांना चांगले प्रोत्साहन मिळेल. विरोधकांच्या कारवायांवर नजर ठेवा, त्यांना संधी देऊ नका. प्रकृतीची काळजी घ्या, विशेषतः उष्णतेच्या विकारांपासून सावध राहा. जोडीदाराची साथ मिळेल. मेष राशीतील व्यक्तींना उत्तरार्धात स्वास्थ्य लाभ मिळेल. सुरुवातीत स्थिती चढ-उताराने भरलेली राहील म्हणून तब्बेतीची काळजी घेणे गरजेचे आहे. प्रेमजीवनात कठीण प्रसंग येऊ शकतात; परंतु, तुमचे प्रेम मजबूत असल्याने कितीही कठीण आव्हाने आली तरी तुम्ही दोघे चांगल्या प्रकारे परिस्थितीचा सामना करू शकाल. **महिलांना–** प्रेमविवाहाची इच्छा ठेवणाऱ्या लोकांना जास्त रिस्क घ्यावी लागेल आणि खूप प्रयत्न करावे लागतील. तरीही वैवाहिक जीवन हे आनंदी राहील आणि कुठलीही मोठी समस्या येणार नाही. **शुभ दिनांक –** १२,१३.

# वंदे मातरम् गीताने जागवली देशभक्ती

**तळा :** वंदे मातरम् गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाच्या प्रांगणात (दि.७) नोव्हेंबर रोजी वंदे मातरम् सामूहिक गीत गायनाचा भव्य व उत्साहवर्धक कार्यक्रम संपन्न झाला. या निमित्ताने परिसरात देशभक्तीचे सूर घुमले व राष्ट्रभक्तीची भावना ओसंडून वाहताना दिसली. या गौरवशाली सोहळ्यास तळा तहसीलदार स्वाती पाटील, सुनील जगताप, विजय पाटील उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे भोनंग, ता. अलिबाग, जि. रायगड येथे खालील वर्णनाची मिळकत आहे. सदरची मिळकत आमचे अशील, मिळकतीचे मालकांकडुन ती कायम खरेदीने घेण्याच्या विचारात आहेत.

सदरहू मिळकत निर्वेध व बोजारहित असल्याबद्दलची खात्री मिळकतीचे मालकांनी आमच्या अशिलांस दिलेली आहे. मात्र तरीही कोणीही व्यक्तिचा सदर मिळकतीत किंवा मिळकतीच्या एखाद्या भागात विरुद्ध कब्जाने किंवा त्या भागात वारसा, गहाण, दान, विक्री, देणगी, लीज, चार्ज, ट्रस्ट, लायसेन्स, पोटगी, इजमेंट किंवा इतर कोणत्याही प्रकारचे हक्क असल्यास त्यांनी खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन आठ दिवसाच्या आत आपले कागदपत्रासह खालील पत्यावर समक्ष वा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात.

वरील मुदतीत हरकती दाखल न झाल्यास एखादा हक्क असल्यास तो रद्दबातल झाला आहे किंवा असल्यास जाणीवपूर्वक सोडुन दिला आहे असे समजुन आमचे अशील वरील मिळकतीसंबंधी नियोजित व्यवहार पूर्ण करतील व मागाहून कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतीस आमचे अशील जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक/ उपविभाग | क्षेत्र हे.आर. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| भोनंग ता. अलिबाग | ४२५ | जिरायत १-१२-०० | २५-३२ |
| | | वरकस ०-३३-४० | |
| | | इतर ०-०१-८० | |
| | | लागवड योग्य ०-०९-८० | |
| | | -//- ०-०३-०० | |
| | | एकुण १-६०-०० | |

सदरहु मिळकतीचे एकूण क्षेत्रापैकी खाते उतारा क्र. ६७४ कडे श्री. संजय गजानन खारकर यांचे नावे नमुद केलेली मिळकतीचे क्षेत्र ०-७३-६० हे. आर + पो.ख. ०-०६-४० हे. आर. एकुण क्षेत्र ०-८०-० हे. आर इतके क्षेत्र

तसेच सदरहु मिळकतीचे एकुण क्षेत्रापैकी खाते उतारा क्र. ६८८ कडे श्री. रामचंद्र हिराजी खारकर यांचे नावे नमुद केलेली मिळकतीचे क्षेत्र ०-७३-६० हे. आर + पो.ख. ०-०६-४० हे.आर. एकुण क्षेत्र ०-८०-० हे. आर. इतके क्षेत्र

उरण
०८-११-२०२५
ऑफीस-
ऑफीस नं. ९ साईआकाश अपार्टमेंट
करंजा रोड, राजपाल नाका,
डाके हॉस्पीटलजवळ उरण, ता. उरण, जि. रायगड

सही/-
**ॲड. रमाकांत पाटील**
खरेदीदाराचे वकिल

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, खाली वर्णन केलेली मिळकत आमचे अशिल यांनी **श्री. यारमहमद लल्लन खान** यांचेकडून बक्षीसपत्राने घेण्याचे ठरविले आहे.

**मौजे हनुमाननगर, ता. तळा, जि. रायगड**

| सर्व्हे नंबर | क्षेत्र हे. आर | आकार रू. पै |
|---|---|---|
| २९ | ४.०५.०० | २.०२ |

तदंगभुतः सर्व हक्क हितसंबंध यासुद्धा

तरी वरील मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा, कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, ताबा-कबजा, कुळ वहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी - हक्क, मृत्यूपत्रांकित दान, गहाण, बक्षीस, फरोक्त, लिएन वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांचे आत सकृत दर्शनी पुराव्यासह लेखी हरकत खालील सही करणार यांजकडे कळविणेची विनंती आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल बक्षीसपत्राचा व्यवहार पूर्ण करतील, मागाहून येणाऱ्या तक्रारी/हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. कळावे.

तारीख - ०९-११-२०२५

**ॲड.दिपाली राहूल शिंदे,**
बी.एल.एस, एल.एल.बी,
ॲडव्होकेट व नोटरी,
मो.न ९५६१७१९४९४
९०११७१६००१

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितास या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते, की आमच्या अशिलाने मौजे बागमांडले ता. श्रीवर्धन जि. रायगड येथील

| अ.क्र. | गट क्रमांक व उपविभाग | एकूण क्षेत्र | वरकस क्षेत्र | पो.ख. | आकार |
|---|---|---|---|---|---|
| १) | ५६२ | ०१-३६-०० | ०१-१३-०० | ०-२३-० | ०.४२ |

**जमीन मालकाचे नाव :- श्री. अमित शशांक परांजपे**

यांचेकडून जाण्या येण्याच्या रस्त्याच्या हक्कासह कायम विकत घेण्याच्या बोलीसह सदर मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याबाबत मिळकत मालकाचे म्हणणे असून ती त्याच्या आजपर्यंत ताबे कब्जा व वहिवाटीत आणि मालकी हक्कात असून प्रत्यक्ष कसवणूकी खाली आहे. सदर जमीन खरेदीसाठी आमचे अशिलांनी आवश्यक त्या संबंधित सरकारी कार्यालयाकडून योग्य ती परवानगी, वहिवाट ताबा बयाना पावती अखत्यारपत्र, साठे करार गहाण बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लीन, बक्षिशी, ट्रस्ट, पोटगी, वारसा किंवा कोणत्याही प्रकारच्या दस्ताने अथवा अन्य कोणत्याही प्रकारची कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास, तसेच नमूद मिळकतीच्या हद्दी खुणावरून कोणाचीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसाची आत संबंधितांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासहित (समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने) खाली सही करणारे वकील यांच्याकडे पाठवावे वकिलाची खात्री पटवून द्यावी विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व भुजा विरहित आहे असे समजून सदर मिळकतीवर आता कोणाचेही कोणतीही हक्क व हे संबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे गृहीत धरून आमच्याशी संबंधित मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर मागाहून उपस्थित करण्यात येणारी कोणाचीही हरकत आमचे वर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

स्थळ :- श्रीवर्धन
दिनांक :- ०८/११/२०२५
कार्यालयीन पत्ता
रा. ग स. कातकर सभागृह गाळा नं २ वाणी श्रीवर्धन

सही/-
**(ॲड. संतोष मारुती सापते)**


## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **अकाउंटट पाहिजे-** पात्रता B com, Tally अनुभव ५ वर्षे ठिकाण-बामणसुरे, चोंढी, पगार - २५००० महिना Contanct - 9823585321
- **''जन्नावार हॉस्पीटल''** अलिबागमध्ये कामासाठी मावशी व नर्सची जागा आहे. (Vacancy) Contact No : 7798034509
- **श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण,** नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधली अडचण फोन नं. ९९६०४५६९८६ अलिबाग
- **सर्वप्रकारचे विवाह/आजार,** संतानप्राप्ती/सोनेतारणावर बिनव्याजी कर्ज/शेतकरी/निराधार विधवा महिलांना दरमहा ३०००/-ठेवीदारांना दरमहा ८,०००/- घरबसल्या कायमस्वरुपी लाखो कमविण्यासाठी डॉ. नथुराम धायाशेठ मोकल, इंटरप्रायझेस शिहू (पोयनाड-नागोठणा) रायगड ४०२१०६/८२६३८९०४२३(वेळ ठरवूनच)
- **SALE OF BAGAYATI WADI.** 13 GUNTHE, @26 Lakh per Guntha, 200 Mtr. (meter) from. sea Beach. Village-THAL, Gunjal Ali, Alibag, M. 8779805353

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमच्या अशिल सौ. कल्पना राजेंद्र बोडके, रा. कर्जत, राज महेल बंगला, रूम नं. ३१६-२, सरकारी हॉस्पिटल जवळ, विठ्ठल नगर, ता. कर्जत, रायगड, ४१०२०१, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे नालधे, ता. कर्जत, जि. रायगड, येथील जमिन मिळकत**

| स.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| ३५/१०/ ब | ०.८२.०० पो.ख. ०.०५.०० एकुण ०.८७.०० | ३.६४ | श्री. विनायक भास्कर साळुंके, वैगेरे. |

यापैकी श्रीमती दिपाली योगेश कंदाडे व श्री. योगेश अनंत कंदाडे यांच्या नावे असलेले ०.२१.०० हे.आर.पॉ.क्षेत्र.

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन होणाऱ्या ०७ (सात) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वानी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- ०९/११/२०२५.

सही/-
**ॲड. उषा जे. कांबळे**
कर्जत, 'पुष्प विमल' निवास,
नानामास्तर नगर, मुद्रे
मो. नं. ७३८५००४८०६

## जाहीर सुचना

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मोजे चोंढी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील, सिटी सर्व्हे नं. ३६, क्षेत्र ४२.०२ (चौ.मी.), धारणाधिकार अ, ही जमिन मिळकत व त्यावरील ग्रुप ग्रामपंचायत किहीम मिळकत क्र. ५४४ क, ही घर मिळकत, **श्री. चंद्रकांत महादेव आमले,** राहणार जांबोशी, पो. पाबळ, ता. पेण, जि. रायगड यांच्या मालकीच्या असून, सदर मिळकतींच्या विद्यमान मालकांकडून माझे अशिलांनी सदर मिळकती कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान स्वाक्षरित झाला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे चोंढी, ता.अलिबाग, जि. रायगड येथील सिटी सर्व्हे नं. ३६, क्षेत्र ४२.०२ (चौ.मी.), धारणाधिकार अ ही जमिन मिळकत व त्यावरील ग्रुप ग्रामपंचायत किहीम मिळकत क्र. ५४४ क, ही घर मिळकत.**

सदर जमिन मिळकत व घर मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीत अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून सात (०७) दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक : ०८/११/२०२५.

सही/
**(ॲड.सतिश शंकर पाटील)**
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड.
खरेदीदाराचे वकील
मो.नं. ९८८१८५७५२९

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितास या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमच्या अशिलाने मौजे सायगाव ता. श्रीवर्धन जि. रायगड येथील

| अ.क्र. | गट क्रमांक व उपविभाग | एकूण क्षेत्र | वरकस क्षेत्र | पो.ख. | आकार |
|---|---|---|---|---|---|
| १) | ५७१ | ०२-५४-०० | ०२-३१-०० | ०-२३-० | १.२६ |

**जमीन मालकाचे नाव :- श्री. इमामूद्दीन इस्माईल उंड्रे**

यांचेकडून जाण्या येण्याच्या रस्त्याच्या हक्कासह कायम विकत घेण्याच्या बोलीसह सदर मिळकत ही निर्वेध व बोजाविरहित असल्याबाबत मिळकत मालकाचे म्हणणे असून ती त्याच्या आजपर्यंत ताबे कब्जा व वहिवाटीत आणि मालकी हक्कात असून प्रत्यक्ष कसवणूकी खाली आहे. सदर जमीन खरेदीसाठी आमचे अशिलांनी आवश्यक त्या संबंधित सरकारी कार्यालयाकडून योग्य ती परवानगी, वहिवाट, ताबा, बयाना पावती, अखत्यारपत्र, साठे करार गहाण, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लीन, बक्षिशी, ट्रस्ट, पोटगी, वारसा किंवा कोणत्याही प्रकारच्या दस्ताने अथवा अन्य कोणत्याही प्रकारची कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास, तसेच नमूद मिळकतीच्या हद्दी खुणावरून कोणाचीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसाची आत संबंधितांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहित (समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने) खाली सही करणारे वकील यांच्याकडे पाठवावे. वकिलाची खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजून सदर मिळकतीवर आता कोणाचेही कोणतीही हक्क व हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे गृहीत धरून आमच्याशी संबंधित मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर मागाहून उपस्थित करण्यात येणारी कोणाचीही हरकत आमचे वर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

स्थळ :- श्रीवर्धन
दिनांक :- ०८/११/२०२५
कार्यालयीन पत्ता
रा. ग स. कातकर सभागृह गाळा नं २ वाणी श्रीवर्धन

सही/-
**(ॲड. संतोष मारुती सापते)**


## REQUIRE COMMERCIAL PREMISES AT ALIBAUG ON RENT FOR BANK

A Reputed Scheduled Multistate co-op Bank requires premises for its Branch in the Prime locality of Alibaug on Rental or Long lease basis.
1000 square feet of carpet area, On the ground floor, with Good Frontage.
Interested Owners may send their proposals to Email address : **kulkarnisunil92@gmail.com,** or WhatsApp on 8237241445 At the earliest.
We reserve our right to accept or reject the proposal without giving any reason. Brokers also can send proposals, however pls note that there won't be any brokerage from the Bank.


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुंद केलेली जमीन खालील जमीन मालक यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली जमीन मिळकत आमचे खरेदीदारांनी विकत घेण्याचे ठरविले असुन त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

**मौजे दिघेवाडी, ता. सुधागड, जि. रायगड येथील जमीन मिळकत.**

**मिळकतीचे वर्णन**

| जमिन मालकाची नांवे | गट/स.नं. | क्षेत्र हे आर | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| श्री. सुबोध रामचंद्र गोसले | २०२ | ०-५५-०० पैकी ०-२१-०० | ०-३० |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही वहिवाट ताबा बयाणा पावती, साठेकरार, गहाण बोझा, भाडेपट्टा, जप्ती, लिज, लीएन जाणे येणेचे मार्ग अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासह समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. त्याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन त्यासंबंधी कोणाचेही कायदेशीर हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी ते जाणीवपुर्वक सोडुन दिले आहेत, असे गृहीत धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करून आमचे खरेदी घेणार खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत बंधनकारक राहणार नाही. हे कळावे. येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

दिनांक :- ०८/११/२०२५
खरेदी घेणार
श्री. सुजिद चंद्रकांत म्हात्रे
रा.खारघर गाव, सेक्टर-१३, नवी मुंबई.
मो. ८५९११७०८००

खरेदीदारांचे लेखक,
**श्री. सरदारमल जोरावरमल राठोड**
स्टॅम्प व्हेंडर, ६९९ जमना
निवास, पाली ता. सुधागड, जि. रायगड.
मो. ९४२११६८७६३/९२७०३६७२९०

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. **- मुख्य संपादक**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, खाली वर्णन केलेली मिळकत आमचे अशिल यांनी **श्री. यार महमद लल्लन खान** यांचेकडून बक्षीसपत्राने घेण्याचे ठरविले आहे.

**मौजे हनुमाननगर, ता. तळा, जि. रायगड**

| सर्व्हे नंबर | क्षेत्र हे. आर | आकार रू. पै |
|---|---|---|
| ४२ | १.८७.०० | ०.९९ |

तदंगभुतः सर्व हक्क हितसंबंध यासुद्धा

तरी वरील मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा, कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, ताबा-कबजा, कुळ वहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी - हक्क, मृत्यूपत्रांकित दान, गहाण, बक्षीस, फरोक्त, लिएन वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांचे आत सकृत दर्शनी पुराव्यासह लेखी हरकत खालील सही करणार यांजकडे कळविणेची विनंती आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल बक्षीसपत्राचा व्यवहार पूर्ण करतील, मागाहून येणाऱ्या तक्रारी/हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. कळावे.

तारीख - ०९-११-२०२५

**ॲड.दिपाली राहूल शिंदे**
बी.एल.एस, एल.एल.बी
ॲडव्होकेट व नोटरी
मो.नं. ९५६१७१९४९४
९०११७१६००१

## जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत तिचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे बोरगाव, ता. कर्जत, जि. रायगड.**

| मालकाचे नाव | स.नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पैसे. |
|---|---|---|---|
| श्री.एकनाथ मारुती पाटील व इतर | १४३/१/अ/३ | खाता नं.- ४६० मधील लिहुन देणार यांचे मालकीचे विकत घेतलेले क्षेत्र ००-३७-०० हे. आर.पॉ. | ०-२७ |

तरी, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, कूळमूखत्यारपत्र, बयाना, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटेचमेंट, लिन, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि. ०९/११/२०२५

**ॲड. संजय हरिश्चंद्र म्हसे.**
पत्ता-बी-३०१, सायली निर्माण, निर्माण नगरी,
नेरळ, ता. कर्जत, जि.रायगड.
मो.नं. ९४०३६४७९५३

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी मौजे गाण तर्फे श्रीगांव, ता. अलिबाग, येथील खालील नमूद मिळकत, सदर मिळकतींचे मालक लालचंद गंगाधर पाटील, रा. कुरकुंडी-कोळटेंभी, ता. अलिबाग, जि. रायगड यांजकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे.

संदर्भित जमीन मिळकती पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतींत अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १४ दिवसांचे अवधीत माझेकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा संदर्भित मिळकतींचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे गाण तर्फे श्रीगांव, ता. अलिबाग, जि. रायगड**

| अ.क्र | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ (हे.आर) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| १ | १३ | ४-९१-०० पैकी ४-३९-०० हे.आर | ८.४७ |
| २ | १२ | ०-१६-७० | २.४६ |
| ३ | १० | ०-१६-२० | ३.८१ |
| ४ | ७/१ ही मिळकत अदलाबदल दस्ताने घेतलेली आहे. | ०-१९-१३ | ४.४४ |
| ५ | ७/२ | ०-०४-६५ | १.०० |

अलिबाग,
दिनांक : ०८.११.२०२५

**(ॲड. श्री. प्रसाद विजय वर्तक)**
जिल्हा न्यायालय
अलिबाग-रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरिता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे बोरगाव, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ३०/२ | एकूण क्षेत्र ०-२०-०० हे.आर. | १.८१ |
| २५/११/ब | एकूण क्षेत्र ०-२३-०० हे.आर. | ०.२२ |
| २३/२/ब | एकूण क्षेत्र ०-०८-६० हे.आर | ०.५२ |

**मौजे किकवी, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ८३/४/अ | एकूण क्षेत्र ५-१२-४० हे.आर. | ३.४७ |

**मौजे शिंगढोल, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ४९/६ | एकूण क्षेत्र ०-६१-०० हे.आर. | ०.३१ |

**मौजे खांडस, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ७८/१/क | एकूण क्षेत्र २-२४-०० हे.आर. | २.०६ |

**मौजे धोत्रे, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ७३/१६ | एकूण क्षेत्र ०-७३-०० हे.आर. | ०.४१ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक :- ०९/११/२०२५

सही
**ॲड. रोहित रो. मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाउस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो. कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे अशिल श्री. मयुर भगवान बोराडे रा. वडवली, ता. कर्जत, जि. रायगड यांनी खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे खालील नमुद विद्यमान मालक यांचेकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

**मौजे चांदई, ता. कर्जत, जि.रायगड येथील मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे**

| जमीन मालक | भूमापन क्रमांक व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे. आर. पॉ) | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| १. रमेश बळिराम भोईर | ८२/२ | एकुण क्षेत्र ०.५३.०० पैकी लिहून देणार यांच्या मालकीचे | २.५० |
| २. सचिन चिंतामन रेवाळे | | क्षेत्र ०.२६.०० पोटखराबा ०.०२.०० एकुण क्षेत्र ०.२८.० | १.२७ |

तरी वरील मिळकतींबाबत इतर दुसरे कोणाचा, कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध, ताबा - कबजा, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी हक्क, मृत्युपत्रांकित दान, गहाण, बक्षीस, फरोक्त, लिन, वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे सकृतदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत कळविणेस विनंती आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजुन आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, मागाहून येणाऱ्या तक्रारी/हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, हे सर्वांस कळावे

तारीख :- ०९/११/२०२५

**ॲड. कल्याणी रवी गायकर**
ओम श्रम साफल्य को. ऑप. हौसिंग सोसायटी
कोतवालनगर-कर्जत, जि. रायगड
मो.नं. ८४४६१४८७८१

## जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत तिचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे बलिवरे, ता. कर्जत, जि. रायगड.**

| मालकाचे नाव | स.नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पैसे. |
|---|---|---|---|
| रेखा रामचंद्र फोपे. | ३०/५ | एकुण क्षेत्र १-६२-०० हे.आर. पॉ. यापैकी विकत घेतलेले क्षेत्र ००-८०-०० हे.आर.पॉ. | १-६० |

तरी, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दूसरे कोणाचा साठेकरार, कूळमूखत्यारपत्र, बयाना, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटेचमेंट, लिन, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मूदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि. ०९/११/२०२५

**ॲड. संजय हरिश्चंद्र म्हसे.**
पत्ता-बी-३०१, सायली निर्माण, निर्माण नगरी,
नेरळ, ता. कर्जत, जि.रायगड.
मो.नं. ९४०३६४७९५३


## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## जाहीर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी मौजे नागांव, ता. अलिबाग. जि.रायगड येथील खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक श्री. संतोष आधारसिंग राजपूत, रा. नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यामध्ये झालेली आहे. सदरची मिळकत निर्वेध व बोजाविरहित असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिलेला आहे. सदर मिळकत जिल्हाधिकारी सो. रायगड यांचेकडील आदेश क्र. मशा/एल. एन.ए./अ-१(अ)/टोकन नं. १९८६२/एस. आर. ६३४ /२०२४ ने दि.०४.११.२०२५ रोजी बिनशेती झालेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | प्लॉट नं. | क्षेत्र (चौ.मी) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|---|
| नागांव ता. अलिबाग, जि. रायगड | १३८४ | ३ | ४५४.२७ | ४५-४३ |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लीज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, वारसा हक्क, वहिवाटीचे जाण्यायेण्याचा मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांजकडे लेखी कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दि. ०८.११.२०२५

**ॲड. मच्छिंद्र एस. म्हात्रे**
शॉप नं. २, दुय्यम निबंधक कार्यालय अलिबागच्या समोर
अलिबाग, जि. रायगड मो.नं.९८९००७९३०२

## PUBLIC NOTICE

Notice is hereby given to public at large that my Clients have instructed me to conduct due diligence with respect to the title of the Owners being (1) Smt. Naseem Iqbal Halim and (2) Smt. Iffat Shafique Ahmadi to the property more particularly described in the **First Schedule** hereunder written **("Property")**, as mentioned in First Schedule hereunder written and therefore, I am issuing this public notice:-

All person(s), claiming or having any share, right, title, estate, interest, claim or demand whatsoever to or in respect to the Property or any part thereof, whether by way of sale, ownership, transfer, assignment, tenancy, sub-tenancy, lease, sub-lease, license, gift, release, exchange, family arrangement, possession, mortgage, charge, encumbrance, lien, inheritance, succession, bequest, easement, order/ decree/judgment of court, attachment, writing or otherwise of any nature whatsoever are hereby required to make the same known in writing to the undersigned at the within mentioned address and within 14 (fourteen) days from the date of publication hereof, with notarised documentary evidence on which they are basing and asserting their rights with respect to the Property or any part thereof, failing which, such claim, demand, right, title, interest, dispute, demand or objection, if any, shall be deemed to have been waived and/ or abandoned to all intents and purposes.

**THE FIRST SCHEDULE ABOVE REFERRED TO:**
**(Description of the said Property)**

1. All that piece and parcel of the agricultural land bearing Gat No. 465 admeasuring 00.26.69 Akak H.R. Sq. Mtrs. (including Pot Kharab/Fallow Land admeasuring 0.00.50 Akak H.R. Sq. Mtrs.), Assessed to Rs. 9.03 Ps.along with a House bearing Group Grampanchayat Kihim House No. 104 standing thereon, being, lying and situate at Village Kamath, Taluka Alibag and District Raigad.
2. All that piece and parcel of the agricultural land bearing Gat No. 466 admeasuring 00.26.70 Akak H.R. Sq. Mtrs. (including Pot Kharab/Fallow Land admeasuring 0.00.60 Akak H.R. Sq. Mtrs.), Assessed to Rs. 9.27 Ps., being, lying and situate at Village Kamath, Taluka Alibag and District Raigad.

Adv. S. Y. Bartake
Adv. S. S. Bartake
Office At B/202, Kuberakshe
C.H.S., Near Maruti Naka,
Alibag, Taluka Alibag, District
Raigad, 402 201.

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)






## राशीभविष्य

- **मेष** : आर्थिक बाबतीत मोठं पाऊल उचलू नका. व्यवसायात अधिक व्यस्त रहाल. प्रवासात लाभ होईल.
- **वृषभ** : शिक्षण क्षेत्रातील प्रयत्नांना यश येईल. व्यवसायात जुनी येणी वसूल होतील. ताण वाढता राहील.
- **मिथुन** : कौटुंबिक जीवनात सुख लाभेल. व्यवसायात प्रतिष्ठा वाढीस लागेल. मानसिक स्वास्थ लाभेल.
- **कर्क** : वैवाहिक जीवनात सौख्य लाभेल. प्रकृतीच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नये. स्वमताग्रह दूर ठेवावा.
- **सिंह** : रखडलेली कामं वेगानं मार्गी लागतील. अपेक्षित कमाई सुलभतेनं होईल. विद्यार्थ्यांना यश लाभेल.
- **कन्या** : स्थावर बाबतीतील अडचणी दूर होतील. धनलाभाचे योग आहेत. नोकरीत अपेक्षित प्रगती होईल.
- **तूळ** : शैक्षणिक तसंच संशोधन कार्यात अनुकूलता राहील. विवाहेच्छुकांना दिलासा मिळेल. चिंता नसावी.
- **वृश्चिक** : कर्तव्याप्रती प्रामाणिक रहा. कोणत्याही आमिषाला बळी पडू नका. आर्थिक बाबतीत ताण राहील.
- **धनु** : धार्मिक कार्याकडे ओढा राहील. खर्च वाढला तरी प्राप्ती तशीच राहील. मुलांचे प्रश्न मार्गी लागतील.
- **मकर** : उत्साह वाढवणाऱ्या घटना घडतील. नव्या करारांना अनुकूलता राहील. गुंतवणूक विचारानं करावी.
- **कुंभ** : अपेक्षित ध्येय साध्य करू शकाल. नातेसंबंध अधिक दृढ होतील. जोडीदाराचं सहकार्य लाभेल.
- **मीन** : कामासाठी धावपळ, दगदग होईल. उष्णतेपासून त्रास संभवतो. प्रवास शक्यतो टाळायला हवा.

पॅरेंटिंग

## मुलांकडून करून घ्या योगासनं

योगासनं करताना मुलांना आनंद मिळायला हवा. त्यांच्याकडून ओढून ताणून योगा करून घेऊ नका. योगा करताना घरात आनंदी वातावरण असू द्या. 'हसत-खेळत योगासनं' ही संकल्पना तुम्हाला राबवता येईल. मुलांच्या मित्रमैत्रिणींनाही यात सहभागी करून घेता येईल. संध्याकाळी मुलांना मैदानी खेळही खेळायचे असतात. त्यामुळे थोडा वेळ योगा करून मुलांना खेळू द्या. योगा करताना मुलांच्या आवडीचं संगीत लावता येईल. काही खेळही खेळता येतील. मुलांना आव्हानं देता येतील. योगासनं करताना छान वाटावं म्हणून मुलांसाठी खास योगा पँट तसंच मॅट खरेदी करा. अगदी व्यावसायिक पद्धतीने योगा करायला मुलं तयार होतील. अगदी सोप्या आसनांपासून सुरूवात करा. प्राणायाम, अनुलोम विलोम असे श्वसनाचे प्रकारही शिकवा. ताजंतवानं वाटू लागल्यावर मुलं नियमितपणे योगासनं करू लागतील.

## ९ नोव्हेंबर

दिनविशेष

**१९६२** : महान समाजसुधारक महर्षी धोंडो केशव कर्वे यांचं निधन.
**१९८८** : मुंबईत भारत पेट्रोलियम शुद्धीकरण संकुलात स्फोट. आगीत बारा जणांचा होरपळून मृत्यू.
**२०१३** : तमिळनाडूतील पक्षांच्या आणि काँग्रेसमधील काही मंत्र्यांच्या विरोधामुळे पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांचा राष्ट्रकुल राष्ट्रप्रमुखांच्या परिषदेसाठी श्रीलंकेला न जाण्याचा निर्णय.
**२०१६** : अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदी डोनाल्ड ट्रम्प यांची निवड

करून तर पाहा

## नेल पॉलिशने नक्षीकाम

तुमच्या आईकडे, ताईकडे नेल पॉलिशच्या रंगीबेरंगी बाटल्या असतील. या नेल पॉलिशचा वापर करून तुम्ही भन्नाट कलाकृती साकारू शकता.

**साहित्य** : रंगीबेरंगी नेल पॉलिश, पसरट ट्रे, पाणी, प्लेन पेपर, नेल पॉलिश रिमूव्हर, प्लास्टिकचे ग्लोव्हज, टूथपिक, पॉपसिकल स्टिक्स इत्यादी.

**कृती**: सर्वात आधी पसरट ट्रेमध्ये पाणी घाला. या पाण्यात कागद बुडायला हवा. कामाला सुरूवात करण्यापूर्वी प्लास्टिकचे ग्लोव्हज असतील घाला. त्यातूनही हातांना नेल पॉलिश लागलं तर ते काढण्यासाठी रिमूव्हरचा वापर करता येईल. नेल पॉलिश मार्बलिंग ही भन्नाट कलाकृती आहे. ती करण्यासाठी विविध रंगांचं नेल पॉलिश घ्या. सगळ्या बाटल्या ट्रे मधल्या पाण्यात ओता. ही कृती झटपट करा. आधी फिकट रंगाचं नेल पॉलिश घ्या. मग गडद रंगांची निवड करा. टूथपिकच्या मदतीने नेल पॉलिश पाण्यात पसरवून घ्या. आता पेपर पाण्यात बुडवा. काही सेकंद ठेवा आणि लगेच बाहेर काढा. कागदावर नेल पॉलिशची नक्षी उमटलेली दिसेल. पाण्यावर तरंगणारं नेल पॉलिश पॉपसिकल स्टिकच्या मदतीने बाजूला करा. कागद वाळू द्या. कागदावर उमटलेली रंगीबेरंगी नक्षी खूप छान दिसेल.

आरोग्यमंत्र

## ऋतूमानानुसार आहार बदलावा

प्रत्येक ऋतूत आहारात बदल करणं आवश्यक आहे. आता थंडी वाढू लागली आहे त्यामुळे ऋतूमानानुसार आहारात बदल करायला हवा. बाजरीमध्ये प्रोटीनचं प्रमाण सर्वात जास्त असतं. तसंच शरीरासाठी आवश्यक मॅग्नेशियम, कॅल्शियम, मॅग्नीज, ट्रिप्टोफेन, फायबर, व्हिटॅमिन- बी, अँटीआक्सीडेंटचं प्रमाणही भरपूर असतं. थंडीच्या दिवसांमध्ये शेंगदाण्यामध्ये लोह, कॅल्शिअम आणि झिंकचा उत्तम स्रोत आहे. मूठभर शेंगदाण्यामध्ये ४२६ कॅलरीज, ५ ग्रॅम कार्बोहायड्रेट, १७ ग्रॅम प्रोटीन असते. त्यात व्हिटॅमिन इ, के, आणि बी ६ भरपूर प्रमाणात असते. या ऋतुमध्ये शरीराला निरोगी, स्वस्थ आणि ऊर्जावान ठेवण्यासाठी मधाचे सेवन आरोग्यदायी ठरतं. मधामुळे पचनक्रिया सुधारण्यास मदत होऊन रोग प्रतिकारक शक्तीही वाढते. आलं उत्तम पाचक असल्याने पोटदुखी आणि अ‍ॅसिडिटीची समस्या दूर होण्यास मदत होते. आलं लिंबू आणि मध यांचं मिश्रण चवदार तर असतंच आणि लाभदायकही असतं. नेहमीच्या आहारात आलं वापरल्यास छोट्या-मोठ्या आजारांपासून दूर राहता येतं. हिवाळ्यात कोणत्याही स्वरुपातील आल्याचे सेवन केल्यास त्याचा फायदा होतो. शरीराला ऊर्जा मिळते आणि डायजेशनही सुधारतं. हृदय आणि रक्त धमन्या सुरक्षित ठेवण्यासाठी बदाम उपयुक्त आहेत. बदामात असलेले ६५ टक्के मोनोसॅच्युरेटेड फॅट शरीरातील बॅड कोलेस्ट्रॉल कमी करण्यास आणि चांगले कोलेस्ट्रॉल वाढवण्यास मदत करते. बदामात भरपूर कॅल्शियम, व्हिटॅमिन ई, व्हिटॅमिन बी आणि फायबर उपलब्ध असतं.



पंचांग

**रविवार, ९ नोव्हेंबर २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७, कार्तिक कृ. ५, चंद्राशी : मिथुन, नक्षत्र : आर्द्रा, योग : सिद्ध, सूर्योदय ६.४५, सूर्यास्त ६.००

फॉरवर्डस

**कृपाँ जिनकी हमारें ऊँपर तेवर भी उन्हीं क़ा वरदान हैं...**

**शान सें ज़िना सिखायाँ जिसनें महाँकाल उनका नाम हैं...!**

फॅशन पॅशन

✲ व्हाईट स्वेटरवर लाईट ग्रे जीन्स आणि ब्राउन शूज तुमचा लूक खुलवतील.

✲ ग्रे स्वेटर, ब्लॅक जीन्स आणि ब्राउन चुक्का बुट हा लूक कॅरी करता येईल.

✲ स्ट्राईप्ड स्वेटर, ब्लू जीन्स आणि ब्राउज शूजही मस्त दिसेल.

✲ ब्लू स्वेटर, ब्लू जीन्स आणि ब्राउन शूज असं कॉम्बिनेशनही हिट आहे.

✲ ग्रीन स्वेटर, चारकोल जीन्स आणि ब्राउन शूजही तुम्ही कॅरी करू शकता.

करिअरवाटा

## ग्रामीण विकासातील कारकिर्द

आपला देश पूर्वापार शेतीप्रधान असून आजही बरीच मोठी लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे देशाच्या अर्थव्यवस्थेला गती देण्यासाठी ग्रामीण भागाचा आणि शेतीक्षेत्राचा विकास घडवणं महत्त्वाचं ठरत आहे. या पार्श्वभूमीवर अलिकडे कॉर्पोरेट वर्ल्ड, वर्ल्ड बँक, इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन आदी रुरल डेव्हलपमेंटकडे जाणीवपूर्वक लक्ष घालत आहेत. सरकारच्या नानाविध योजना ग्रामीण विकासासाठी महत्त्वाची कामगिरी बजावत आहेत.



अशा परिस्थितीत रुरल मॅनेजमेंटशी संबंधित अभ्यासक्रम अभ्यासायला हवे. एखादा साधासा अभ्यासक्रमही ड्रिम जॉब देऊ शकेल. याच्याशी संबंधित डिप्लोमा, डिग्री किंवा पीजी कोर्स चांगलं व्यासपीठ मिळवून देण्यास सक्षम आहे. अनेक विद्यापीठांमध्ये रुरल मॅनेजमेंट संबंधित अभ्यासक्रम आखले जातात. आजकाल बहुसंख्य कंपन्या ग्रामीण भागामध्ये उद्योगाचा विस्तार करण्याच्या योजना आखत आहेत. देशातील अग्रणी मॅनेजमेंट इन्स्टिट्युट्सही रुरल मॅनेजमेंटच्या विद्यार्थ्यांना प्राधान्य देतात. या साऱ्या बाबी लक्षात घेता रुरल मॅनेजमेंटकडे चांगली संधी म्हणून पहाणं महत्त्वाचं ठरणार आहे. ग्रामीण भागाकडे ओढा असणाऱ्यांनी या संधीचा अवश्य विचार करायला हवा.

खेचाखेची

## सर का रागावले?

शाळेत सर रागवल्यावर...

**पहिल्या बेंचवरची पोरं** - सर आपल्यामुळेच रागावले आहेत.

**शेवटच्या बेंचवरची पोरं** - काही नाही रे, बायकोसोबत भांडण झालं असेल

वेगळं काही

काही प्राण्यांच्या किंमती बघून आपले डोळे पांढरे होतील. २००६ मध्ये ग्रीन मंकी नावाच्या घोड्याचा लीलाव झाला. अवघ्या दोन वर्षांच्या ग्रीन मंकीला १,६०,००००० डॉलरना खरेदी करण्यात आलं होतं. मे २०१८ मध्ये ग्रीन मंकीचा मृत्यू झाला. ब्रिटनच्या अब्जाधीश व्यावसायिकाने आपली १.५ कोटी डॉलरची संपत्ती गीगू नावाच्या कोंबड्याच्या नावे केली. आपल्या मृत्यूनंतरही गीगूचं नीट पालनपोषण व्हाव यासाठी त्याने ही तजवीज केली. ईस्टसाईड लेविसडेल गोल्ड मिस्सी नावाची गाय खूप प्रसिद्ध आहे. ही गाय सर्वसामान्य गायीपेक्षा दहा पटींनी जास्त दूध देते. या गायींच्या पालनपोषणाचा खर्च प्रचंड असतो. या गायीची किंमत आठ कोटी ४० लाख रूपये आहे.

फॅशन पॅशन

## थंडीतही रहा स्टायलिश

परतीचा पाऊस लांबला असला तरी लवकरच थंडी सुरू होण्याची चिन्हं दिसत आहे. साहजिक ऊबदार कपड्यांची तयारी सुरू करावी लागेल. सर्वसाधारणपणे थंडीत स्वेटर, जॅकेट कॅरी केले जातात. प्रसंगी शालीला पसंती असते. पण प्रत्येक वेळी शाल गुंडाळणं, स्वेटर घालणं शक्य नसतं. वेगळं ट्राय करायचं तर पोंचोचा पर्याय आहे. हा कॅज्युअल, पार्टी वेअर म्हणून कॅरी करू शकता.



✲ टी शर्ट, स्वेट शर्टवर केप स्टाईल पोंचो घालता येईल. गाऊन किंवा लाँग स्कर्टवर हा प्रकार शोभून दिसेल. फ्लोरल, प्लेन, चेक्स, स्ट्राईप्स या प्रकारांमधून तुम्ही केप स्टाईल पोंचोची निवड करू शकता. ✲ जीन्स किंवा एथनिक्सवर फुल लेंथ किंवा फ्लोअर लेंथ पोंचो वापरावा. ✲ आवड आणि गरजेनुसार व्ही, राउंड किंवा हाय नेकवाले पोंचो घेता येतील. ✲ समारंभासाठी लोकरीवर थ्रेड, मिरर वर्क तसंच नक्षीकाम केलेले पोंचो खरेदी करू शकता. ✲ आजकाल फेदर किंवा फ्रिंज पोंचोचा ट्रेंड आहे. ही स्टाईलही छान दिसते. ✲ थंडीत हुडीज घातल्या जातात. नेहमीच्या हुडीपेक्षा पोंचो विथ हुडीमुळे हटके लूक मिळेल.

## सुडोकू २६


| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ६ | | | | ८ | ९ | | |
| | ४ | | | ५ | | | २ | ६ |
| | १ | ९ | | ६ | | | | |
| | २ | ७ | ८ | ९ | ३ | | ५ | |
| ३ | | | | | | | | ९ |
| | ९ | | ७ | १ | ४ | २ | ३ | |
| | | | | ७ | | १ | ९ | |
| ९ | ३ | | | ८ | | | ६ | |
| | | २ | ६ | | | | ८ | ५ |

टीप -
✲ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
✲ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
✲ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू २५ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | ५ | ६ | ७ | १ | २ | ९ | ३ | ८ |
| २ | ७ | ९ | ३ | ४ | ८ | ५ | ६ | १ |
| ३ | १ | ८ | ९ | ६ | ५ | ४ | ७ | २ |
| ७ | ४ | ३ | ८ | ५ | ९ | २ | १ | ६ |
| ८ | २ | ५ | ६ | ३ | १ | ७ | ९ | ४ |
| ६ | ९ | १ | २ | ७ | ४ | ३ | ८ | ५ |
| ९ | ६ | २ | ४ | ८ | ३ | १ | ५ | ७ |
| ५ | ८ | ४ | १ | ९ | ७ | ६ | २ | ३ |
| १ | ३ | ७ | ५ | २ | ६ | ८ | ४ | ९ |

## शब्दकोडे क्रमांक २६



**आडवे शब्द :-**
१) उत्तेजन देणारा, उत्पादक
४)सत्ता, कैफ, अधिकार
७) गाय, वासरु संपत्तीच्या रुपात
९) पाण्याअभावी करपलेले पीक
१०) पहिला ऋतू
१२) नगरपाल
१४) पती, यजमान
१६) यात्रेस जाणारा
१८) उत्तराधिकारी
२०) हेकट
२२) वर्ष, साल
२३) अतिशय छान.
२४) न दिसणारी जमख.
२६) आंबट-गोड चवीचे एक काटेरी फळ
२८) पाप
३०) अस्थिर, हलणारे
३१) माजलेला
३२) अल्प, थोडे
३३) सुगंध
३४) पत्र
३६) उथळ आकार
३८) शाळेत जाणारा
३९) हात
४०) पुन्हा
४२) एक क्रूर प्राणी
४४) न्यूनता, उणीव
४६) चणचण ४८) उखळातील लाकडी बत्ता
४९) कबूतर
५०) संपत्ती, द्रव्य
५१) मंत्रीमंडळ
५३) वर-वधूमधील पडदा
५५) श्रीकृष्णोपदेश.
५७) भांडण
५८) बाकडे, किंचित वक्रता
६१) सुप्रसिद्ध, कौन्सिल ऑफ स्टेटच्या सभासदाचा हुद्दा
६३) ज्या समुद्रात मगरीचे वास्तव्य आहे असा समुद्र
६५) राबता, जाणे-येणे
६६) खिडकीची पातळ काच

**उभे शब्द :-**
१) तरुण सुंदर स्त्री
२) आशीर्वादाचा हात
३) मिठी, विळखा
४) दोन बिंदूतील जागा, फरक
५) छांदिष्ठ
६) शक्तिशाली
७) दूध वा दुधाचे पदार्थ
८) शहर
११) रागांतील दुय्यम प्रमुख स्वर
१३) दरवाजा
१५) पाण्यावरील तरंग
१७) सोन्याचा पर्वत
१९) वणवा
२१) चावट, वात्रट
२२) माळ, हार
२३) मसालेदार, खमंग
२५) सामान
२६) फुलातील सुगंधी द्रव
२७) सूट
२८) इंद्राचे एक नाव
२९) त्रासदायक बडबड
३१) चामखीळ
३५) मोदकाचे आच्छादन
३६) पुन्हा
३७) गाडीचे छत
३९) पंकज
४१) उकळत्या पाण्याचा आवाज
४३) पाठवणी
४४) वाळवी
४५) प्रजा
४७) सुगंध
४८) ठेकेदार
४९) बाळाचा पाणी मागण्याचा शब्द
५२) पाठविलेला
५३) आंकडा, मांडी
५४) धोबी
५६) फुलांचा वाफा
५८) पायविहीर
५९) कापडाचा एक प्रकार
६०) प्रामाणिका, सज्जन
६२) देणारा
६३) अंत:कारण
६४) भूपती, नरपती

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



**जागतिकीकरणाचे ब्रीद सहज साध्य करणाऱ्या भारताला आज अनेक परदेशी शक्ती पाण्यात पाहात आहेत. आपणही आपल्या कपड्यांमध्ये, अन्नामध्ये आणि संस्कृतीमध्ये दोष शोधत इतर संस्कृतींशी निराधार तुलना करतो. अशा वेळी 'वंदे मातरम्'ची संकल्पना प्रासंगिक बनते. ती आपल्याला आपल्या संस्कृतीवर विश्वास ठेवण्यास प्रवृत्त करते. भारताचे हे राष्ट्रीय गीत १५० वा वर्धापन दिन साजरा करत आहे. त्यानिमित्ताने...**

# वंदन 'वंदे मातरम्'ला

आपण जागतिकीकरणाच्या शिखरावर असलो तरी अनेक परदेशी शक्ती हे वाढते जागतिक स्थान कम कुवत करण्याचा प्रयत्न करत आहेत. आपण पाश्चात्यिकरण आणि अमेरिकीकरणाचे अंधानुकरण करत आहोत. आपण आपल्या कपड्यांमध्ये, अन्नामध्ये आणि संस्कृतीमध्ये दोष शोधू लागलो आहोत आणि इतर संस्कृतींशी निराधार तुलना करत आहोत. अशा वेळी 'वंदे मातरम्' ही संकल्पना आपल्या समाजासाठी खूप प्रासंगिक बनते. ती आपल्याला या नकारात्मक विचारांपासून मुक्त करू शकते आणि आपल्या संस्कृतीवर विश्वास ठेवण्यास आणि आपल्या उदात्त क्षमता जागृत करण्यास शिकवू शकते. 'जन गण मन' हे आपले राष्ट्रगीत असले, तरी 'वंदे मातरम्' हे भारताचे राष्ट्रीय गीत आहे. ते नोव्हेंबर १८७६ मध्ये बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी लिहिले. १८८२ मध्ये त्यांनी 'आनंद मठ' या कादंबरीत हे गाणे अंतर्भूत केले. हे गाणे भावानंद नावाच्या भिक्षूने गायले. त्यात तपस्वी बंडाचे चित्रण आहे. या गाण्याला या महिन्यात १५० वा वर्धापन दिन पूर्ण होत आहेत. जागतिक सर्वेक्षणात 'वंदे मातरम्' हे जगातील सर्वाधिक लोकप्रिय दहा गाण्यांमध्ये दुसऱ्या क्रमांकावर होते. 'वंदे मातरम्'ला त्याच्या सांस्कृतिक आणि प्रेरणादायी शक्तीसाठी व्यापक प्रशंसा मिळाली. त्यामुळे ते भारताच्या स्वातंत्र्यलढ्याचे आणि राष्ट्रीय भावनेचे प्रतीक बनले.



एक ा

भारतात सध्या मोठ्या आणि शक्तिशाली शैक्षणिक संस्था आहेत. या संस्थांमध्ये प्रशिक्षित झालेले आपले तरुण मोठ्या संख्येने परदेशात सेवा करण्यासाठी जातात. आपल्याला या सर्व तरुणांचा अभिमान आहे. ते जागतिक स्तरावर प्रसिद्ध संस्थांचे नेतृत्व करतात. आपले तरुण परदेशात कुशल डॉक्टर, अभियंते आणि राजकारणी म्हणूनही नाव कमावत आहेत. अशा वेळी 'वंदे मातरम्' मध्ये अपार शक्ती जाणवते. या गाण्यातील भावनेचा सकारात्मक वापर तरुणांमध्ये देशभक्ती जागृत करू शकते.

आपण लक्षात ठेवले पाहिजे, की स्वावलंबनाचा मार्ग केवळ त्याग, देशभक्ती आणि समर्पणाद्वारेच साध्य होऊ शकतो. आपण हे तत्व स्वदेशी चळवळ आणि 'व्होकल फॉर लोकल'शीही जोडू शकतो.

**अजय तिवारी**

आपण लक्षात ठेवले पाहिजे, की इतरांचे अनुकरण करून कधीही स्वावलंबी होऊ शकत नाही. आपण आपली स्वतःची ताकद आणि वेगळेपण ओळखले पाहिजे. तरच इतरांवरील अवलंबित्व संपेल आणि आपण स्वतःच्या पायावर उभे राहू शकू. स्वामी विवेकानंद आणि त्यांच्या पाश्चात्य शिष्या निवेदिता म्हणाल्या होत्या, की पश्चिमेचे कमकुवत अनुकरण करु नका, तर भारताची खरी प्रतिमा बना. आपली संस्कृती आपल्या आत्म्यामध्ये आहे, ती पाश्चात्य अनुकरणाने बदलता येणार नाही. आपण आपली संस्कृती समजून घेतली पाहिजे आणि आत्मसात केली पाहिजे. तरुणांनी त्यांच्या सर्जनशीलता आणि नवोपक्रमाद्वारे उद्योग, विज्ञान, तंत्रज्ञान आणि शेतीमध्ये नवीन पाया रचला पाहिजे. 'वंदे मातरम्'चा संदेश आत्मनिर्भरतेच्या या भावनेला प्रोत्साहन देतो. 'वंदे मातरम्' हे भारताच्या संस्कृतीचे, एकतेचे आणि परंपरेचे प्रतीक आहे. आपण या गाण्याचा प्रत्येक शब्द काळजीपूर्वक समजून घेतल्यास ते भारतीयत्वाच्या मूळ भावनेचे प्रतिबिंब आहे, हे जाणवते. त्याची पहिली ओळ आहे- वंदे मातरम! सुजलाम् सुफलाम् मलयज शीतलम, शस्यश्यामलम् मातरम. मलयजशीतलम म्हणजे 'चंदनाच्या पर्वतावरून किंवा चंदनाच्या झाडावरून वाहणारा सौम्य, थंड वारा.' अशी भावना फक्त भारतातच कल्पना करता येते. त्यातील प्रत्येक गोष्ट परिचित वाटते.

अलिकडे अशी परिस्थिती निर्माण होत आहे, जिथे काही लोक, राजकीय फायद्यासाठी किंवा स्वतःच्या फायद्यासाठी भारताचे विभाजन करण्याचा प्रयत्न करताना दिसतात; मग ते काश्मीर असो वा पंजाब. आपण हे समजून घेतले पाहिजे, की आपल्या चालीरीती, विधी, कपडे, भाषा आणि अन्न वेगळे असू शकते; परंतु आपण सर्व भारतमातेची मुले आहोत. आपल्या पूर्वजांनी या भूमीचे रक्षण करण्यासाठी सर्वस्व अर्पण केले. त्यामुळे त्याच्या एकता आणि अखंडतेशी कधीही तडजोड होणार नाही याची खात्री करणे ही आपली जबाबदारी आहे. आपण जगाला 'विविधतेत एकता'चा धडा शिकवला पाहिजे आणि एकत्र पुढे गेले पाहिजे. हे सर्व 'वंदे मातरम्'द्वारे शक्य आहे. या घोषणेमध्ये भारतीयत्वाची अफाट शक्ती आहे. ती सर्वात कठीण हृदयांनाही वितळवू शकते. त्याचप्रमाणे भारतातील तरुण त्याद्वारे आपला सांस्कृतिक अभिमान समजून घेऊ शकतात आणि भारताची विविधता आणि समृद्धता जगासमोर सादर करू शकतात. भारत सध्या हवामानबदल आणि पर्यावरणीय समस्यांना तोंड देत आहे. अशा वेळी 'वंदे मातरम'ची ही भावना तरुणांना पर्यावरण संरक्षणाला प्राधान्य देण्यास आणि नैसर्गिक संसाधनांच्या विवेकपूर्ण वापरावर लक्ष केंद्रित करण्यास प्रेरित करते. 'वंदे मातरम'मध्ये मातृभूमीचे वर्णन 'सुजलाम् सुफलाम' असे केले आहे, जी शुद्ध पाणी आणि शुद्ध फळांनी समृद्ध आहे आणि अशा अनेक ओळी आहेत, ज्या भारतमातेच्या पवित्र भूमीचे वर्णन स्वच्छ, सुंदर आणि शुद्ध असे करतात. यामुळे निसर्ग आणि पर्यावरणाबद्दल आदराची भावना जागृत होते.

'वंदे मातरम्' म्हणजे मातेला वंदन. या गीताच्या संदेशाने पुरुषांनाच नाही, तर महिलांनाही प्रेरणा दिली. स्वातंत्र्यलढ्यादरम्यान महिलांनी या गाण्याला आपला आवाज बनवला. सुचेता कृपलानी यांनी १९४७ मध्ये संविधान सभेत 'वंदे मातरम' गायले. सरोजिनी नायडूंसारख्या महिला क्रांतिकारकांनी त्याचा शस्त्र म्हणून वापर केला. 'वंदे मातरम्' ही मातृशक्तीला श्रद्धांजली आहे, जी आपल्याला प्रत्येक क्षणी आठवण करून देते, की उपासनेच्या शक्तीशिवाय आपण यशस्वी होऊ शकत नाही. महात्मा गांधी म्हणाले होते, की 'वंदे मातरम' हे भारतातील लोकांच्या भावनांचे प्रतीक आहे. हे गाणे भारताचा आत्मा आणि स्वातंत्र्यासाठीची तळमळ व्यक्त करते. नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी लिहिले, की 'वंदे मातरम' हे केवळ एक गाणे नाही, ते संघर्षासाठीचे आवाहन आहे. ते आपल्याला कर्तव्य आणि बलिदानाची आठवण करून देते. लोकमान्य टिळकांना 'वंदे मातरम'बद्दल इतका आदर होता, की त्यांनी ते शिवाजी महाराजांच्या समाधीस्थळाच्या कमानीवर कोरले. ते म्हणतात, की 'वंदे मातरम' हा मंत्र आहे. त्याने लाखो भारतीयांना स्वातंत्र्यलढ्यामध्ये सहभागी होण्यास प्रेरित केले. ते आपल्या राष्ट्रीय अस्मितेचे प्रतीक आहे. लाला लजपत राय आपल्या 'द स्टोरी ऑफ माय एक्झाइल' या पुस्तकात लिहितात, 'जेव्हा जेव्हा मी वंदे मातरम् ऐकतो, तेव्हा माझ्या ठायी मातृभूमीसाठी अपार प्रेम आणि त्यागाची भावना जागृत होते.'

स्वातंत्र्यलढ्यादरम्यान 'वंदे मातरम्' हे गाणे आणि त्याचा घोषवाक्य म्हणून झालेला वापर यामुळे शूर स्वातंत्र्यसैनिकांचे रक्त परिसंचरण वाढले. 'वंदे मातरम'ला घाबरून ब्रिटिशांनीही बंदी घातली. तथापि, इतिहास दाखवून देतो की जेव्हा जेव्हा कोणत्याही प्रशासनाचा जुलूम वाढतो, तेव्हा काही गाणी आणि घोषणा उदयास येतात. यात सत्तेच्या भिंती हादरवण्याची शक्ती असते. दुसऱ्या शब्दामध्ये सांगायचे, तर 'वंदे मातरम्'मध्ये अन्यायाविरुद्ध न्यायाची तुतारी वाजवण्याची शक्तीदेखील आहे.

आजही गरज पडल्यास त्याचा वापर केला जातो. 'वंदे मातरम्' म्हणजे 'हे मातृभूमी, मी तुझी पूजा करतो, मी तुला वंदन करतो. 'वंदे मातरम्' म्हणजे एक गर्जना आहे; जिने ब्रिटिश राजवटीला झोपेतून हादरवून टाकले. ती फक्त एक घोषणा नव्हती, तर स्वातंत्र्यप्रेमींच्या नसांमधून वाहणारे रक्त होते. त्यांच्या नसांमधून कंप पावणारा मंत्र होता. आत्म्यांना जोडणारा पूल होता. बंकिमचंद्र चॅटर्जी यांच्या लेखणीतील हे गीत केवळ त्यांच्या कादंबरीचा भाग नव्हते. ते भारताच्या स्वातंत्र्याचे स्तोत्र बनले. आजही स्वातंत्र्याचे मूल्य स्पष्ट करण्यासाठी, हुतात्म्यांचे स्मरण करण्यासाठी आणि या हिरव्यागार भूमीला नमन करण्यासाठी सर्वात योग्य असे कोणते गाणे असेल, तर ते म्हणजे 'वंदे मातरम्!' **

# मुंबई मेट्रो सुहाना सफर, आरामशीर थंडगार

वाटणार नाही

मेट्रोचं जाळं संपूर्ण मुंबईभर हळूहळू पसरू लागले आहे. मुंबईकर मेट्रो ने प्रवास करू लागले आहेत. अतिशय सुंदर आणि नियोजनबद्धरीत्या मेट्रोची उभारणी करण्यात आलेली आहे. मुंबई फिरलात आणि मेट्रोने प्रवास नाही केलात तर तुम्ही मुंबई काय फिरला. मुंबईकरांनो मेट्रोने प्रवास कराच. खूप छान वाटतं. जमिनी खालून जेव्हा तुमची मेट्रो ट्रेन जाते तेव्हा आपल्याला एक वेगळीच अनुभूती येते.



आपण आपल्या देशात नसून परदेशात असल्या सारखे आपल्याला वाटते. गाड्यांची रचना ही अतिशय उत्तम केलेली आहे. स्थानकांची उभारणी देखील अतिशय छान आणि सुबक वाटते. मेट्रोची सफर खरोखरच सुहाना सफर आहे. आसन व्यवस्था अतिशय उत्तम प्रकारे केलेले आहे. गाडीमध्ये प्रवेश करताच तुम्हाला अतिशय फ्रेश आणि उत्साही वाटू लागते. तुम्ही संपूर्ण ट्रेन फिरू शकतात. सुरक्षिततेची शक्य तेवढी सर्व काळजी घेतलेली आहे. आणि या मेट्रोमध्ये सरकारने अतिशय योग्य आणि चांगला असा निर्णय घेतला आहे. या मेट्रोमध्ये तुम्हाला लोकल प्रमाणे पहिला दर्जा दुसरा दर्जा दिव्यांग महिला डबा असा कोणताही भेदभाव सरकारने येथे ठेवलेला नाही. इथे सर्व समान याच न्यायाने गाड्यांची रचना केलेली आहे. त्यामुळे सरकारचे करावं तेवढे कौतुक कमीच. त्यामुळे एकतेची भावना आपोआपच मनात निर्माण होते.

मुंबई मेट्रोने प्रवास करत असताना विमानात बसल्यावर जेवढी गंमत तेवढी गंमत या मेट्रो प्रवासामध्ये येत आहे. सुसज्ज गाड्या मनमोकळा प्रवास. विशेष म्हणजे, तिकीटही फार महाग नाही. अगदी दहा वीस आणि पन्नास रुपयां मध्ये सुद्धा तुम्ही मेट्रोचा प्रवास करू शकता. मेट्रोमुळे मुंबईच्या सौंदर्यात आणखीनच भर पडली आहे. कुटुंबियांसमवेत जर तुम्ही फिरायला जाणार असाल तर

**निलेश साठे**

मेट्रो प्रवास करायला काहीच हरकत नाही. मेट्रोने प्रवास करणे म्हणजे सर्वसामान्यांसाठी विमानसेवाच होय. मुंबई फिरायला येणाऱ्यांसाठी सुद्धा मेट्रो सफर एक चांगला अनुभव ठरू शकतो. रोजच्या धकाधकीच्या जीवनामधून मन मोकळा प्रवास करणे मुंबईकरांसाठी दुरापास्त झाले आहे. त्यामुळे ही मेट्रो मुंबईकरांसाठी नव संजीवनी ठरेल. जेव्हा संपूर्ण मुंबई मेट्रोने परीपूर्ण होईल, त्यावेळेस रस्त्यावरील भारदेखील कमी होईल. आणि ट्राफिकच्या कटकटीतून मुंबईकरांची कायमची सुटका होईल. प्रवास जलद होईल. त्यामुळे कामगार वर्गाला आपल्या परिवारासाठी थोडाफार वेळ देता येईल. मेट्रोसारखी सुविधा उपलब्ध करून मुंबईकरांसाठी सरकारने अतिशय सुंदर कार्य केलं आहे, असं म्हणावे लागेल. वातानुकूलित गाडीमध्ये बसून आरामशीर प्रवास करणं सर्वसामान्य मुंबईकरांचं खरं तर एक स्वप्नच होतं. ते आता पूर्ण झालं आहे. थंडगार आरामशीर मेट्रोचा सुहाना सफर करण्यासाठी तुम्ही तयार आहात ना मुंबईकर? **



# भजनगायन आणि दशावतारी नाटक
# कोकणी कलेचा आत्मा!

कोकणभूमी ही केवळ समुद्रकिनाऱ्यांची आणि नारळाच्या बागांची नव्हे, तर भक्ती, संस्कृती आणि कलेची सुवासिक भूमी आहे. या भूमीच्या प्रत्येक वाडीत, प्रत्येक मांडावर, आणि प्रत्येक देवळाच्या कुशीमध्ये, भजनगायन आणि दशावतारी नाटक या दोन कलेच्या अखंड दिव्यांचा प्रकाश तेवत असतो.



तळकोकणातल्या गावोगावांत भजनमंडळे ही फक्त गाण्याची नव्हे तर संस्कार, भक्ती आणि समाजबंधाचे केंद्र होती. पूर्वीच्या काळात तिन्हीसांजेच्या वेळी गावातील वातावरणात झांजांचा नाद, हार्मोनियमचे सूर, आणि ''पांडुरंग विठ्ठल'' या नामस्मरणाचा गजर दुमदुमत असे. त्या सुरेल सूरांनी पक्षीसुद्धा क्षणभर शांत व्हायचे. परंतु, मोबाईल आणि आधुनिकतेच्या युगात आज त्या सुरांना जणू थोडासा विराम मिळाला आहे. तरीही, अजूनही काही वाड्यांमध्ये 'हरिनामाचा नाद' अखंड तेवत राहिलेला आहे.

प्रत्येक वाडीचा मांड म्हणजे भक्तीचा पवित्र रंगमंच. त्या मांडावर सादर होणारे भजन हे वाडीच्या रखवालदार देवतेच्या पूजनाचा एक महत्त्वाचा भाग मानला जातो. सोमवारी आणि गुरुवारी तर नित्यनेमाने या भजनसेवेचा नाद गावभर पसरतो.

पुढे संतपरंपरेतील महान संतांनी या भजनसंस्कृतीला 'अखंड हरिनाम सप्ताह' या अद्भुत संकल्पनेला जन्म दिला. सात दिवस, सात रात्री अखंडितपणे चालणारे हे हरिनाम सप्ताह म्हणजे भक्ती, संगीत आणि आनंदाचा महापर्व! अखंड भजन, नृत्य, वादन, गायन या सर्वांचे एकत्रित भक्तीचा संगीतमय अध्यात्मिक धजराणा सप्ताहात अनुभवायला मिळतो.

भजन म्हणजे केवळ गाणे नाही. ते भावनेचा प्रवाह, श्रद्धेचा झरा आणि आत्मिक साधनेचा मार्ग

**धनंजय शेटये**

आहे. 'भज' या संस्कृत धातूपासून निर्माण झालेल्या 'भजन' या शब्दातच प्रेमाने स्मरण करणे, सेवाभावाने समर्पित होणे आणि भक्तीच्या मार्गाने ईश्वराशी एकरूप होणे हा अर्थ सामावलेला आहे.

भजनाच्या स्वरांतून भक्ताचा भाव पाझरत असतो. त्याचे शब्द साधे असतात, परंतु भावनेची खोली अतुलनीय असते. हेच भजन लोकांना एकत्र आणते, आणि सामूहिक गायनाच्या माध्यमातून एकात्मतेचा संदेश देते. हार्मोनियम, तबला, मृदुंग, झांजा यांच्या साथीने सादर होणारे भजन म्हणजे नादब्रह्माचा उत्सवच जणू!

संतवाणीवर आधारित भजनांत तुकाराम, नामदेव, एकनाथ, ज्ञानेश्वर यांची शिकवण जिवंत ठेवली आहे. त्यांच्या अभंगांच्या स्वरांतून भक्ती आणि समाजकारण या दोन्हींचा संदेश आजही घुमतो. काही भजने देवभक्तीवर, काही गुरुभक्तीवर, तर काही समाजोपयोगी संदेशांवर आधारित असतात. भजन हे जनमानसाच्या अंतःकरणात आनंद आणि समाधान निर्माण करणारे साधन आहे. अखंड हरिनाम सप्ताहात गावोगाव पंढरीचा विठोबा अवतरतो. अवघा परिसर दिंड्या, पालख्या, गजर, आणि टाळमृदंगांच्या तालात मंत्रमुग्ध होतो. वृद्धांपासून लहानांपर्यंत सगळेच हरिनामाच्या झंकारात हरवून जातात.

जनगायन जसे भक्तीचा आत्मा आहे, तसेच दशावतारी नाटक हे कोकणी कलाजगतातील सृजनाचा आत्मा आहे. जत्रा म्हणजे गावाचा सोहळा आणि त्या सोहळ्याचे मुकुटमणी म्हणजे दशावतारी नाटक. संगीत, नाट्य, वेशभूषा, अभिनय, विनोद, आणि धार्मिक संदेश यांचा सुरेख संगम या नाट्यकलेत दिसतो. दशावतारी नाटक केवळ मनोरंजनासाठी नाही; तर धर्म, संस्कृती आणि मूल्यांचे जतन करण्याचे जिवंत माध्यम आहे.

पूर्वीपासूनच प्रत्येक जत्रेमध्ये देवीच्या साक्षीने ही नाटके सादर केली जातात. प्रेक्षकांच्या मनात या नाटकांविषयी एवढी श्रद्धा असते की, जत्रेतील भेट म्हणून घरी नेण्यासाठी 'मालवणी खाजा' रुपी प्रसादासाठी राखलेले पैसेसुद्धा ते कलावंतांच्या कौतुकासाठी अर्पण करतात. कोकणातील कलाप्रेमी प्रेक्षक हे दिलदार मनाचे, कलेचे खरे पारखी आहेत. कलावंतांना शासनाचे पुरस्कार मिळोत वा न मिळोत, पण त्यांच्या मनातील भक्तीभावाने आणि प्रेक्षकांच्या टाळ्यांनी मिळणारे समाधान हेच त्यांच्यासाठी खरे पारितोषिक असते. दशावतारी कलेचा टिकून राहण्याचा खरा आधार म्हणजे ही जनमानसातील भक्तीभावाने ओथंबलेली प्रेक्षकवर्गाची नाळ आहे. आजही तळकोकणातील मंदिरे, वाड्या, जत्रा आणि सप्ताह यांमधून निनादणारे भजन आणि गाजणारी दशावतारी नाटके हेच सांगतात.



'जोपर्यंत कोकणाच्या लाल मातीचा सुगंध आहे, तोपर्यंत तिच्या संस्कृतीचे सूर आणि रंग कधीच मंदावणार नाहीत!'

कलाप्रेमी कोकणवासीय लोक स्वच्छंदी असतात. कोकणी माणसांचा जणू आत्मा कलावंतांचा असतो. कलेसाठी आयुष्य वेचणारे कलावंत कोकणच्या लाल मातीतून घडतात.

कोकणी माणसांच्या जीवनात बालपणाचं बाळकडू घेण्याआधी दशावतारी नाटक आणि भजन, कीर्तन, प्रवचन हे कलेचं बाळकडू आपसूकच मिळते. त्यामुळे कोकणी माणसाला अभिनय शिकवावा लागत नाही. तो आजुबाजुच्या सांस्कृतिक वातावरणात आत्मसात केला जातो. दोन अडीच वर्षे वयाची मुले सुरेख पखवाज वादन करतात तीच गोष्ट दशावतारी कलेची अगदी बालवयापासूनच दशावतारी नाटकाचे वेड हे कोकणी माणसांना असते. **

# मोकाट कुत्र्यांचा वाढता उपद्रव



प्रमोद जाधव

रायगड जिल्ह्यामध्ये शहरी भागासह ग्रामीण भागात ठिकठिकाणी मोकाट कुत्र्यांचा प्रचंड वावर वाढला आहे. गल्ली बोल्यात, रस्त्यावर या कुत्र्यांचा झुंड कायमच दिसून येतो. अनेक वेळा हे कुत्रे माणसांवर एकत्रीत हल्ले करतात. त्यामुळे कुत्र्यांचा वाढता उपद्रव सर्वसामान्यांसाठी डोकेदुखी बनला आहे. मोकाट कुत्र्यांच्या वाढत्या उपद्रवाला आळा बसवण्यासाठी जिल्हा परिषद पशुसंवर्धन विभागाने मोकाट कुत्र्यांचे निर्बिजीकरण, शस्त्रक्रिया व श्वान दंश प्रतिबंधक लसीकरणावर भर दिला. होता.मात्र हा उपक्रम फारसा यशस्वी ठरला नाही. 'नव्याचे नऊ दिवस' या उक्तीप्रमाणे उपक्रम चालविण्यात आला आहे. स्थानिक प्रशासनाकडूनही या मोकाट कुत्र्यांबाबत दखल घेतली जात नाही, त्यामुळे लहान मुलांसह महिला, वयोवृध्द व इतर मंडळींच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर झाला आहे.

जिल्ह्यात कुत्रे पाळण्याचा फॅड वाढला आहे. पशुसंवर्धन विभागाकडून मार्गदर्शन घेऊन पाळीव कुत्र्यांवर उपचार केले जातात. परंतु, मोकाट कुत्र्यांना काही मंडळी पाळत असतात. त्यांची देखभाल करीत असतात. मात्र, त्यांच्यावर पशुसंवर्धन विभागामार्फत उपचार केले जात नाही. त्याचा परिणाम कुत्र्यांची संख्या भरमसाठ वाढली जाते.
जिल्ह्यात ग्रामीण भागासह शहरी भागात मोकाट कुत्र्यांची संख्या वाढली आहे. नाक्यानाक्यावर मासांहाराचे पदार्थ खाऊन मोकाट कुत्रे जगतात. काही ठिकाणी या कुत्र्यांना जेवण घालतात.तर काही ठिकाणी रस्त्याच्या बाजूला टाकलेले चिकन, मटणाचे शिल्लक मांस खाण्यासाठी कुत्र्यांची झुंबड अनेकवेळा होत असल्याचे पाहावयास मिळते. त्यामुळे मोकाट कुत्र्यांचा वावर प्रचंड वाढला आहे. दुचाकी अथवा चारचाकी वाहनाने प्रवास करणाऱ्या चालकांसह शाळा महाविद्यालयात जाणाऱ्या विद्यार्थ्यांवरदेखील कुत्रे एकजुटीने हल्ला करतात. मागील वर्षी अलिबाग शहरात हा प्रकार घडला होता. आताही तीच परिस्थिती आहे. अलिबाग-रोहा मार्गासह अलिबाग-वावे मार्गावर मोकाट कुत्रे फिरत असतात. या कुत्र्यांच्या भीतीने नागरिकांमध्ये असुरक्षितता निर्माण झाली आहे. मागील चार वर्षांत सात हजार नागरिकांवर कुत्र्यांनी हल्ला केल्याची माहिती समोर आली आहे.


रायगड जिल्ह्यामध्ये ग्रामीण भागात ठिकठिकाणी कुत्र्यांची झुंड दिसून येतो. अनेक वेळा हे कुत्रे माणसांवर एकत्रित हल्ले करतात. त्यामुळे जीव गमविण्याची भीती अधिक असते. काही वेळा दुचाकीवरून प्रवास करीत असताना कुत्रे अंगावर येतात. त्यामुळे अपघात होण्याची भीतीदेखील असते. गावे, वाड्यांमध्ये कुत्र्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. मात्र, स्थानिक प्रशासनाकडून त्यांच्यावर ठोस कारवाई केली जात नाही. त्याचा परिणाम नागरिकांना विशेष करून लहान मुलांना दहशतीच्या खाली राहावे लागत आहे. मोकाट कुत्र्यांच्या वाढत्या उपद्रवामुळे दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेकजण जखमी झाले आहेत. त्यामुळे भीतीचे वातावरण पसरू लागले आहे. यावर ठोस उपाय म्हणून रायगड जिल्हा परिषद पशुसंवर्धन विभागाने मागील वर्षी जिल्हा परिषद सेस फंडातून २५ लाख रुपयांची तरतूद करून मोकाट कुत्र्यांचे निर्बिजीकरण, शस्त्रक्रिया व श्वान दंश प्रतिबंधक लसीकरण करण्यावर भर दिला होता. पुणे येथील युनिर्वसल ॲनिमल वेलफेअर या एजन्सीला हे काम देण्यात आले होते. २५ फेब्रुवारी २०२४ पासून या कामाला सुरूवात करण्यात आली होती. यासाठी पेणमध्ये एक सेंटर उभारण्यात आले होते. मोकाट कुत्र्यांना पकडणे, त्यांना त्या सेंटरमध्ये आणणे, निर्बिजीकरण, शस्त्रक्रिया करणे, त्यांची उत्पत्ती थांबविण्यासाठी व रेबीजपासून बचाव करण्यासाठी श्वान दंश प्रतिबंधित लसीकरण देण्याचे काम करण्यात आले होते. सुरुवातीला अलिबाग तालुक्यातील चेंढरे, चौल व थळ ग्रामपंचायतीची निवड करण्यात आली. या ग्रामपंचायत हद्दीतील २०७ कुत्र्यांचे निर्बिजीकरण व लसीकरण करण्यात आले. मात्र, मार्चअखेर कंपनीचा ठेका संपल्याने या मोहिमेला ब्रेक लागला.त्यामुळे फक्त बोटावर मोजण्या इतक्या ग्रामपंचायतीच्या हद्दीतील मोकाट कुत्र्यांचे लसीकरण निर्बिजीकरण करण्यात आले. ही मोहीम होऊन पावणे दोन वर्षे होत आली आहेत. मात्र, अजूनपर्यंत जिल्हा परिषदेने ही मोहीम पुढे चालू ठेवली नाही. त्यामुळे फक्त मोहिमेचा दिखावा केल्याची चर्चा सुरु आहे. कुत्र्यांवर कारवाई करण्यासाठी पुन्हा निविदा मागविण्यात आल्या होत्या. परंतु, त्याला फारसा प्रतिसाद मिळाला नसल्याची माहिती समोर आली आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये मोकाट कुत्र्यांची दहशत वाढली आहे. कुत्र्यांच्या हल्ल्यांमुळे नागरी सुरक्षा धोक्यात आली आहे. २०२२ पासून आजपर्यंत सात हजारांहून अधिक जणांवर कुत्र्यांनी हल्ले केले आहेत. त्यात दोन हजार २०७ जणांना गंभीर दुखापत झाल्यावर त्यांना रुग्णालयात दाखल करून उपचार करण्यात आल्याची माहिती उपलब्ध झाली आहे. पशुसंवर्धन विभागाकडे अपुरे मनुष्यबळ असल्याने कुत्र्यांचे लसीकरणदेखील होण्यास अडचणी निर्माण होत आहे. ग्रामीण भागातील प्रशासकीय यंत्रणेकडेदेखील त्याबाबत योग्य सुविधा नाही. त्यामुळे कुत्र्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. या वाढत्या कुत्र्यांमुळे जीव मुठीत घेऊन वावरण्याची वेळ नागरिकांवर आली आहे.

कुत्रा चावल्यानंतर रेबीज आजार होऊ नये, म्हणून आरोग्य विभागाकडून रेबीज प्रतिबंधित इंजेक्शन दिले जाते. मात्र, त्याचा ही तुटवडा अनेक ठिकाणी निर्माण होत आहे. हे इंजेक्शन महाग असल्याने ते मागविताना शासकीय यंत्रणेला अनेकवेळा अडचणी निर्माण होतात. हल्ला करणाऱ्या मोकाट कुत्र्यांवर अंकुश ठेवल्यास हा प्रश्न कायमचा मार्गी लागण्याची शक्यता आहे. **

## विचारप्रवृत्त करणारे
# सीतायन

पुस्तक परीक्षण
प्रा. शाम जोगळेकर
मो. ९२७३३४३१७७




''सीतायन'' वेदना - विद्रोहाचे रसायन, हे डॉ. तारा भवाळकर यांचे पुस्तक, पुण्याच्या मनोविकास प्रकाशनने प्रकाशित केले आहे. सुरुवातीला 'मनोगत'मध्ये लेखिकेने या पुस्तकामागील आपले विचार मांडले आहेत. लोकपरंपरांचा अभ्यास करताना, राम-सीतेच्या ओव्यांतून, गाण्यांतून, कथांतून जी रामायण कथा समजली, ती प्रामुख्याने सीताकथाच आहे, हे जाणवले. यामुळेच लोकपरंपरेतील राम-सीता कथांना त्या सीतायन म्हणतात. १९७५ पासून भारतातल्या विविध प्रदेशांतली, भाषांमधली ओव्या, गीतं, कथा, दंतकथा, लोकनाट्य यामधून त्यांनी सीतेचा शोध घेतला. त्यावर त्या शोधत, बोलत, आणि लिहीत राहिल्या.

'सीतायन' हा लोकपरंपरेतील सीताशोधाचा एक प्रयत्न आहे. या पुस्तकाचे रंगीत आणि समर्पक मुखपृष्ठ चंद्रमोहन कुलकर्णी यांचे आहे. या पुस्तकात बारा लेख समाविष्ट आहेत.

माझ्या भाव विश्वातील राम, या पहिल्या लेखात, बालपणातील पुण्यातील रामनवमीच्या, परंपरागत उत्सवाच्या काही आठवणी लेखिकेने नोंदविल्या आहेत. सीतेला गर्भवती अवस्थेत वनवासात पाठवणे आणि रामाकडून शंबुकाचा वध, हे खटकल्याने ताराबाईंचे रामचरित्राकडे लक्ष वेधले गेले. त्यासंदर्भात त्यांचे वाचन वाढत गेले. भारतभरातील सर्व भाषांतील पारंपरिक स्त्री गीतांतून, जात्यावरच्या ओव्यांतून सीतेविषयी विलक्षण आत्मीय महानुभाव असल्याचे ताराबाईंना जाणवले. लोकरामायणातील लोकमानस, या लेखात ताराबाई, रामायण या ग्रंथाच्या ग्रांथिक परंपरेपेक्षा लोकपरंपरा अधिक बलवत्तर असल्याचे स्पष्ट करतात. कीर्तन, प्रवचन आणि पुराणांतून या कथा हजारो वर्षे प्रवाहित राहिल्या आहेत. भारतभरच्या विविध प्रादेशिक भाषांम धून रामकथेची अनेक मौखिक रूपे आजही विद्यमान आहेत. या सर्व रामकथांची निर्मितीच येथील लोकप्रतिभेने केलेली आहे. मराठीतील लोकरामायणांचा विचार या लेखात केला आहे. लोकपरंपरेतील रामकथेत आणि प्रमाण संस्कृत वाल्मिकी रामायणात काही मूलभूत घटक सम ान आहेत. सर्व पात्रे, त्यांच्या जीवनातील प्रमुख घटना, प्रसंग, ढोबळमानाने त्यांच्या व्यक्तिमत्त्वांची वैशिष्ट्ये यामध्ये समानता आहे. मात्र काही गोष्टींमध्ये भिन्नता आढळते. रामकथा हे भारतीय परंपरेतील अत्यंत प्रभावी मिथक आहे. मिथके ही समूहमनाला पडलेली स्वप्ने असतात. त्यामध्ये वास्तव,अपुऱ्या,सुप्त इच्छा, आकांक्षा यांचे प्रतिबिंब दिसते. मराठी लोकपरंपरेतील रामकथांचा मोठा पसारा स्त्रीरचित जात्यावरच्या ओव्यांत मोठ्या प्रमाणात आहे. या विविध ओव्यांचे संकलन कसे केले गेले, तेही लेखिकेने स्पष्ट केले आहे. स्त्रियांच्या मनात सीतेचा दुसरा वनवास अत्यंत क्षोभकारक कसा ठरला, हे लेखिकेने सविस्तरपणे स्पष्ट केले आहे. अपमान, क्षोभ, संताप आणि निरुपायाने व्याकुळ होत, सीता भूमातेची प्रार्थना करून, भूमीत सामावून जाते. इथेच लोकरामायण संपते. अभिजन परंपरेत नसलेल्या एका लोकसंकेताचा आधार इथे सीतेला भूमिगत होण्याचे निमित्त ठरतो. जुळी मुले होण्यामागचे जीव वैज्ञानिक सत्य, त्याकाळी लोकज्ञात नव्हते. तोपर्यंत असा लोकसमज होता की, स्त्रीचा दोन पुरुषांची शरीरसंबंध येतो, तेव्हाच जुळ्याची गर्भधारणा होते. सीतेला आपल्या पातिव्रत्याची खात्री असली तरी दृढ लोकसमजाचे ती निराकरण करू शकत नव्हती. यामुळेच स्त्रीरचित रामकथा हे 'रामायण' नसून ते 'सीतायन' आहे, असे लेखिकेला वाटते. दोन वनवास : सीतेचे, या लेखात सीतेच्या दोन्ही वनवासांचे ओव्यांतून आलेले वर्णन वाचकांसमोर मांडले गेले आहे. पहिल्या वनवासात सीतेबरोबर राम, लक्ष्मण होते आणि तो वनवास सुखाचा होता. लोकप्रतिभेने सीतामाई ही सावळ्या रंगाची होती असे मानले आहे. देवदेवतांनाही मानवी लौकिक अनुभवांतून लोकप्रतिभा पाहते. त्यामुळे देवांनाही आजारपण येते आणि राग, लोभ असे सगळे विकारही असतात. सीतेच्या कपाळी रावणवधानंतर दुसरा वनवास आला. महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील विविध जात्यावरील ओव्यांतून हे तीव्रतेने खटकल्याचे व्यक्त होते. अयोध्येतील राजमहालात कैकयी आणि नणंद या कारस्थानी, खलनायिकांनी रामाच्या मनात सीतेच्या चारित्र्याविषयी संशय निर्माण केला. त्यामुळे रामाने तिचा वध करण्यासाठी, लक्ष्मणाबरोबर तिला वनवासात धाडले.

रामाची अ-काल दुर्गापूजा, या लेखात रामाने रावणावर चढाई करण्यापूर्वी, तेथील श्रद्धावान जनतेची आवडती दुर्गापूजा करून, मुत्सद्दीपणाने लंकेतील जनतेचे मत आपल्या बाजूला वळवले होते. स्फुट ओवीगीतांतील 'सीतायन' आणि 'अंकुशपुराण' या दोन लेखांमध्ये सीतेच्या दुसऱ्या वनवासाची लोकमानसातील कहाणी समजते. सीतेचा जन्म कसा झाला आणि सीतेला कोणत्या कारणांमुळे दुसऱ्या वनवासासाठी पाठविले गेले याविषयीच्या कहाण्या, सर्वसामान्य वाचकाला माहीत नसल्याने काहीशा धक्कादायक वाटतात. सीतेचे वनातील बाळंतपण आणि नंतर तिच्या मुलांची काळजी तातोबा घेतात. सीतेच्या दुसऱ्या बाळाचा जन्म कसा झाला याविषयीची काहीशी चमत्कारिक वाटणारी कहाणी वाचकाला समजते. मूळ कन्नड भाषेतील 'चित्रपट रामायण' हे दोन भागांमध्ये, या पुस्तकांमध्ये वाचावयास मिळते. 'चित्रपट रामायण' याचे मूळ लेखन हेळवणकट्टे गिरीअम्मा यांनी कन्नडमध्ये केले. त्याचे हिंदी रूपांतर व्यंकटेश मूर्ती आणि श्री. रामचंद्रराव यांनी केले. स्पंदन नाट्यसंस्थेने याचे प्रयोग पुण्यामुंबईत केले होते. हा लोककलांसारखा प्रकार आहे. महाराष्ट्रात या प्रकारचा 'गोंधळ' सादर केला जातो.

लंकेमध्ये रावणाचा वध झाल्यानंतर राम अयोध्येला सीतेसह परततो. परंतु तत्पूर्वी सीतेला अग्निदिव्य करून आपले निष्कलंकत्व सिद्ध करावे लागते. त्यानंतर राम ाचा राज्याभिषेक होतो. याचवेळी शूर्पणखा प्रवेशते. रामाने तिचा पूर्वी अपमान केल्यामुळे, त्याचा बदला घेण्यासाठी, ती सीतेला तिची बालमैत्रीण म्हणून भेटते. सीतेकडून ती रावणाचे चित्र काढून घेते आणि सीतेबद्दल रामाच्या मनात संशय निर्माण केला जातो. परिणामी, सीतेला पुन्हा वनवासात धाडले जाते. सर्व लोककथांमध्ये सासू किंवा नणंद सीतेला वनवासात पाठवायला कारणीभूत आहेत, असेही सांगितले गेले. परिटाची कथा कुठेही नाही. बंगाली भाषेमध्ये चंद्रावती रामायण सुपरिचित आहे. त्यामध्ये सोळा प्रसंगांतून, सीतेच्या जन्मापासून सीतेच्या गर्भावस्थेपर्यंत, तिला रामाने वनवासाला पाठवले, इथपर्यंतची कथा आहे. दशरथ जातक आणि आदिवासींचे सीतायन या लेखांमध्ये सांगितलेल्या गोष्टी वाचकाला विलक्षण वाटण्याची शक्यता आहे. संस्कृतीच्या विकासामध्ये निरनिराळ्या प्रदेशांत, संस्कृतींमध्ये, वेगवेगळ्या भाषांमध्ये रामकथा पसरत गेल्या. या कथांचा उगम आदिवासींमध्येच आहे. रामायण कथेचे सांस्कृतिक अन्वयार्थ निरनिराळ्या पद्धतीने लावले गेले. काहींच्या मते हा दोन भिन्न संस्कृतींमधील संघर्ष आहे. याविषयी विविध प्रकारचे लेखन झाल्याचे ताराबाईंनी नोंदविले आहे. गर्भवती सीतेला फसवून रामाने तिला वनवासात पाठवले, ही घटना भारतातील श्रमिकांना, स्त्रियांना आणि सर्वच उपेक्षित घटकांना निषेधार्ह वाटली आणि वेदनादायकही! हे तात्पर्य सार्वत्रिक आहे. ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही, असे शेवटी डॉ.तारा भवाळकर लिहितात.


परिशिष्टामध्ये चंद्रावती रामायण : संहिता, हा ताराबाईंनी केलेला मराठी अनुवाद दिला आहे. 'सीतायन' हे पुस्तक वाचकाला विचारप्रवृत्त करते. डॉ. तारा भवाळकर यांच्या, सचित्र परिचयातून त्यांच्या विस्तृत अभ्यासाची आणि व्यासंगाची वाचकाला कल्पना येते. **

**पुस्तकाचे नाव : सीतायन**
**लेखिका : डॉ. तारा भवाळकर**
**प्रकाशक : मनोविकास प्रकाशन, नारायण पेठ, पुणे-३०. ०२०-२९८०६६६५**
**प्रथमावृत्ती : ५ एप्रिल २०२३**
**पृष्ठे : १८८, मूल्य रुपये : रु.२५०/-**

# दगड, माती देवच?

**'एक व्हिडिओ आला फेसबुकवर. दगड, माती देवच. तसं पाहिल्यास उच्चशिक्षित लोकंही आज दगड, मातीच्या देवाची पूजा करु लागले आहेत व हे प्रमाण वाढलेले आहे. ज्यात चमत्कार होतो व लाभ मिळतो. असं त्यांचं म्हणणं.**

अंकुश शिंगाडे



उच्च शिक्षण...... म्हणतात की शिक्षणानं ज्ञान येतं. माणसं सुशिक्षित होतात. परंतु ते सर्व बोलणं वायफळ वाटतं. कारण लोकं कितीही सुशिक्षित झाले असले तरी ते अंधश्रद्धेतच गुरफटलेले असतात. यावरुन शिक्षण कशाला म्हणायचं आणि शिक्षण का बरं घ्यायचं? हा प्रश्न उभा राहतो. उच्चशिक्षित अंधश्रद्धा याचा अर्थ देव दगड, मातीत शोधणे. त्याची पूजा करणे व त्यासाठी अवाढव्य स्वरुपाचा खर्च करणे. एक एक मातीचा गणपती हा एक एक लाख रुपयापेक्षाही जास्त किमतीचा बनत असून, दहा दिवस झाल्यावर त्याला नाल्यात कचऱ्यात फेकणे, मांजर आडवी जाणे, कावळा पिंडाला शिवणे, रात्रीला घुबड दिसणे, हात खाजवणे, तीळ अमूक अमूक जागी असलेला पाहणे व त्यातील लाभ पाहणे, देव नवसाला पावतो म्हणत देवासाठी नवस करणे, प्रसंगी कोंबडू, बकरु वा एखाद्यावेळेस नरबळीही देणे. या सर्व अडाणीच नाही तर उच्चशिक्षितांच्या अंधश्रद्धा आहेत.

आजही बरेचसे उच्चशिक्षित लोकं गुप्त धन मिळते, असं मानत व समजत त्या गुप्तधनाच्या पाठीमागे लागलेले असतात. त्यासाठी कितीतरी रुपयाचा खर्च करतात व नरबळीही देतात. असं नेहमी प्रत्ययाला येतं. तशाच बऱ्याचशा अभिनेत्या व अभिनेते हे मांजर आडवी गेल्यावर रस्ता पार करीत नाहीत. काही लोकं तर घराच्या समोर कोहळा कुंकू लावून ठेवतात तर काही लोकं घराच्या दरवाज्यावर लिंबू मिरची वा उलटी बाहुली लटकवून ठेवतात. हेही प्रमाण अशिक्षितच नाही तर उच्चशिक्षित लोकांच्या घरात दिसते. त्यातच सत्यनारायण, दगडाच्या देवासमोर अगरबत्ती लावणे, हळद कुंकू वाहणे याचंही प्रमाण उच्चशिक्षीत समुदायात दिसतं. काही लोकं याला थोतांड मानतात तर काही तसं करण्याला थोतांड मानत नाहीत. त्याचा लाभ होतो असं मानतात. त्याचं कारण काय असावं बरं? अलीकडील काळात शिक्षणाला फार महत्त्व आलेले आहे व शिक्षणाला वाघिणीचं दूध म्हटलेलं आहे. परंतु आजच्या काळात शिक्षण हे वाघिणीचं दूधच वाटत नाही. कारण जे शिक्षण आपण घेतो, त्यानुसार शिक्षणाचा उद्देश मुळात पटण्यासारखा वाटत नाही. त्याची दोन कारणं आहेत. पहिलं कारण आहे, शिक्षण शिकूनही माणसाचं गुलामागत वागणं आणि दुसरं कारण म्हणजे उच्च शिक्षण शिकूनही अंधश्रद्धेत गुरफटून राहणं. आता लोकं म्हणतील की लेखक महोदय देवावर टीका करणारे असतील. परंतु, यात देवावर टीका करण्यासारखं कारण नाही. ही देवत्वावर टीका आहे व आपल्या अंधभक्तीवर टीका आहे.

आपण नेहमी पाहतो की देव दगडाचा आहे व कितीही उच्च शिकलेले लोकं असतील, तेही देवाची पूजा करतात. कोणत्या देवाची करतात. जो देव मातीचा दगडाचा बनवलेला आहे. त्याची पुजा करतात. त्यात चमत्कार आणतात. त्यांना वाटते की अशा दगडाची पूजा केल्यानं आपल्याला फार मोठा लाभ होतो. लोकं अशा चमत्काराच्या लाभासाठी अशा मूर्तीची पूजा करुन त्या देवासाठी अतोनात खर्च करीत त्याची मनोभावानं सेवा करतात. ज्येत सत्यनारायण हवन पूजन केलं जातं. हे अनाडीच लोकं नाही तर चांगले शिकलेले उच्चशिक्षीत लोकं करतात. हीच अंधश्रद्धा आहे व या अंधश्रद्धेत अगदी लोक वेडे होवून कार्य करीत असतात. परंतु हे धांदात खोटं आहे. कारण मातीचा देव वा दगडाचा देव हा काहीही देत नाही. ते आपल्यालाही माहीत असतं. तरीही आपण त्याची मनोभावाने पूजा करतो. जरी आपण उच्चशिक्षित असलो तरीही. कारण असते, आपली अंधश्रद्धा. देव पावतो असा असलेला आपला विश्वास. अन् विश्वासावरच सारं जग अवलंबून असतं.

देव... देवाबद्दल लोकं बरंच काही लिहून जातात. कोणी देव मानतात तर कोणी देवाला मानत नाहीत. कोणी देव एकच आहे म्हणतात तर कोणी देव अनेक आहेत म्हणतात तर कोणी देव नाही, असंही म्हणतात. ज्याला भाव म्हणायला हवं. माणसाची जशी भक्ती. तसाच त्याचा भाव. मग देव आहे वा देव नाही वा एक अनेक आहे म्हणणे हे त्याच्या भाव आणि भक्तीवर अवलंबून असते. जशी भक्ती तसाच भाव. ज्यात काही लोकं दगडातही देव शोधतात, काही मातीत देव शोधतात, काही काष्ठात देव शोधतात तर काही माणसात देव शोधतात तर काही देव कशातच शोधत नाहीत. ते देवाचे अस्तित्व नाकारतात. अन् आपणही वेळोवेळी पाहतो की काही लोकं देवाची पूजा करीत नाहीत, तेही सुखीच असतात नव्हे तर, जे दगड मातीच्या मूर्त देवाची पूजा करीत नाहीत, असेही सुखी भासतातच.

देव आहे किंवा नाही. हा एका व्यक्तीनं प्रश्न केला होता एकदा. त्यावर त्यावेळेस उत्तर काही सापडलं नाही व उत्तरही देता आलं नाही. देव आहे किंवा नाही, याचा प्रत्यय हा अनुभूतीतून येतो. देव हा आपल्या मानण्यावर आहे. देव आहे असं जर लोकांनी मानलं असतं तर दहा दिवस गणपतीला मानणाऱ्या लोकांनी गणपतीचे विसर्जन करतांना त्याचं गटांगळ्या देत देत विसर्जन केलं नसतं. तसंच त्याला कचऱ्यात टाकूनही विसर्जन केलं नसतं. गणपतीच्या मूर्तीचं हळूवारपणे विसर्जन करायला हवं, असं मानलं असतं. त्याचं दुखलं खुपलं जाणलं असतं. गणपती हाही एक जीवच आहे असं मानून त्याला हळूवारपणे पाण्यात बुडवून बाहेर काढून त्याला वर्षभर जपलं असतं. परंतु आपण ज्या गणपतीच्या मूर्तीला देव समजून त्याची मनोभावे सेवा करतो, त्याला मार बसो की त्याचे हातपाय तुटो, आपण विसर्जन करताना जे त्या मूर्तीसोबत करतो. त्यावर विचार केल्यास असं वाटतं की देव नसेल व लोकं सोंग करीत असतील. परंतु, खरं सांगायचं झाल्यास देव आहे व तो कोणत्याही मूर्तीत नाही वा दगडात नाही, असं आपण म्हणूच शकत नाही तर तो दगडातही आहे आणि मातीच्या मूर्तीतही आहे. कारण कोणताही दगड वा कोणतीही माती ही आपलं मनोरंजनच करीत नाही तर आपल्याला संकटातून व आजारातूनही वाचवत असते असं म्हटल्यास आतिशयोक्ती होणार नाही.

दगड म्हणजे काय व माती म्हणजे काय? हे समजून घेतांना शास्त्रीय दृष्टिकोन सांगणे गरजेचे समजतो. दगड याचा अर्थ तो दगड की ज्यावरुन अनवाणी पायानं चालल्यावर आपल्या शरीरातील व्याधी नष्ट होतात. उच्च रक्तदाब, न्यूनतम रक्तदाब नियंत्रणात राहतो. कधीच मधुमेह होत नाही. काही दगडं तर असेही आहेत की ज्याला घासून कपाळावर लावल्यास आपले डोके कितीही दुखत असेल तर ते बसते. याचाच अर्थ दगड हा आपल्या व्याधीच्या दृष्टिकोनातून कामात येतो. दुसरा फायदा म्हणजे हाच दगड आपलं बापणापासून तर म्हातारे होईपर्यंत मनोरंजनही करतो, कधी टिक्कर बिल्ला खेळताना तर कधी लगोरी हा खेळ खेळत असताना. शिवाय तरुण होताच हा दगड आपलं संरक्षण करीत असतो. जसा एखाद्या स्त्रिला कोणी एखाद्यावेळेस एखादा मारायला आल्यावर तिला त्याचा प्रतिकार दगडांनी केल्यास त्याचे पळून जाणे, हा प्रयोग शिवाजी महाराजांच्या मावळ्यांनी पावनखिंडीत शत्रूंना अडविण्यासाठी केला होता. तसाच विदर्भात पांढूरणा इथे पोळ्याच्या पाडव्याला मनोरंजन म्हणून दगड मारण्याचा खेळ खेळला जातो. अश्मयुगातही याच दगडानं प्राण्यांची शिकार करुन माणूस आपलं पोट भरीत होता. एवढंच नाही तर पुर्वी आणि आताही हाच दगड आपल्या घरी, पाटा, वरवंटा, खल व मुसळ बनून आपल्या घरची कामं करीत असतो. एवढंच नाही तर आपलं घरही दगडांपासून बनवलं जात. याचाच अर्थ दगड हा आपल्याला संरक्षण देण्याचं काम करीत असून तो आपल्याला ऊन, वारा, पाऊस यापासून वाचवतो. याचाच अर्थ दगड हा आपल्या अतिशय उपयोगाचाच असून तो आपल्यासाठी देवच आहे की नाही. देवच आहे व ते आपल्या मानण्यावर अवलंबून आहे. आपल्याला एक दंतकथा माहीत आहे हिरण्यकक्षपूची. त्यानं खांबाला पाय मारताच त्याला खांबातून श्रीहरी विष्णूचं दर्शन झालं होतं. या दगडाच्या उपयोगावरुन दगडाला देव मानून आपल्या पूर्वजांनी त्याची पूजा करणं सुरु केलं होतं. तसंच मातीबाबतही आहे.

विशेष म्हणजे, माती व दगड हे आपल्या आयुष्यात केवळ मनोरंजनच करीत नाहीत तर ते आपल्या जीवनात बहुमुल्य असून आपले त्यांना देव मानून त्यांची पुजा करणे व त्याचे ऋण चुकविणे हे आपले आद्य कर्तव्य असल्याने आपल्या पूर्वजांनी माती वा दगडाच्या मूर्तीला पुजलं. त्यांना देव मानलं आणि ते गरजेचंही होतं. सुरुवातीला त्यात अंधश्रद्धा वा चमत्कार नसेलच आणि नाही. परंतु, ही दोन्ही साधनं उपयोगाची असल्यानं व बऱ्याच लोकांचं त्यापासून पोट भागत असल्यानं आपल्या पूर्वजांना वाटलं की त्यांची येणारी पिढी माती व दगडांचा वापर करणार नाही. म्हणूनच त्यात चमत्कार शिरविला असेल. वाटलं असेल की निदान चमत्काराच्या नावानं तरी आपली येणारी भावी पिढी ही लाभाच्या दृष्टीकोनातून मुर्तीची पुजा अर्चना करेल. म्हणूनच आजची मंडळी ही माती वा दगडाच्या मूर्तीची पूजा अर्चना करतात.

महत्त्वपूर्ण बाब ही की जरी माती व दगडापासून आपलं आरोग्य सुदृढ होत असलं, आपल्याला रोजगार मिळत असला, आपलं मनोरंजन होत असलं, माती आपल्या जीवनात उपयोगात येत असली, तरी माती व दगडात चम त्कार नाही तर तो माती व दगडाचा एक गुणधर्म आहे. परंतु यावरुन माती वा दगडातील देवत्व कमी होत नाही. माती वा दगड हे आपल्या बहुमूल्य उपयोगाचे असल्यानं ते देवच आहेत. मग त्यांची कोणी पूजा करुन त्यांना फुले वाहात असतील, कोणी सत्यनारायण करीत असतील तर त्यात गैर काही नाही. हं, सांगायचं एवढंच की त्या माती वा दगडाच्या मुर्तीसमोर अंधश्रद्धा व चमत्काराच्या नावानं कोणताही मुक्या जीवांचा बळी देऊ नये म्हणजे झालं आणि शिवाय जास्त करुन पूजा अर्चनेच्या विनाकारण आहारी जावू नये म्हणजे झालं. मग ते अडाणी असो वा उच्चशिक्षीत का असेना. तसेच मांजर आडवी जाणे, मुंगूस दिसणे, साप दिसणे, स्वप्न पडणे, तीळ असणे, रात्री घुबड दिसणे, कावळा पिंडाला शिवणे यादेखील अंधश्रद्धाच असून त्या किमान उच्चशिक्षितांनी तरी पाळू नये व मांत्रिकांच्या आहारी जाऊ नये. शिवाय, साप वा एखादा जीव चावल्यास मांत्रिकांकडे न जाता डॉक्टरकडे जावे. हे तेवढंच खरं. ज्यातून आपला जीव वाचेल.

विशेष सांगायचं झाल्यास देव हा दगड मातीत नाही आहे, असं आपलं म्हणणं चुकीचं असून देव त्यातच आहे. कारण ते घटक निर्जीव असले तरी ते आपल्या सर्वतोपयोगी कामात येतात. मात्र आपण जर सुशिक्षित आहोत तर त्यात चमत्कार घालून त्या उद्देशानं पूजा अर्चना करु नये वा लोकांना आपल्या वास्तवतेच्या विचारानं भ्रमीत करु नये. हे तेवढंच खरं. ज्यातून लोकांचा दगड मातीवरचा विश्वास तुटेल व लोकं दगड, माती स्वरुप कोणत्याच मूर्तीची पूजा अर्चना न करता उपासानं मरतील. जेणेकरुन लोकांना या वस्तू न बनविल्यानं रोजगार मिळणार नाही. **

# भारतातील महिला कुस्तीचे भविष्य

## महिला कुस्तीपटूंना सक्षम करण्यासाठी प्रो रेसलिंग लीगचे २०२६ मध्ये पुनरागमन

महिलांच्या सहभागावर आणि महिला कुस्तीपटूंसाठी व्यावसायिक संधींवर पुन्हा लक्ष केंद्रित करून प्रो रेसलिंग लीग (PWL) जानेवारी २०२६ मध्ये परतण्याची तयारी करत असल्याने भारतीय कुस्ती मोठ्या पुनरुज्जीवनासाठी सज्ज होत आहे.

प्रो रेसलिंग लीग नवीन संरचनेखाली परतत आहे. अनेक वर्षांच्या अंतरानंतर, भारतीय कुस्ती महासंघाने (WFI) त्यांच्या थेट देखरेखीखाली अधिक पारदर्शकता आणि आर्थिक शिस्त सुनिश्चित करण्यासाठी अधिकृतपणे प्रो रेसलिंग लीगच्या पुनरागमनाची घोषणा केली आहे. यात पाच भारतीय आणि चार परदेशी खेळाडू सह सहा सहभागी फ्रँचायझींपैकी प्रत्येकी नऊ कुस्तीपटूंचा समावेश असेल. महत्वाचे म्हणजे, यापैकी चार महिला कुस्तीपटू असतील, ज्या ५३ किलो, ५७ किलो, ६२ किलो आणि ७६ किलो गटात भाग घेतील.

या बावत पीडब्ल्यूएलचे प्रमोटर आणि चेअरमैन दयान फारुकी म्हणाले की, प्रो रेसलिंग लीग २०२६ ही भारतीय कुस्तीसाठी एका धाडसी नवीन युगाची सुरुवात आहे. आमचे ध्येय अशी लीग तयार करणे आहे जी परंपरा आणि आधुनिक खेळ दोन्ही साजरे करेल, जिथे स्थानिक प्रतिभा जगातील सर्वोत्तम खेळाडूंशी खांद्याला खांदा लावून स्पर्धा करतील. आम्हाला कुस्ती केवळ भारताचा अभिमान नाही तर त्याची पुढची मोठी क्रीडा घटना बनवायची आहे, ज्यामुळे लाखो लोकांना असा विश्वास बसेल की चॅम्पियन येथेच, आपल्याच मातीत तयार होतात.

### प्रमुख तथ्ये-प्रो रेसलिंग लीग २०२६

(प्रस्तावित स्वरूप):
लाँच: जानेवारी २०२६, नवी दिल्ली
फ्रँचायझी: ६
प्रति संघ एकूण कुस्तीगीर: ९ (५ भारतीय, ४ परदेशी)
महिला श्रेणी: ५३ किलो, ५७ किलो, ६२ किलो, ७६ किलो
पर्यवेक्षकीय संस्था: भारतीय कुस्ती महासंघ ध्येय : समान प्रतिनिधित्व आणि महिला कुस्तीगीरांसाठी व्यावसायिक व्यासपीठ आहे.

### पुढेचा रस्ता

जर पीडब्ल्यूएलचे महिला स्वरूप यशस्वी झाले, तर ते भारतातील कुस्तीची पुनर्परिभाषा करू शकते, राज्यस्तरीय स्पर्धकांमधून महिला कुस्तीगीरांना राष्ट्रीय क्रीडा ब्रँडमध्ये बदलू शकते. थोडक्यात, भारत कुस्तीमध्ये क्रांतीच्या उंबरठ्यावर उभा आहे. जिथे पुढील पीडब्ल्यूएलमधील गर्दीचा उल्लास केवळ पुरुषांसाठीच नाही तर मॅटमध्ये पाऊल ठेवणाऱ्या चपळ आणि निर्भय महिलांसाठीही प्रतिध्वनीत होऊ शकतो.

**महिला कुस्तीसाठी एक महत्त्वाचा टप्पा :**
२०२६ ची आवृत्ती एक आदर्श बदल दर्शवते, महिला कुस्तीला सरकारी स्पर्धांपलीकडे घेऊन जाणे आणि ती व्यावसायिक, टेलिव्हिजन आणि लीग-आधारित स्वरूपात स्थान देणे. यामुळे महिला कुस्तीगीरांना पुढील गोष्टी मिळतात. शीर्ष आंतरराष्ट्रीय प्रतिभेसह सतत स्पर्धा आणि प्रदर्शनआर्थिक वाढ आणि प्रायोजकत्व, पर्यावरणातून पूर्वी नसलेल्या संधी.



विनायक दळवी

माध्यमांची दृश्यमानता आणि चाहत्यांचा सहभाग, भारतात महिला कुस्तीसाठी मजबूत फॉलोअर्स तयार करण्यास मदत करणे. उद्योग तज्ञांचा असा विश्वास आहे की क्रिकेटसाठी आयपीएलने जे केले ते पीडब्ल्यूएल कुस्तीसाठी करू शकते. एक अशी जागा निर्माण करणे जिथे खेळाडू राष्ट्रीय आयकॉन बनतील आणि हा खेळ घराघरात पोहोचेल.

**तळागाळात वाढता सहभाग**
यापेक्षा चांगला वेळ असू शकत नाही. गीता फोगट, साक्षी मलिक आणि विनेश फोगट सारख्या चॅम्पियन्सच्या यशाने प्रेरित होऊन संपूर्ण भारतात, हरियाणा ते महाराष्ट्रापर्यंत, अधिक तरुण मुली कुस्तीत सहभागी होत आहेत.

खेलो इंडिया महिला आणि महिला खेळाडूंभोवती वाढत्या ओटीटी स्टोरीटेलिंगसारख्या सरकारी उपक्रमांमुळे महिला खेळाडूंकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात सांस्कृतिक बदल घडून आला आहे.

डब्ल्यूपीएल २०२६ मध्ये, शीर्ष राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय महिला कुस्तीगीर सहभागी होतील.गेल्या हंगामापर्यंत पीडब्ल्यूएलमध्ये २५ हून अधिक देशांच्या खेळाडूंनी भाग घेतला होता.

**आव्हाने अजूनही आहेत**
तथापि, या प्रवासात अडथळे नाहीत. ग्रामीण भागात दर्जेदार प्रशिक्षण सुविधांची उपलब्धता, सामाजिक निर्बंध आणि सातत्याने प्रसारमाध्यमांचा अभाव यामुळे भारतातील महिला कुस्तीला आव्हाने मिळत आहेत.

महिला वर्गाला व्यावसायिकदृष्ट्या शाश्वत बनवण्यासाठी खाजगी गुंतवणूक आणि प्रेक्षकांच्या सहभागाची गरज यावरही तज्ञ भर देतात. पीडब्ल्यूएलचे सीओओ सुमित दुबे पुढे म्हणाले की, प्रो रेसलिंग लीग व्यावसायिकता, संधी आणि प्रमाणाच्या पायावर बांधली जात आहे.

आमचे लक्ष खेळाडू विकासापासून ते फ्रँचायझी व्यवस्थापनापर्यंत एक अखंड परिसंस्था तयार करण्यावर आहे, जो सर्वोत्तम प्रतिभा, ब्रँड आणि चाहत्यांना आकर्षित करतो. हे केवळ लीग आयोजित करण्याबद्दल नाही; ते एक क्रीडा चळवळ उभारण्याबद्दल आहे जी आखाड्यातील तरुण कुस्तीगीर ते भारताच्या क्रीडा भविष्यात गुंतवणूक करणाऱ्या प्रायोजकापर्यंत प्रत्येक भागधारकाला उत्तेजन देते.

# निवडक

## बॅडमिंटन स्पर्धेत अमोलचा प्रथम क्रमांक



**सुतारवाडी :** रोहा तालुक्यातील शासकीय कर्मचाऱ्यांच्या तालुका स्तरीय बॅडमिंटन स्पर्धेत अमोल राठोड यांनी उत्कृष्ट खेळ करत प्रथम क्रमांक पटकावला आहे. अंतिम सामन्यात त्यांनी उत्तम खेळ कौशल्याचे प्रदर्शन करत विजय मिळवला. अमोल राठोड यांच्या या यशामुळे तालुक्यातील शिक्षकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. सर्वांना त्यांच्या मेहनतीचे आणि शिस्तबद्ध सरावाचे कौतुक केले आहे. यापुढे जिल्हा स्तरावर होणाऱ्या स्पर्धेत त्यांनी आणखी उज्वल कामगिरी करतील, अशी सर्वांनी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी येरळ केंद्राचे केंद्रप्रमुख प्रशांत वाघचौरे, मोहन राठोड, शेळके, सदगीर, बागुल, आदेश राऊत , संदिपान राठोड, जगन राठोड, पठाण आदी सहकारी उपस्थित होते.

## विजय पाटील यांना देवज्ञा

**मुंबई :** राष्ट्रीय कबड्डी खेळाडू विजय पाटील यांचे अल्पशा आजाराने शुक्रवार (दि.७) नोव्हेंबर रोजी पहाटेच्या सुमारास निधन झाले. निधना समयी ते ६५ वर्षाचे होते. त्यांच्या पाश्चात आई, पत्नी, मुलगा व मुलगी असा परिवार आहे.



लोअर परेलच्या वंदे मातरम् क्रीडा मंडळाकडून त्यांनी कबड्डी खेळाला सुरुवात केली. एक उत्कृष्ट उजवा मध्यरक्षक अशी त्याची ख्याती होती. त्याने मुंबई संघाचे तसेच महाराष्ट्राचे देखील प्रतिनिधित्व केले होते. सेंट्रल बँकेत कबड्डी खेळाडू म्हणून रुजू झाल्यानंतर त्याने बँक स्पोर्टस् बोर्ड संघाचे देखील प्रतिनिधित्व केले. कबड्डी खेळा बरोबर सामाजिक कार्यात देखील तो अग्रेसर होता. सेंट्रल बँकेत स्थानीय लोकाधिकार समितीत तो कार्यरत होता. करिरोड सार्वजनिक नवरात्र उत्सव मंडळात देखील तो काम करीत असे. त्यांच्या पार्थिवावर मुंबईतील भोईवाडा येथील हिंदू स्मशान भूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

## लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन

**चिपळूण :** चिपळूण क्रिकेट असोसिएशनतर्फे आयोजित तालुकास्तरीय १६ वर्षांखालील लेदर बॉल क्रिकेट स्पर्धा १० ते १६ नोव्हेंबर दरम्यान रंगणार आहे. चिपळूण तालुका क्रिकेट असोसिएशन गेली ३ वर्षे ही स्पर्धा नियमितपणे आयोजित करत आहे. मागील वर्षी एकूण ८ संघांनी सहभाग नोंदवला होता. ती स्पर्धा साखळी पद्धतीने पार पडली होती. यावेळी गोविंदराव निकम माध्यमिक शाळा, सावर्डे यांनी विजेतेपद पटकावले होते. यावर्षी स्पर्धेला अधिक चांगला प्रतिसाद मिळाल्याने एकूण १४ शाळांनी सहभाग नोंदवला आहे. स्पर्धा नॉकआउट पद्धतीत आयोजित करण्यात आली असून, प्रत्येक सामना २० षटकांचा असणार आहे. ही स्पर्धा चिपळूण तालुका क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष दशरथ दाभोळकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार आहे. स्पर्धेचे उद्घाटन १० नोव्हेंबर रोजी सकाळी ९.०० वाजता चिपळूण-संगमेश्वर मतदार संघाचे आ. शेखर निकम यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात येणार आहे. क्रिकेटप्रेमी नागरिकांनी व चिपळूणवासीयांनी या स्पर्धेला मोठ्या संख्येने उपस्थित राहून खेळाडूंना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## सूर्यनमस्कार, योगासन स्पर्धा

**चिपळूण :** भागवत गुरूजी पुण्यतिथीनिमित्त कोव्यास व्यायाम मंदिर, चिपळूणतर्फे लाख सूर्यनमस्कार संकल्प उपक्रमासोबत सूर्यनमस्कार व योगासन स्पर्धेचे आयोजन रविवार (दि. ९) सकाळी ८ वा. करण्यात येणार आहे. व्यायाम मंदिरातर्फे दरवर्षीप्रमाणे हा उपक्रम राबवला जात असून, व्यायामशाळेतील मुले दररोज सूर्यनमस्कार साधना करून संकल्प पूर्णत्वास नेतात.



उपक्रमाबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये योग, व्यायाम आणि शारीरिक तंदुरुस्तीबद्दलची आवड वाढावी या उद्देशाने यंदाही स्पर्धा विविध वयोगटांमध्ये घेण्यात येणार आहे. स्पर्धेसाठी ७, १२, १८ वर्षांखालील आणि १८ वर्षांवरील खुला गट असे चार गट निश्चित केले आहेत.

# विश्वविजेत्यांचा महाराष्ट्र शासनाकडून सन्मान



**। मुंबई । प्रतिनिधी ।**
भारतीय संघात महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करणाऱ्या महाराष्ट्राच्या क्रिकेटपटू स्मृति मानधना, जेमिमाह रॉड्रिग्ज, राधा यादव यांचा या अद्वितीय कामगिरी बद्दल महाराष्ट्र शासनातर्फे प्रत्येकी रोख रु.२.२५ कोटी रुपयांचा धनादेश देऊन गौरविण्यात आले.

मंत्रालयातील मुख्यमंत्री दालनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते भेटवस्तू व धनादेश देऊन स्मृती मानधना, जेमिमाह रॉड्रिग्ज, राधा यादव यांच्यासह ऐतिहासिक विश्व विजयाचे शिल्पकार भारतीय संघाचे क्रीडा मार्गदर्शक अमोल मुजुमदार यांचा रोख रु.२२.५० लक्ष व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

वैयक्तिक क्रिकेटपटूंना सर्वाधिक रक्कम देणारे देशातील महाराष्ट्र हे पहिलेच राज्य ठरले आहे. याप्रसंगी क्रिकेट संघाच्या सपोर्टिंग स्टाफसाठी प्रत्येकी ११ लाख रुपयांचे पारितोषिक देण्याची घोषणाही मुख्यमंत्री यांनी केली आहे.

- **मुख्यमंत्र्याच्या हस्ते धनादेशाचे वाटप**
- **सपोर्टिंग स्टाफला पारितोषिकाची घोषणा**

भारतीय महिला क्रिकेट संघाचा वरिष्ठ स्तरावरील हा पहिलाच आयसीसी विश्वचषक विजय असून, या देदीप्यमान यशामुळे जागतिक स्तरावर भारताचा व पर्यायाने महाराष्ट्र राज्याचा गौरव झालेला आहे. असे सांगून मुख्यमंत्र्यांनी महिला विश्वचषक विजेत्यांचा महाराष्ट्र शासनाच्या वतीने झालेला सन्मान सोहळा हा केवळ एक अभिनंदनपर कार्यक्रम नव्हता, तर भारतीय क्रिकेटच्या इतिहासात महाराष्ट्राच्या महत्त्वपूर्ण आणि वाढत्या भूमिकेची अधिकृत नोंद आहे असे सांगितले. स्मृती मंधाना, जेमिमा रोड्रिग्ज, राधा यादव आणि प्रशिक्षक अमोल मजूमदार यांच्या रूपाने महाराष्ट्र राज्य देशाच्या क्रीडा नकाशावर आपला ठसा निश्चितपणे उमटवत आहेत.

राज्याने दिलेले २.२५ कोटी रुपयांचे आर्थिक प्रोत्साहन अत्यंत स्तुत्य आहे आणि महिला क्रीडा क्षेत्रातील आर्थिक असमानता दूर करण्याच्या दिशेने हे महत्त्वपूर्ण पाऊल आहे. या निर्णयामुळे महिला खेळाडूंना व्यावसायिक सुरक्षितता मिळण्यास मदत होईल आणि पुढील पिढीला खेळात करिअर करण्यासाठी प्रेरणा मिळेल. आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भारताचे नाव उजळवणाऱ्या क्रीडापटूंचा सत्कार करण्यासाठी आणि क्रीडा क्षेत्रातील उत्कृष्टतेला प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र शासन वचनबद्ध असल्याची क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांनी सांगितले.

याप्रसंगी यावेळी क्रीडा व युवक कल्याण मंत्री माणिकराव कोकाटे, मंत्री, माहिती व तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार मंत्री, क्रीडा विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, आयुक्त शीतल तेली-उगले या उपस्थित होत्या.

## पीएसपीबी टेनिस स्पर्धेत श्रीवल्ली विजयी



**। पुणे । प्रतिनिधी ।**
पीएसपीबीच्या टेनिस स्पर्धेत महिला गटात बीपीसीएलच्या श्रीवल्ली रश्मिका भामीदीप्तीने जेतेपद पटकावले. तर पुरुष गट एकेरीतून आयओसीएलच्या सुमीत नागल व रामकुमार रामनाथनने अंतिम फेरीत प्रवेश मिळविला आहे. एकेरीत पुरुष गटाच्या उपांत्य फेरीत आयओसीएलच्या सुमीत नागलने ओएनजीसीच्या व्ही एम रणजीतचा ६-४ असा तर, आयओसीएलच्या रामकुमार रामनाथनने ओएनजीसीच्या विष्णू वर्धनचा ७-५ असा पराभव करून अंतिम फेरी गाठली आहे.

महिला गट एकेरीच्या अंतिम लढतीत श्रीवल्लीने बीपीसीएलच्या वैष्णवी आडकरवर ६-३, ६-४ असा विजय प्राप्त करीत विजेतेपद पटकाविले. सांघिक पुरुष गटाच्या अंतिम फेरीत रामकुमार रामनाथन व सुमीत नागलच्या सुरेख कामगिरीच्या जोरावर आयओसीएल संघाने ओएनजीसी संघाचा २-० असा पराभव करून विजेतेपद पटकावले तर महिला गटात बीपीसीएल 'अ' संघाने आयओसीएल संघाचा २-१ असा पराभव करून विजेतेपदाचा मान मिळविला. सांघिक गट : अंतिम फेरी : पुरुष : आयओसीएल वि.वि. ओएनजीसी २-०. रामकुमार रामनाथन वि.वि. विष्णू वर्धन ६-४, ६-४; सुमीत नागल वि.वि. व्ही एन रणजित ६-३, ६-२. महिला गट : अंतिम फेरी : बीपीसीएल 'अ' वि.वि. आयओसीएल २-१. वैष्णवी आडकर वि. वि. प्रार्थना ठोंबरे ६-२, ७-६ (४); रिया सचदेवा पराभूत विरुद्ध ऐश्वर्या जाधव २-६, ४-६; दुहेरी : वैष्णवी आडकर व रिया सचदेवा वि.वि. प्रार्थना ठोंबरे व ऐश्वर्या जाधव ७-५, ७-५.



# ब्रिस्बेनला वादळाचा तडाखा

## भारताने मालिका २-१ ने जिंकली

**। ब्रिस्बेन । वृत्तसंस्था ।**
भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातली पाचवी टी-२० सामना पावसामुळे रद्द झाल्यामुळे भारताने ही मालिका २-१ ने जिंकली आहे. पाचव्या टी-२० सामन्यात ऑस्ट्रेलियाचा कर्णधार मिचेल मार्शने टॉस जिंकून पहिले बॉलिंगचा निर्णय घेतला, त्यानंतर भारताने ४.५ ओव्हरमध्ये एकही विकेट न गमावता ५२ रन केले. अभिषेक शर्मा १३ बॉलमध्ये २३ रन तर शुभमन गिल १६ बॉलमध्ये २९ रनवर खेळत होता, तेव्हाच मॅच थांबवण्यात आली.

ब्रिस्बेनमध्ये वीजेच्या कडकडाटासह वादळ आणि पावसाचा अलर्ट आल्यामुळे सामना थांबवला गेला. तसेच स्टेडियममध्ये उपस्थित असलेल्या प्रेक्षकांनाही सुरक्षित स्थळी जायला सांगण्यात आले. यानंतर पुढच्या काही मिनिटांमध्ये मुसळधार पावसाला सुरूवात झाली. पाऊस थांबत नसल्यामुळे अखेर सामना रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला.

या सीरिजमधला पहिला सामनाही पावसामुळे रद्द झाला होता, तर दुसऱ्या सामन्यात ऑस्ट्रेलियाचा विजय झाला. तिसऱ्या आणि चौथ्या टी-२० मध्ये भारताने जोरदार पुनरागमन करत विजय मिळवला.

त्याच बरोबर सीरिजमध्ये २-१ ने आघाडी घेतली. पाचवी मॅचही पावसाने रद्द झाल्यामुळे भारताने आणखी एका टी-२० सीरिजमध्ये विजय मिळवला आहे.

**कोल्हापूर विभाग सांघिक विजेता, पुणे विभाग उपविजेता** | **विविध वजनी गटात रंगले चुरशीचे सामने**

# खोपोलीत राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेचा जल्लोष

**। खोपोली । प्रतिनिधी ।**
खोपोलीतील काशी स्पोर्ट्स सेंटर येथे नुकतीच १७ वर्षाखालील राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धा जल्लोषात पार पडली. राज्यभरातील तब्बल २४० मुलामुलींनी या स्पर्धेत सहभाग घेतला. फ्रीस्टाईल आणि ग्रेको-रोमन पद्धतीच्या विविध वजनी गटांत सामने रंगले.

स्पर्धेचे उत्कृष्ट आयोजन कुस्ती महर्षी भाऊसाहेब कुंभार कुस्ती न्यास आणि काशी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. स्पर्धा प्रमुख राजाराम कुंभार, निरीक्षक संदीप



वांजळे व दत्ता माने, तसेच तांत्रिक प्रमुख जगदीश मरागजे यांनी स्पर्धेच्या यशस्वी आयोजनात मोलाचा वाटा उचलला.

कोल्हापूर विभागाच्या मुलींनी ६ सुवर्ण, १ रौप्य, २ कांस्य पदके मिळवत सांघिक विजेतेपद पटकावले, तर मुलांनी ६ सुवर्ण, ३ रौप्य, ७ कांस्य पदकांसह वर्चस्व गाजवले. पुणे विभागाच्या मुलींनी ३ सुवर्ण, ४ रौप्य, १ कांस्य, आणि मुलांनी ४ सुवर्ण, ४ रौप्य, ६ कांस्यपदकांसह सांघिक उपविजेतेपद मिळवले.

स्पर्धेच्या आयोजनात कुस्ती महर्षी भाऊसाहेब कुंभार कुस्ती न्यास व काशी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स यांच्या सर्व सदस्यांनी उत्कृष्ट नियोजन केले. हेल्प फाउंडेशनने उत्कृष्ट सुरक्षा व्यवस्था पुरवली, तसेच खेळाडूंसाठी सुसज्ज निवास आणि पौष्टिक भोजनाची उत्तम सोय करण्यात आली होती.

प्रेक्षकांसाठी आकर्षक आसनव्यवस्था, एलईडी स्क्रीनद्वारे थेट प्रक्षेपण आणि यू ट्यूब वर लाईव्ह स्ट्रीमिंगची सुविधाही देण्यात आली.

स्पर्धा आयोजन समितीच्या वतीने कुस्ती क्रीडाप्रकारात आंतरराष्ट्रीय मानांकन प्राप्त करणाऱ्या प्रशिक्षकांचा महाराष्ट्राचे द्रोणाचार्य असा विशेष सन्मान करण्यात आला. या मानकरी प्रशिक्षकांमध्ये दादा लवटे, संदीप पाटील, संदीप पठारे, अमोल यादव, नागेश राक्षे, किरण मोरे, संपती येळकर, विजय चव्हाण आणि दिवेश पालांडे यांचा गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी काशी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, कुस्ती महर्षी भाऊसाहेब कुंभार कुस्ती न्यास, रायगड जिल्हा कुस्तीगीर संघ, सर्व पंच, प्रशिक्षक, आयोजक तसेच रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ आणि राज्य क्रीडा मार्गदर्शक निळकंठ आखाडे यांचे मार्गदर्शन व सहकार्य अत्यंत मोलाचे ठरले.

या भव्य स्पर्धेचे उद्घाटन रायगड जिल्हा कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष परेश ठाकूर यांच्या हस्ते झाले. यावेळी शशी भूषण, भावेश रावळ, सौरभ शर्मा, चंद्रकांत मोडक आणि निलेश साळुंखे, विक्रम साबळे, डॉ. समर्थ मनुकर, मारुती आडकर, जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ, राज्य क्रीडा मार्गदर्शक निळकंठ आखाडे प्रमुख उपस्थित होते.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)